**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1586/2007.**

श्री गजानन महादेवराव कु–हेकर

मु. पो. कुरुम ता. मुर्तिजापूर जि. अकोला

..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री प्रशांत घुले

प्रथम अपीलीय अधिकारी तथा

गट शिक्षणाधिकारी

पंचायत समिती मुर्तिजापूर

ता. मुर्तिजापूर जि. अकोला

2) जन माहिती अधिकारी तथा

मुख्याध्यापिका

जिल्हा परिषद प्राथमिक कन्या शाळा कुरुम

ता. मुर्तिजापूर जि. अकोला ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.6.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 7.3.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी विनाअनुमती गैरहजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 16.12.2005 रोजी कार्यकारी मुख्याध्यापिका, जिल्हा परिषद प्राथमिक कन्या शाळा कुरुम यांचेकडे ''आपले सर्व कर्मचारी वर्गाना मुख्यालयी राहण्याचे आदेश शासनाचे असून शासनाचे पालन करीत आहे काय? पालन करीत असल्यास कोणाच्या निवासस्थानी भाडयाने राहतात. पालन करीत नसल्यास का नाही. शासनातर्फे घरभाडे भत्ता मिळतो का किती व कशासाठी मिळतो वरील कार्यालयीन सर्व शासकीय कर्मचा–यानी वरील विषयाच्या अनुषंगाने सत्य माहिती पंधरा दिवसाचे आंत देण्यात यावी. माहितीचा कालावधी 2005 ते 2006. आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन शासकीय नियमाप्रमाणे कर्मचा–यांना मुख्यालयी (हेडक्वार्टर) राहणे आवश्यक आहे काय आणि घरभाडे मिळतो का ? माहिती व्यक्तशः घेणार असे नमूद केलेले आहे. सदरची माहिती ही विहित मुदतीत माहिती मिळाली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक 6.7.2006 रोजी प्रथम अपील गट शिक्षणाधिकारी यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. परंतु तरी सुध्दा अपीलकर्ता यांना दि. 7.11.2006 रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालय अकोला यांचेकडे अपील दाखल केलेले दिसून येते. त्यामुळे दि. 24.11.2006 रोजी शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांनी मुख्याध्यापिका, जिल्हा परिषद प्राथमिक कन्या शाळा यांना माहिती देण्यास विलंब केला माहिती खोटी, अपूर्ण दिल्याचे नमूद केले. व मागितलेली माहिती परिपूर्ण व सत्य द्यावी असे पत्र दिलेले दिसते. सदरच्या पत्राची प्रत अपीलकर्ता यांना दिली. त्यावर दि. 18.12.2006 रोजी मुख्याध्यापिका यांनी अपीलकर्ता यांना पुन्हा माहितीच्या संदर्भात माहिती दिलेली दिसते. व त्यानंतरच दि. 7.3.2007 रोजी अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. सदरच्या द्वितीय अपीलाच्या संदर्भात अपीलकर्ता यांनी पुढिलप्रमाणे खुलासा केलेला आहे तो खालिलप्रमाणे.

1) दि. 16.12.2005 रोजी अपिलार्थीने महाराष्ट्र माहितीचा अधिकार अन्वये अर्ज विरुध्द प क्र. 2 कडे सादर केले. सदर अर्जात अपिलार्थीने माहिती मागीतली की, आपल्या सर्व कर्मचारी वर्गाना मुख्यालयी राहण्याचे आदेश शासनाचे असुन आपण याचे पालन करीत आहात काय? पालन करीत असल्यास कुणाच्या निवासस्थानी भाडयाने राहता, पालन करीत नसल्यास का नाही? शासनातर्फे घारभाडे मिळातो का? किती व कशासाठी. सदर अर्ज केल्यानंतर अपिलार्थी अनेकदा विरुध्द पक्ष क्र. 2 यांचेकडे माहिती घेण्यास गेले परंतु वि.प.क्रं.2 नी माहिती दिली नाही. वारंवार तगादा लावल्यानंतर वि.प.क्रं.2 नी पुरविलेली माहिती खोटी अपुर्ण व उशिरा पुरविल्यामुळे अपिलार्थीने दि. 6.7.06 रोजी वि. प.क्रं.1 माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) प्रमाणे अपिल दाखल केले. सदर अपिल दाखल केल्यानंतर सुध्दा वि.प.क्रं.1 नी कोणत्याही प्रकारे चौकशी केली नाही व सदर अपिलाच्या निकालाबद्यल माहिती सुध्दा अपिलार्थीला पुरविण्यात आली नाही. करीता अपिलार्थीने दि. 7.11.06 रोजी शिक्षणाधिकारी जि.प.अकोला यांच्या समक्ष पुन्हा अपिल दाखल केले. वि. शिक्षणाधिकारी जि.प.अकोला यांनी सखोल चौकशी केल्यानंतर वि.प.क्रं.2 ला दि. 24.11.06 रोजी पत्र पाठविले की वि.प.क्रं.2 ने अपिलार्थीला अपिलार्थीने मागीतलेली माहिती देण्यास विलंब केला व दिलेली माहिती खोटी व अपुर्ण आहे असे आदेश केले. की अपिलार्थीने मागीतलेली माहिती परिपुर्ण व सत्य द्यावी वि. शिक्षणाधिकारी जि.प.अकोला यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे वि.प.क्रं.2 ने दि. 18.12.06 रोजी अपिलार्थीला पुन्हा माहिती पुरवली तसेच दि. 9.12.06 च्या पत्राद्वारे वि.प.क्रं.2 ने वि. शिक्षणाधिकारी साहेब अकोला यांना कळविले की अपिलार्थीला माहिती पुरविण्यास विलंब झाला आहे.

2) वि.प.क्रं.2 नी पुरविलेली माहिती दि. 30.6.06 तसेच पुरविलेली माहिती दि. 18.12.06 मध्ये तफावत आहे. वि.प.क्रं.2 नी पुरविलेली माहिती दि. 30.6.06 प्रमाणे

कु. मनोरमा जवंजाळ हेच श्री साहेबराव मेहरे यांचेकडे भाडयाने राहतात तसेच कु. संध्या चौकशे हे श्री नामेदेवराव कोरडे यांचेकडे भाडयाने राहतात. परंतु वि.प.क्रं.2 नी पुरविलेली माहिती दि. 18.12.06 प्रमाणे कु. मनोरमा जवंजाळ हे श्री नामेदेवराव कोरडे यांचेकडे भाडयाने राहतात असे दर्शविण्यात आलेले आहे. दि. 30.6.06 व दि. 18.12.06 ला क्रमशः पुरविलेली माहिती खोटी आहे असे दिसुन येते. तसेच दि. 30.6.06 रोजी पुरविण्यात आलेली माहिती अपुर्ण दिल्यामुळे वि. शिक्षणाधिकारी साहेब अकोला यांच्या आदेशानंतर वि.प.क्रं.2 पुन्हा 18.12.06 रोजी पुरविली परंतु दि. 30.6.06 रोजी पुरविलेली माहिती अपुर्ण कां पुरविण्यात आली याबद्यल कोणतेही कारण स्पष्ट केले नाही.

3) तसेच वि.प.क्रं.2 कु. मनोरमा जवंजाळ यांच्याकडे कुरुम येथील राशन कार्ड व मतदान कार्ड नाही. तसेच मतदान यादीमध्ये सुध्दा त्यांचे नाव नमुद नाही हे सिध्द करण्यासाठी अपिलार्थी ने वि. तहसिलदार साहेब मुर्तिजापूर यांचेकडे प्रमाणपत्र, मतदान यादी ची प्रत वि. आयोगासमक्ष दाखल केलेले आहेत. यावरुन असे सिध्द होते की वि. क्र. 2 कुरुम येथे राहत नसल्यामुळे वि.प.क्रं.2 ला कुरुम येथील राशन कार्ड मिळाले नाही. तसेच त्यांचे नाव मतदान यादीमध्ये नमुद करण्यात आलेले नाही. यावरुन असे सिध्द होते की वि.प.क्रं.2 हे मुख्यालयी कुरुम येथे राहत नाही. व वि.प.क्रं.2 नी पुरविलेली माहिती हि दि. 30.6.06 व दि. 18.12.06 दिलेली माहिती खोटी आहे. वि.प.क्रं. 2 नी दिलेल्या माहिती प्रमाणे ग्रामपंचायत कार्यालयाचे दाखल पं.स.कार्यालयास सादर केले आहे. परंतु कोणत्याही स्टॅम्प पेपर्सवर ॲफीडेव्हीट केलेले नाही. यावरुन असे सिध्द होते की अपिलकर्त्याला खोटी माहिती पुरविण्यात आलेली आहे.

4) गट विकास अधिकारी मुर्तिजापूर यांचेकडे दि. 4.9.06 ला 16.4.07 ला शिक्षणाधिकारी साहेब अकोला यांच्याकडे दि. 7.12.07 ला गट विकास अधिकारी कार्यालय मुर्तिजापूर यांचेकडे वारंवार चौकशी संदर्भात विनंतीवजा निवेदने दिली असुन सुध्दा समक्ष चौकशी

करण्यास असमर्थ आहे. तरी यावरुन असे सिध्द होते की संबंधित कर्मचारी मुख्यालयी राहत नाहीत वि.प.क्रं.2 नी अपिलकर्त्याला पुरविलेली माहिती ही खोटी आहे.

करिता अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) प्रमाणे सदर अपिल विद्यमान आयुक्तासमक्ष दाखल केलेली आहे. तसेच अपिलार्थीने आपली बाजु सिध्द केली आहे. करीता विरुध्द पक्षा विरुध्द माहितीचा अधिकार कायदर 05 प्रमाणे दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी ही विनंती.

सदरच्या खुलाशामध्ये अपीलकर्ता यांनी असे म्हटलेले आहे की त्यांना माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन दिलेली नाही परंतु अपीलकर्ता यांनी माहिती मागतांना ती व्यक्तिशः माहिती घेणार असे नमूद केले आहे. व्यक्तिशः माहिती घेणार असे नमूद केल्यावर अपीलकर्ता यांनी 30 दिवसाचे मुदतीत जन माहिती अधिकारी यांचेकडे व्यक्तिशः माहिती घेण्यास गेले पाहिजे हे अपेक्षित आहे. व व्यक्तिशः माहिती उपलब्ध करुन दिली नाही तर 30 दिवसाच्या मुदतीच्या आत आक्षेप घेणारे पत्र त्या माहिती अधिका–यास द्यावयास पाहिजे तसा पुरावा आयोगाकडे दाखल झालेला नाही. व्यक्तिशः माहिती घेणार असे नमूद केले म्हणजे माहिती अधिका–यानी अपिलकर्ता यांना बोलावून किंवा त्यांच्या घरी जावून माहिती देणे हे अपेक्षित नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे म्हणणे माहिती विहित मुदतीत दिली नाही हे ग्राहय धरता येत नाही. कारण दि. 30.6.06 रोजीची माहिती जी उपलब्ध करुन दिली आहे ती माहिती रात्री 11.00 वा. हस्ते गजानन वा. गुल्हाने यांनी उपलब्ध करुन दिली आहे व त्यावर अपीलकर्ता यांनी अपूर्ण माहिती मिळाली असा शेरा दिलेला दिसून येतो. कशा प्रकारे अपूर्ण आहे व दिशाभूल करणारीत आहे हे खुलाशात दिलेले नाही. व त्यामुळे सदरची माहिती अपुर्ण आहे हा निष्कर्ष काढता येतो. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेवून निर्णय देणे आवश्यक असते परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतलेली

नाही. वास्तविक सुनावणी घेवून कारणमिमांसा देणारा निर्णय देवून माहिती त्याच स्तरावर उपलब्ध होईल याची दक्षता घ्यावयाची असते परंतु ती घेतलेली दिसत नाही त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केले आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. जन माहिती अधिकारी यांनी सुध्दा माहिती दिली आहे ती अपूर्ण आहे असे दिसून येत असल्यामुळे माहिती देण्याची टाळाटाळ केलेली आहे हा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी हया दोषी आढळून येतात. मात्र अपिलकर्ता यांनी सुध्दा अधिनियमाच्या तरतुदींचे तंतोतंत पालन केलेले नाही. अपीलकर्ता यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे दि. 7.11.2006 रोजी अपील कशा करीता दाखल केले व कोणत्या तरतुदीखाली केले गेले हे स्पष्ट होत नाही. त्यामुळे अपीलकर्ता सुध्दा त्यांना स्वतःला वाटेल त्याप्रमाणे नियमबाहय अपीले दाखल करीत असतात असे दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 मध्ये अधिनियमाच्या कलम 6 प्रमाणे एक अर्ज त्या अर्जाच्या संदर्भात त्या अर्जाचा निर्णय मान्य नसल्यास किंवा माहिती उपलब्ध झाली नाही तर 30 दिवस नंतर 30 दिवसाचे आंत कलम 19 (1) प्रमाणे प्रथम अपील दाखल करावयाचे असते व 30 दिवसात प्रथम अपीलाचा निर्णय न दिल्यास त्या निर्णयाच्या विरुध्द 90 दिवसाचे आंत राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करावयाचे असते. अधिनियमाचा आधार घेतल्यावर अधिनियमाच्या पुढिल सर्व तरतुदी अपीलकर्ता यांनासुध्दा लागू होतात. व अशा हया वारंवार अनेक अर्ज करण्यामुळेच माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात निष्क्रीयता निर्माण होते व सदरचा कायदा हा बोथट होत जातो. माहितीचा अधिकार हे एक अमोघ अस्त्र आहे व त्याचा वापर हे आटेकोरपणे करणे आवश्यक असते. परंतु कोणत्याही तरतुदीचा अभ्यास करावयाचा नाही कोणत्याही ऐकीव माहितीवरती माहिती करीता अर्ज करीत राहायचे अपीले करीत राहायचे ही पण सवय पडलेली दिसते व या अपीलकर्ता यांनी सुध्दा तशा प्रकारची प्रथा अवलंबिलेली दिसते. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना

कोणत्याही प्रकारचा अधिकार कायद्यात नसतांना अपीलकर्ता यांना काय अपेक्षित होते हे सांगता येणार नाही. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 हा मिळाल्यावर सुध्दा एकाच बाबीकरीता अनेक पदाधिका–याकडे वारंवार अर्ज करण्याची सवय ही संपुष्टात येत नाही असे दिसते. व त्यामुळेच सदरच्या प्रकरणात सुध्दा माहिती अधिकारी यांनी माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिली असली तरी त्याबाबत त्यांना दोषी धरता येत नाही मात्र ती चुकीची व दिशाभूल करणारी उपलब्ध करुन दिली असल्यामुळे ते दोषी ठरतात व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दि. 16.12.2005 च्या अर्जाप्रमाणे दि. 30.6.2006 रोजी चुकीची व अपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका हया दोषी आढळुन येत असल्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे रु. 1000/– ची शास्ती कां लादण्यात येवू नये किंवा याबाबतचा खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून दहा दिवसाचे आंत आयोगाकडे करावा अन्यथा शास्ती कायम होईल.

2) सदरच्या निर्णयाची एक प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अकोला यांचेकडे पुढिल योग्य त्या कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1601/2007.**

श्री सखाराम तुळशिराम वानखेडे
वार्ड नं. 1 रेल्वे कॉलनी, शेगांव
मु.पो.ता.शेगाव जि. बुलढाणा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद बुलढाणा
2) जन माहिती अधिकारी तथा
जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
जिल्हा परिषद बुलढाणा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 10.6.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 28.2.2006 (प्राप्त 6.3.2007) रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज ठेवण्यात आली होती. मात्र अपीलकर्ता यांनी अर्जात नमूद केलेली माहिती प्राप्त झालेली असल्यामुळे व दिलेल्या माहितीने समाधान झालेले असल्यामुळे दि. 28.2.2006 रोजी दाखल केलेले अपील हे खारीज करण्याची विनंती करीत आहे करीता याबाबत मला काहीही

म्हणवयाचे नाही करीता मी केलेले अपील माहिती मिळाल्यामुळे मागे घेत आहे असे लेखी आयोगास दिलेले आहे. त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जिल्हा परिषद बुलढाणा यांनीसुध्दा अपीलकर्ता यांस माहिती उपलब्ध करुन दिलेली असून उपलब्ध झालेल्या माहितीमुळे त्यांचे समाधान झालेले आहे असे त्यांचेकडे सुध्दा लेखी दिलेले असून भविष्यात याबाबत अर्जदाराने काही प्रशासकीय अडचणी निर्माण केल्यास मी त्यास जबाबदार राहिल असे लेखी दिलेले असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.10–11

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1597/2007.**

श्री श्रीकांत भगवानदास पटेल

बिर्ला कॉलनी, जठारपेठ, अकोला

ता. जि. अकोला ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री शरद भिसे

प्रथम अपीलीय अधिकारी तथा

उपकार्यकारी अभियंता

महा. राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

शहर उपविभाग क्र. 3 अकोला

2) श्री पी. डी. वानखेडे

जन माहिती अधिकारी तथा

कनिष्ठ अभियंता

महा. राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

शहर उपविभाग क्र. 3 अकोला ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.6.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 25.3.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत. उत्तरवादी तर्फे ॲड. सुनिल काटे हे हजर असून त्यांनी युक्तिवाद केला.

2. अपीलकर्ता यांनी दि. 14.2.2007 रोजी माहिती अधिकारी म्हणून कार्यकारी अभियंता महा. राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. अकोला यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली.

1) दिनांक 13.2.2007 रोजी मला तुम्ही अकाउंट स्टेटमेंट दिले त्यामध्ये जानेवारी बीलचे संबंधी 2,99,385/– देण्यात आले आहे त्याचे डिटेलस् देण्यात यावी व माहिती देण्यात यावी कि कसे काय थकीत बाकी काढण्यात आले आहे.

2) माझ्यावर दिनांक 16.12.06 रोजी रजिस्टर 135 कलमानुसार ईसी ॲक्ट 2003 प्रमाणे करण्यात आले आहे. व अजून माझ्यावर विजचोरी सिध्द झाली नाही. तरी तुम्ही कोणत्या कायदा अंतर्गत माझ्यावर 2,99,385/– आकारले आहे. त्या कायदयाची प्रत तात्काळ देण्यात यावी.

3) 2,99,385/– रु. विजचोरीचा अधिकार तुम्हाला आहे कि कोर्टाला आहे या कायदयाची प्रत किंवा कलम देण्यात यावे. कारण आज विजचोरी सिध्द झाली नाही व माझ्यावर चार्ज सुध्दा झाला व तुम्ही माझ्यावर थकीत बाकी दाखवून मला आजच चोर ठरवले आहे. तरी कोणत्या कायदयाअंतर्गत माझ्यावर 2,99,385/– थकीत बाकी तुमच्या अकाउंटमध्ये खवले आहे त्या कायदयाची प्रत व त्यासंबंधीची संपूर्ण माहिती देण्यात यावी.

4) दिनांक 25.1.07 रोजी माझ्या आशा पाटील यांना तुम्ही पत्र देवून कळवले आहे कि तुमच्या घरावर 3,25,385/– रु. बाकी आहे व आज रोज तुम्ही मला 2,99,385/– चे स्टेटमेंट दिले आहे तरी जो फरक आहे त्या संबंधी माहिती देण्यात यावी. कि कोणती अकाउंट खरे आहे 2,99,385/– कि 352000/– स्पष्टिकरण करावे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दि. 15.2.2007 रोजी माहिती अधिकारी यांनी आपले विजचोरी प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने आपणास माहिती देता येत नाही असे कळविलेले दिसते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी

दि. 17.2.2007 रोजी प्रथम अपील दाखल केले. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 6.3.2007 रोजी अपीलकर्ता यांना कळविण्यात आला. त्यामध्ये श्री श्रीकांत पटेल यांनी जी माहिती मागितली ती दि. 17.2.07 च्या अर्जात मागितली होती त्यात एफ. आय. आर. झालेला असल्यामुळे व प्रकरण न्यायप्रविष्ट होत असल्यामुळे सेक्शन 8 (1) (ज) नुसार अर्जदाराचे विरुध्द विजचोरीचा गुन्हा नोंदवला आहे व त्याचा तपास पोलीस स्टेशन मार्फत सुरु आहे. त्यामुळे माहितीचा अधिकाराचा कायदा कलम 8 (1) (ज) नुसार माहिती देता येत नाही करिता माहिती देणे शक्य नाही. असे अपीलीय अधिकारी यांनी अर्जात निर्णय दिला आहे असे दिसून येते. सदरच्या निर्णयाप्रमाणे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. अपीलकर्ता यांच्या सदरच्या अपीलाच्या सुनावणीच्या संदर्भात उत्तरवादी यांनी खुलासा दाखल केला आहे. अपिलकर्ता यांच्या दि. 14.2.2006 च्या माहिती मागण्याच्या अर्जाच्या संदर्भामध्ये उत्तरवादी यांचे तर्फे ॲड. काटे यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की अपीलकर्ता यांना या संपूर्ण प्रकरणातील माहिती आतापर्यंत उपलब्ध करुन दिलेली आहे व त्यामुळे त्यांनी विचारलेल्या 352000/– च्या संदर्भामध्ये सुध्दा विवरण दिलेले आहे. त्यांचेविरुध्द गुन्हा दाखल झालेला आहे व त्यामुळे गुन्हयाच्या तपासाच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन देणे योग्य नसल्यामुळे अधिनियमाच्या कलम कलम 8 (1) (ज) प्रमाणे त्यांना कळविण्यात आलेले होते. थोडक्यामध्ये खुलाशावरुन असे दिसते की दि. 5.12.2006 रोजी विषेश पथकाने अपिलार्थीचे राहते घराची आकस्मीक तपासणी अपिलार्थी व पंचाचे समक्ष केली होती. सदरहू तपासणी मध्ये विज चोरी होत असल्याचे आढळून आले होते. विजेच्या चोरीच्या पुढील कार्यवाही करीता ग्राहकाचे, अपिलार्थीचे येथील मिटर व ज्या साधना द्वारे तो विजेची चोरी करीत होता ते जप्त करण्यात आले. अपिलार्थीस निर्धारण अधिका–याने विज चोरी बाबतचे देयकाचे निर्धारण करुन अपिलार्थीने एकूण 2,99,385/– रुपयाचे विज चोरी केल्या बाबत निर्धारण केले तसेच

विज चोरीचा गुन्हा आपसी तडजोडी बाबत विद्युत कायदा 2003 चे कलम 152 अन्वये 4000/– प्रति किलो व्हॅट हया दाराने 12.114 के.डब्लू. म्हणजेच 13 के.डब्लू. करिता आपसी तडजोडीचे (कंपाउंडींग) ची आकारणी केली. त्याबाबतचे देयके वेळोवेळी अपिलार्थीला देण्यात आले होते. अपीलार्थीचे पत्नीने अपिलार्थी व तिचे नावे एकत्रित असलेल्या जेथे दि. 5.12.07 रोजी तपासणी केली होती त्याच इमारती मध्ये नव्याने विज पुरवठा मागितला होता. महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग हयांनी निर्गमित केलेल्या नियमावलीतील नियम क्र. 10.5 अन्वये विजेची थकीत असलेली कोणतीही घेणे ही सदरहू इमारतीवर बोजा म्हणून गृहीत धरण्याचे नियम करुन दिलेले आहे. अपिलार्थीकडून विज चोरीच्या बाबत येणे असलेली सर्व रक्कम (निर्धारण व आपसी तडजोडीची रक्कम) समाविष्ट करुन त्या नुसार अपिलार्थीचे पत्नास उत्तरवादी हयांचे पत्र दि. 25.1.07 नुसार सुचित केले होते. तसेच अपिलार्थीस दि. 7.2.07 चे अर्जा नुसार त्याचे विज देयकाचे खतावणीची प्रतही पुरविण्यात आली होती. अपिलार्थीने दि. 5.12.07 रोजी केलेल्या तपासणीचे वेळी दिलेल्या संमतीनुसार विज चोरीच्या झालेल्या नुकसानीचा भरणा उत्तरवादी हयांचे कार्यालयाला केला नाही. तसेच विज चोरीबाबत दाखल होणार असलेल्या गुन्हयाच्या आपसी तडजोडीच्या रकमेचाही भरणा केला नव्हता. म्हणून उत्तरवादी हयांचे कार्यालया मार्फत अपिलार्थीचे विरुध्द विद्युत कायदा 2003 चे कलम 135 (अ) व (ब) अन्वये विज चोरी बाबत रामदास पेठ पो. स्टे. अकोला येथे दि. 16.12.06 रोजी पो.स्टे. मध्ये फिर्याद नोंदविण्यात आली त्या नुसार रामदास पेठ पो. स्टे. यांनी अपिलार्थीचे विरुध्द प्रथमवर्दी क्र./गुन्हा क्र. 3150/06 अन्वये विज चोरीचया गुन्हयाची नोंद अपिलार्थीचे विरुध्द घेतली व पुढे तपास करुन वि. जिल्हा व सत्र तथा विशेष न्यायाधिश, अकोला हयांचे कोर्टात विशेश फो.प्रक.क्र. 43/07 अन्वये प्रकरण दाखल केले आहे. दि. 13.2.07 रोजी अपिलार्थीने त्याचे इमारती मध्ये असलेले 30 एम्पीयर क्षमतेचे मिटर हे 12.114 के.डब्लू. चा भार कसा सहन करु शकते हया बाबतचे

स्पष्टीकरण उत्तरवादी क्र. 1 हयांचे कडून माहितीचे अधिकाराचे अंतर्गत मागितले. सदरहू स्पष्टीकरण हे अपिलार्थीचे विरुध्द दाखल असलेले विज चोरीच्या गुन्हयांमध्ये बचाव म्हणून वापरण्याची शक्यता असल्याने अशा प्रकारचे स्पष्टीकरण देणे माहितीचे अधिकाराचे कलम 7 जे, अन्वये नाकारण्याचे अधिकार माहिती अधिका–याला देण्यात आलेले आहे. माहितीचे अधिकाराच्या कायदयाचे तरतूदी अंतर्गत अर्जदारांना माहिती विचारण्याचा अधिकार दिलेला आहे परंतू स्पष्टीकरण मागण्याचे अधिकार दिलेले नाही. उत्तरवादी क्र. 1 हयांनी सदरहू तरतूदीचे अंतर्गत अपिलार्थीचा अर्ज कायदेशिररित्या नामंजूर केलेला आहे असा खुलासा सादर केलेला आहे.

उत्तरवादी यांच्या दिलेल्या खुलाशाचा विचार केल्यास उत्तरवादी यांनी दिलेले उत्तर हे योग्य दिसून येते. व हे विज चोरी प्रकरण असल्यामूळे तपास कामात कोणत्याही प्रकारचा अडथळा येवू नये याकरीता अधिनियमाच्या कलम कलम 8 (1) (ज) चा आधार माहिती नाकारण्यास घेता येतो. व त्यामुळेच उत्तरवादी यांनी सद्‌भावनेने अशा प्रकारचा निर्णय दिलेला दिसून येतो. त्यामध्ये मुद्दाम, जाणुन बुजुन माहिती उपलब्ध करुन देण्याविषयी टाळाटाळ केलेली आढळून येत नाही. अपीलकर्ता यांनी सदरची माहिती व्यापक जन हिताच्या दृष्टीने न मागता स्वहिताच्या दृष्टीने मागितली आहे. विज देयक हे अवास्तव अवाजवी असेल व त्याकरीता माहिती मागितली असेल तर ती माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक असते. परंतु सदरचे प्रकरण विज चोरीच्या गुन्हयाची आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांनी दिलेला निर्णय हा योग्य आहे व त्यामुळे कोणत्याही प्रकारची कार्यवाही उत्तरवादीचे विरुध्द करण्याची आवश्यकता नाही. असे असले तरी अपीलकर्ता यांना त्यांच्या अर्जातील मुद्या क्र. 1 च्या संदर्भामध्ये रु. 2,99,385/– चे निर्धारण अधिका–याने कसे केले त्याबाबतचे विवरण उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून त्यांच्या दि. 14.2.2007 च्या अर्जातील मुद्दा क्र. 1 मध्ये रु. 2,99,385/– या रकमेच्या संदर्भामध्ये निर्धारण अधिका–याने केलेल्या निर्धारणाचे विवरण व विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठयाच्या इतर अटी विनियम 2005 मधील पृष्ठ क्र. 12 व 13 च्या छायांकित प्रति हा निर्णय मिळाल्यापासून तीन दिवसाचे आंत विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी. व त्याबद्यल अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे पोच द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord2.12–17

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1609/2007.**

श्री वसंतराव शारगंधर डांगे
रा. सराफ बाजार, रिसोड
ता. रिसोड जि. वाशिम ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री डी. के. देशपांडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्रादेशिक संचालक (नगरपालिका प्रशासन)
विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती
2) श्री एन. एस. पानझाडे
जन माहिती अधिकारी तथा
मुख्याधिकारी, नगर परिषद रिसोड
ता. रिसोड जि. वाशिम ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 11.6.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 23.3.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 4.11.2006 रोजी जन माहिती अधिकारी म्हणून मुख्याधिकारी, नगर परिषद रिसोड यांचेकडे माहिती अधिकारी अंमलबजावणी माहिती अधिकार अधिनियमानुसार जबाबदार अंमलबजावणी अधिकारी क्रमवारीने अंमलबजावणी अपीलीय प्राधिकरणाची हुद्या व पत्ते उदा. पहीले अपील – नावे हुद्या व पत्ते, दुसरे अपील – नावे हुद्या व पत्ते, तिसरे अपील – नावे हुद्या व पत्ते. माहिती हातोहात घेणार असे नमूद केले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 8.11.2006 रोजी मुख्याधिकारी तथा माहिती अधिकारी नगर परिषद रिसोड यांनी अपीलकर्ता यांना

''1) माहिती अधिकार अधिनियमानुसार जबाबदार अंमलबजावणी अधिकारी क्रमवारीने अंमलबजावणी अपीलीय प्राधिकरणाची हुद्या व पत्ते

पहीले अपील – मा. आयुक्त अमरावती विभाग अमरावती

दुसरे अपील – माहिती नाही

तिसरे अपील – माहिती नाही

वरील माहिती पुरविण्यात येते असे कळविलेले दिसून येते.'' सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 8.12.2006 रोजी अपीलीय प्राधिकरण नगर परिषद प्रशासन मा. उपायुक्त सामान्य प्रशासन यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक 23.1.2007 रोजी देण्यात आला असून अपीलार्थी यांना पहिले अपीलाबाबत माहिती दि. 8.1.2007 रोजी देण्यात आली. व तसेच दुसरे व तिसरे अपीलाबाबत माहिती नसल्याबाबत कळविले. दुसरे अपीलीच अधिकारी मा. माहिती आयुक्त, रवी भवन बंगला नंबर 8 नागपूर हे असल्याबाबत माहिती अपिलार्थीस देण्यात आली. त्यामुळे अपिलार्थीचे समाधान झाले असा निर्णय देवून अपील अर्ज नस्ती करण्यात आला असे दिसून येते. माहिती मिळाल्यावर सुध्दा सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी द्वितीय अपीलात कारणे खालीलप्रमाणे दिलेली आहेत. ''सदरच्या प्रथम अपीलाच्या सुनावणीकरीता अपीलकर्ता यांनी अपील मेमोमध्ये मुद्या क्र. 4 मध्ये दि. 9.1.2007 रोजी सुनावणीकरीता मुद्याम मुख्याधिकारी गैरहजर राहुन अधिकाराचा गैरवापर करुन इतर दोन कर्मचा–याची नियुक्ती केली, न. प. रिसोड जा. क्र. 48/2007 दि. 18.1.2007 आदेशाची अवहेलना, अधिकाराचा गैरवापर. मा. विभागीय आयुक्त साहेबानी अपीलार्थी व उत्तरार्थी हयांचे कसलेही लेखी जबाब नोंदलेले नाहीत. अपील नामंजुर का करण्यात आले ते समजले नाही. पुढील अपीलाची तारीख व अपील कोणाकडे दाखल करावे असे नमूद केलेले दिसून येते.'' मुख्याधिकारी, नगर परिषद रिसोड यांनी आयोगाकडे खालीलप्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे तो खालीलप्रमाणे. अपीलकर्ता अर्जदारास मागीतलेली माहिती असलेली माहिती देण्यात आली असून सुध्दा अर्जदाराने आपणाकडे अपील अर्ज दाखल केलेला असून अर्जदार हे अशा प्रकारचे अनेक अर्ज न.प. कडे वारंवार माहिती अधिकारात देत असून मुद्दाम फक्त त्रास देण्याच्या दृष्टीने वैयक्तीक आकसा पोटी शासकीय वेळ व श्रम वाया घालवित आहेत. अर्जदार हे कोणतीही माहिती विकासात्मक किंवा सार्वजनिक हिताच्या दृष्टीने मागणी करीत नसून ज्या बाबीचा अर्थबोध होत नाही अशी माहिती मागणी करुन प्रशासनाला वेठीस धरण्याचा प्रयत्न करीत असून या मागील अपीलकर्त्याचा उद्देश वेगळा दिसून येतो. वरील सर्व बाबी विचारात घेवून कर्मचा–यास विनाकारणच्या त्रासातून मुक्ती दयावी. व अशा प्रकारची माहिती मागून व अपील करुन शासनाची दिशाभुल करणा–या अर्जदारावर काही शासन स्तरावर पायबंध घालावेत व अपीलकर्त्याची अपील खारीज करावी असा खुलासा दिलेला आहे.

4. सदरच्या खुलाशामध्ये अपीलकर्ता यांच्या राज्य माहिती आयोगाकडील दि. 22.2. 2007 रोजी दाखल केलेल्या अपील क्र. 981/07 निर्णय दि. 8.2.2008 रोजी निकाली काढलेल्या अपीलाच्या संदर्भात हा सुसंगत आहे. सदरच्या अपीलाचे दि. 6.12.2006 रोजी

माहिती मागण्याच्या केलेल्या अर्जाच्या संदर्भात होते. त्याच दि. 6.12.06 च्या अर्जाच्या त्याच माहिती करीता अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे पुन्हा दि. 24.3.2007 रोजी अपील क्र. 1610/07 दाखल केले आहे. पुन्हा त्याच अर्जाच्या संदर्भातील त्याच माहिती करीता अपीलकर्ता यांनी दि. 4.4.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे अपील क्र. 1614/07 दाखल केले. अशा प्रकारचे स्वतंत्रपणे वेगवेगळया तारखांना अपील दाखल केले असल्यामुळे त्याच त्याच अर्जाच्या माहितीच्या संदर्भामध्ये राज्य माहिती आयोगाकडे सुध्दा वेगळे अपील दाखल केले असल्यामुळे स्वतंत्रपणे अशा प्रकारचे अपील सुनावणीस लावावी लागतात व त्यामुळे एकदा निर्णय झालेल्या अपीलाच्या संदर्भात सुध्दा पुन्हा पुन्हा अपीले सुनावणीस लागल्यास आयोगाचा पण वेळ जातो आणि खरोखर ज्यांना प्रामाणिकपणे माहिती उपलब्ध हवी असेल त्यांची अपीले मात्र सुनावणीस घेता येत नाहीत. व त्यामुळेच अपीलांचा प्रचंड आकडा हा प्रलंबित दिसतो. यावरुन वर नमूद केल्याप्रमाणे जो खुलासा दाखल करण्यात आला आहे तो खुलासासुध्दा योग्य वाटतो.

4. अपीलकर्ता यांनी दि. 4.11.2006 च्या अर्जामध्ये जी माहिती मागितलेली आहे ती माहिती ही माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतूदीमध्ये सुध्दा आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांना सदरची माहिती ही अधिनियमाच्या तरतुदींचे वाचन करुन सुध्दा घेता आली असती किंवा सदरची माहिती ही प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये दर्शनी भागात लावण्याचे आदेश दिले असल्यामुळे त्या ठिकाणी जावून अपीलकर्ता यांना ती माहिती उपलब्ध करुन घेता आली असती व तशी दर्शनी भागात लावलेली नसती तर राज्य माहिती आयोगाकडे अधिनियमाच्या कलम 18 प्रमाणे तक्रार करता आली असती. पण तसे न करता त्यांनी माहितीच्या अधिकारामध्ये अर्ज करुन सदरची माहिती मागितली. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपीलीय अधिका–याची माहिती दिलेली आहे.

मात्र द्वितीय अपील याबद्यलची माहिती त्यांनी दिलेली नाही. अर्थातच जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या निर्णयाच्या विरुध्द ज्यांच्याकडे प्रथम अपील दाखल करावयाचे असते त्यांची माहिती त्यांनी दिलेली आहे. वास्तविक तिसरे अपीलाची तरतुदी ही अधिनियमात नाही. व त्यामुळे अशा प्रकारची माहिती ही त्रास देण्याच्या उद्येशाने मागितलेली दिसून येते. संसेदेने किंवा राज्य विधान मंडळाने कोणतेही अधिनियम पारीत केल्यावर तो जनतेच्या माहितीकरीता राजपत्रात प्रसिध्द केला जातो व राजपत्रात प्रसिध्द केल्यावर त्या कायद्याची संपूर्ण माहिती हे प्रत्येकाला आहे असे गृहित धरले जाते. अपीलकर्ता यांना ज्याअर्थी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या अंतर्गत माहितीचा अर्ज अ जोडपत्रात केलेला आहे त्याअर्थी त्यांना त्या कायदयाची संपूर्ण माहिती आहे. असे असून सुध्दा त्यांनी ही माहिती मागितली. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये त्यांना द्वितीय अपीलाच्या संदर्भामध्ये माहिती दिलेली आहे व त्यामुळे त्यांचे अपील मेमोमध्ये द्वितीय अपील कोठे दाखल करावे ही माहिती दिली नाही हे त्यांचे म्हणणे खरे नाही. असे असले तरी जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाच्या तरतुदींची माहिती करुन घेवून दुस–या अपिलाच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन देले असते तर ते अधिक संयुक्तीक व प्रगल्भता दर्शविणारे झाले असते. जरी त्यांनी ती उपलब्ध करुन दिली नाही तरी माहिती अपूर्ण आहे असे म्हणता येत नाही. व त्यामुळे त्यांना दोषी धरता येत नाही. त्यामुळे प्रथम अपीलाच्या निर्णयाविरुध्द प्रथम अपील आणि द्वितीय अपील कोणत्या अधिका–याकडे दयावयाची ही माहिती त्यांना माहिती अधिकारी व प्रथम अपीलाच्या निर्णयातून उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1)   अपीलकर्ता यांना माहिती अधिकारी व प्रथम अपीलाच्या निर्णयामधून माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

2)   अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.18–23

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1610/2007, 1614/2007.**

श्री वसंतराव शारगंधर डांगे
रा. सराफ बाजार, रिसोड
ता. रिसोड जि. वाशिम ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री डी. के. देशपांडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्रादेशिक संचालक (नगरपालिका प्रशासन)
विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती
2) श्री एन. एस. पानझाडे
जन माहिती अधिकारी तथा
मुख्याधिकारी, नगर परिषद रिसोड
ता. रिसोड जि. वाशिम ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 11.6.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी अनुक्रमे दिनांक 24.3.2007 व दि. 4.4.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे दोन द्वितीय अपीले माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दाखल केलेली आहेत. सदरच्या द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपील क्र. 1610/2007 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 6.12.2006 रोजी जन माहिती अधिकारी म्हणून मुख्याधिकारी, नगर परिषद रिसोड यांचेकडे आपले दि. 4.11.03 चे पत्र जा.क्र.798 मा. जिल्हाधिकारी वाशिम हयांना कोणत्या नगर परिषद कायदा व नियमा अंतर्गत आपण माझी सदरहु पत्रामध्ये बदनामी करण्यात आली. त्या अनुषंगाने कोणत्या कायदेविषयक आपण पत्र लिहिले. त्याबाबत भारतीय व कायदा नियमाची स्पष्टीकरण करण्यात यावे. (तसेच)

3. अपील क्र. 1614/2007 मध्ये जोडपत्र 'अ' दि. 7.12.2006 मध्ये आपले दि. 4.11.03 चे पत्र जा.क्र.798 दि. 4.11.03 मे. जिल्हाधिकारी वाशिम हयांना कोणत्या नगर परिषद कायदा व नियमा अंतर्गत आपण माझी सदरहु पत्रामध्ये बदनामी करण्यात आली. त्या अनुषंगाने कोणत्या कायदेविषयक आपण पत्र लिहिले. त्याबाबत भारतीय व कायदा नियमाची स्पष्टीकरण करण्यात यावे अशी माहिती मुख्याधिकारी, नगर परिषद रिसोड यांचेकडे अपीलकर्ता यांनी मागितलेली आहे. सदरच्या दि. 6.12.2006 च्या अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की एकच अर्जा च्या छायांकित प्रतीच्या आधारावर अपीलकर्ता यांनी तीन अपीले राज्य माहिती आयोगाकडे वेगवेगळया तारखांना दाखल केलेली आहेत. यापुर्वी सुध्दा अपील क्र. 981/07 मध्ये सदरचे अपील 22.2.2007 रोजी दाखल केले होते व त्यामध्ये सुध्दा दि. 6.12.2006 रोजीच्या माहितीच्या अ जोडपत्रामध्ये माहिती '' आपले दि. 4.11.03 चे पत्र जा.क्र.798 दि. 4.11.03 मे. जिल्हाधिकारी वाशिम हयांना कोणत्या नगर परिषद कायदा व नियमा अंतर्गत आपण माझी सदरहु पत्रामध्ये बदनामी करण्यात आली. त्या अनुषंगाने कोणत्या कायदेविषयक आपण पत्र लिहिले. त्याबाबत भारतीय व कायदा नियमाची स्पष्टीकरण करण्यात यावे. माहिती हातोहात (व्यक्तीशः) घेणार असे नमूद केलेले आहे. ''हीच माहिती मागीतली होती. सदरच्या अपीलाचा निर्णय दि. 8.2.2008 रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही अधिनियमाच्या तरतुदींच्या कार्यकक्षेत (व्याप्ती) येत नसल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे असा निर्णय आयोगाने दिलेला आहे.

यावरुन अपीलकर्ता यांच्या अपील क्र. 1610/2007 व अपील क्र. 1614/2007 ही वेगवेगळया तारखांना दाखल करण्याची मानसीकता दिसून येते व त्यामध्ये माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी, राज्य माहिती आयोग यांचा विनाकरण वेळ घेवून वेठीस धरण्याची प्रवृत्ती दिसून येते. व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी दोनही अपीलाच्या संदर्भामध्ये जो खुलासा दाखल केलेला आहे त्यामध्ये उपरोक्त संदर्भांकित विषयानुसार अपीलकर्ता अर्जदार यांनी माहिती अधिकारात मागितलेले दि. 6.12.2006, 15.1.2007 व 2.3.2007 रोजी मागितलेली माहिती नगर परिषदेने अनुक्रमे 1) न.प्र. पत्र क्र. 17/07 दि. 15.12.07 2) न.प्र. पत्र क्र. 48/07 दि. 18.1.07 3) न.प्र. पत्र क्र. 76/07 दि. 13.3.07 नुसार देण्यात आली असून सुध्दा अपील अर्जदार हे वरील माहिती विरुध्द प्रथम अपीलीय अधिकारी अमरावती यांचेकडे अपीलात गेले होते. त्यानुसार प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे सुध्दा अपीलकर्ता अर्जदार यांचे अपील खारीज झालेले आहे. अपीलकर्ता अर्जदार हे अपीलात उपलब्ध असलेली माहिती न मागता अहवाल स्वरुपाची व प्रश्नोत्तर स्वरुपाची माहिती मागत असल्यामुळे अशा स्वरुपाची माहिती त्यांना देणे शक्य होत नाही. यावरुन असे दिसून येते की अपीलकर्ता अर्जदार हे आकसा पोटी व त्रास देण्याच्या दृष्टीने तीच तीच माहिती वारंवार मागणी करुन घेत असून शासनाचा वेळ व श्रम वाया घालीत आहे तरी आपणास विनंती करण्यात येत आहे की अशा प्रकारची चुकीची माहिती माहिती अधिकारात मागणी करणा–या व्यक्ती विरुध्द पायबंद घालण्यासाठी व कर्मचा–यांना अशा माहितीच्या जाचातून (त्रासातून) मुक्त करण्यासाठी शासनस्तरावर पायबंध घलावा व अपीलकर्ता अर्जदार यांचा अर्ज खारीज करावा'' हि विनंती केलेली दिसून येते. यावरुन सुध्दा अपीलकर्ता यांची मानसिकता व्यापक जनहितासाठी माहिती मागण्याची नसून सार्वजनीक प्राधिकरणाच्या अधिका–यांना वेठीस धरुन त्रास देण्याचे उद्येशानेच माहिती मागत आहे असे दिसते.

3. वास्तविक अपीलकर्ता यांनी दि. 6.12.06 च्या अर्जामध्ये जी माहिती मागितलेली आहे अशी ती माहिती ही अभिप्रायात्मक माहिती असून माहितीचा अधिकार अधिनियम 2005 मधील ''माहिती'' या संज्ञेच्या व्याख्येत येत नाही. ''माहिती'' याचा अर्थ सार्वजनिक प्राधिकरणामध्ये साहित्याच्या स्वरुपात उदा. अभिलेख, दस्तऐवज, टिपण्या, परिपत्रके इ. स्वरुपात जी माहिती उपलब्ध असेल त्या माहितीच्या छायांकित प्रति उपलब्ध करुन घेणे हे ''माहिती अधिकार'' या संज्ञेच्या व्याख्येत येते. परंतु अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती hypothetical आहे. व material form मध्ये नोदलेली आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील क्र. 981/07 हे निकाली काढण्यात आले. वास्वतिक अपीलकर्ता यांनी जे आयोगाकडे एकाच अर्जाच्या संदर्भामध्ये वेगवेगळया तारखांना अनेक अर्ज दाखल केलेली आहे त्याची माहिती स्वतःहून त्यांनी आयोगास द्यावयास पाहिजे होती. परंतु तसे न करता प्रत्येक अर्जाच्या संदर्भात तो वेगळा आहे. अशा प्रकारे एकाच माहितीच्या अर्जाच्या संदर्भामध्ये अनेक वेगवेगळी अपीले अपीलकर्ता यांनी दाखल केलेली असल्यामुळेच ज्यांना खरोखरच प्रामाणिकपणे माहिती मागावयाची आहे व त्यामुळे त्यांची आयोगाकडे अपीले ही प्रलंबित राहतात. व त्यामुळे आयोगापुढे प्रलंबित अपीलांचा प्रचंड आकडा दिसतो. त्यामुळे एकाच अर्जाच्या संदर्भामध्ये निर्णय दिलेला असतांना पुन्हा पुन्हा त्याच संदर्भामध्ये निर्णय हा योग्य नसल्यामुळे अपीलकर्ता यांची वरील दोनही अपीले ही खारीज करण्यास पात्र आहे. अपीलकर्ता यांची ही सवय निदर्शनास आली तरी सुध्दा वर नमुद केलेले सर्व कारणाकरीता हा द्यावा लागला व त्यावरुन असे दिसून येते की अपीलकर्ता यांनी तीनही अपीलाकरीता आयोगाचें तीन तास वाया गेलेले आहेत व त्या वेळेत इतर अजून तीन अपीले यांचे निर्णय करता आले असते. तसेच सार्वजनिक प्राधिकरणाचे अधिका-यांना तीन तीन वेळा रिसोड येथून 300/400 किलोमिटर पुन्हा पुन्हा यावे लागले आहे.

**आ दे श**

1) अपील क्र. 1610/2007 व अपील क्र. 1614/2007 हया अपीलामधील दाखल केलेल्या दि. 6.12.06 च्या अर्जाच्या संदर्भामध्ये अपील क्र. 981/07 मध्ये दि. 8.2.08 रोजी निर्णय दिलेला असून अपील निकाली काढण्यात आलेले असल्यामुळे सदरची दोनही अपीले ही खारीज करण्यात येत आहेत.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.24–28

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1613/2007.**

श्री अशोक कोंडजी मोरे
मु.पो. भोकरखेड नगर, कैलास नगर,
रिसोड ता. रिसोड जि. वाशिम ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री डी. के. देशपांडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्रादेशिक संचालक (नगरपालिका प्रशासन)
विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती
2) श्री एन. एस. पानझाडे
जन माहिती अधिकारी तथा
मुख्याधिकारी, नगर परिषद रिसोड
ता. रिसोड जि. वाशिम ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 11.6.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 20.3.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये व्दितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या व्दितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 16.7.2006 रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद रिसोड यांचेकडे नगर परिषद क्षेत्रात असलेल्या सर्व मालमत्ता धारकांची माहिती नगर परिषद स्थापन झाल्यापासून आजपर्यंत खालिलप्रमाणे विचारलेल्या सर्व माहितीप्रमाणे प्रत्येक मालमत्ता धारकांची माहिती पुरविण्याबाबत.

1) मालमत्ता धारकांचे नाव

2) मालमत्ता कमांक

3) रहिवाशी उपयोगाकरीता किंवा बिगर रहिवाशीकरीता

4) वार्ड कमांक

5) एकूण प्लॉटचे क्षेत्रफळ

6) एकूण बांधकामाचे क्षेत्रफळ

7) एकूण बांधकामाचे चटईक्षेत्र

8) मालमत्ता कर आकारणीसाठी केलेल्या झोनची माहिती

9) मालमत्ता बांधकाम प्रकार अ) सिमेंट कॉकेट ब) सिमेंट कॉकेट व दगडमातीचे बांधकाम क) दगड मातीचे ड) झोपडपट्‌टी

10) प्रती चौरसफुट लावलेला अपेक्षीत भाडे दर

11) नगर परिषद स्थापन झाल्यानंतर करण्यात आलेली कर आकारणी

12) मुख्याधिकारी यांनी आकारलेली कर आकारणी

(अपेक्षीत प्रती चौ.फुट भाडेनुसार)

13) मुख्याधिकारी यांनी आकारलेली कर आकारणीवर

(अपेक्षीत प्रती चौ.फुट भाडेनुसार) सहा. संचालक नगर रचना यांनी मंजुर केलेली कर आकारणी

14) सहा. संचालक यांनी घेतलेल्या सुनावणीनंतर कमी झालेले अपेक्षीत भाडे व त्यावर केलेली कर आकारणी

15) मालमत्ता कर अपील समतीने मंजुर केलेले अंतीम कर आकारणी योग्य मालमत्तेचे भाडे

16) कर अपील समितीमध्ये ज्यांनी आक्षेप घेतलेले नसेल त्यांना लावलेले कर आकारणी योग्य भाडे.

17) सर्व प्रक्रिया झाल्यानंतर लावण्यात आलेल्या वार्षीक कराची माहिती (मालमत्ता कर, वृक्षकर, शिक्षण कर, रोजगार हमी कर सहीत)

18) प्रत्यक्ष कर आमारणीचे दर म्हणजे मालमत्तेचे अपेक्षीत भाडयावर लावलेला मालमत्ता कर, शिक्षण कर, रोजगार हमी कर वृक्षकर

19) मालमत्तेच्या प्लॉटची मालकी हक्क म्हणजे शासकीय जमिनीवर अतिक्रमण करुन आहेत किंवा स्वतःच्या मालकीची जागा आहे.

20) नवीन मालमत्तेवर आकारण्यात आलेला कर (यांची अजून नगर रचना कार्यालयाकडून अपील सुनावणी झालेली नाही व तसेच मालमत्ता कर अपील समितीकडून सुनावणी झालेली नाही अशा व्यक्तींना लावलेला नवीन मालमत्तेवरचा कर

21) मोकळया प्लाटधारकावरील लावलेला कर

22) अपील माहिती अधिका–यांचे नाव व पत्ता.

सदरची माहिती ही व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले असून लागणारा सर्व खर्च मी भरण्यास तयार आहे तो कळवावा दारिद्रय रेषेचे प्रमाणपत्र जोडले आहे. त्याचा क्रमांक 82 आहे.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 2.8.06 रोजी माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भामध्ये उत्तर दिलेले आहे परंतु सदरच्या उत्तराने अपीलकर्ता यांनी दि. 16.8.2006 रोजी प्रथम अपील दाखल केले असे दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दि. 12.9.06 रोजी देण्यात आलेला असून दि. 16.7.06 रोजी दिलेल्या अर्जानुसार अर्जातील बाब क्र. 1 ते 22 ची माहिती 15 दिवसाचे आंत देण्याबाबत सुचीत करण्यात आले. सदरच्या प्रथम अपीलाच्या आदेशाप्रमाणे दिनांक 13.9.06

रोजी माहिती उपलब्ध करुन घेण्याच्या करीता अपीलकर्ता यांना पत्र दिलेले होते. परंतु त्यानंतर अपीलकर्ता यांनी कोणत्याही प्रकारचा संपर्क साधला नाही व माहिती घेण्यास आले नाही व तरी सुध्दा दि. 20.3.2007 रोजी माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदरच्या द्वितीय अपीलच्या संदर्भामध्ये मुख्याधिकारी, नगर परिषद रिसोड यांनी दि. 9.8.2006 रोजी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला आहे.

उपरोक्त संदर्भांकित विषयानुसार अपीलकर्ता अर्जदार यांनी दि. 17.7.2006 रोजी माहिती अधिकारात मागीतलेली 1 ते 15 व 1 ते 22 मुदयाची माहिती ही नगर परिषद स्थापनेपासून आजपर्यंत म्हणजे 16 वर्षा पूर्वीपासून मागीतलेली असून सदहू माहिती अतिशय क्लीष्ट व जास्त प्रमाणात फार वर्षापासुनची असल्यामुळे व अपीलकर्त्यानी सदहू माहिती विहित मुदतीत मागणी केली असल्यामुळे मागीतलेली माहिती न.प. अभिलेखात त्यांनी मागीतलेल्या विशिष्ट नमुण्यात उपलब्ध नसल्यामुळे सदहू माहीती विहित मुदतीत देणे शक्य नसल्यामुळे याबाबत न.प.ने पत्र क.563 दि26.7.06 नुसार मा. आयुक्त माहिती आयोग मुंबई या वरीष्ठांचे मार्गदर्शन मिळणे बाबत पत्र दिले होते. तसे अपीलकर्त्यास न.प. पत्र क. 559 दि. 26.7.06 नुसार कळविण्यात आले होते. तसेच अपीलकर्त्याने मागीतलेली माहिती त्यांनी मांडणी केलेल्या मुदयात नगर परिषदेच्या अभिलेखात उपलब्ध नसल्यामुळे व वरील माहिती त्यांना विहीत मुदतीत देणे शक्य होत नसल्यामुळे अपीलकर्त्यास या बाबत आपण न.प.त उपलब्ध असलेल्या अभिलेखाची पाहणी करुन अवलोकन करावे व उपलब्ध अभिलेखाची माहितीची मागणी करावी जेणकरुन ती देणे शक्य हाईल. या बाबत न.प. पत्र क.587/06 दि.2.8.06 रोजी अपीलकर्त्यास कळविण्यात आले होते. तरीसुध्दा अपीलकर्त्यानी अपीलीय अधिकारी उप आयुक्त अमरावती यांचेकडे दि. 16.8.06 रोजी अपील दाखल केली होती. त्यानुसार सदहू अपीलावर दि. 12 सप्टें 2006 रोजी आदेश होवून वरील 1 ते 15 व 1 ते 22

मुदयाची माहिती देण्याबाबत आदेश पारीत करण्यात आले होते. त्यानुसार न.प.कडे उपलब्ध असलेल्या अभिलेखाच्या झेरॉक्स प्रति अपीलकर्त्यांनी स्वखर्चाने काढून उपलब्ध करुन घ्यावी असे ठरविण्यात आले होते. त्यानुसार न.प.पत्र क्र.739/06 दि. 13.9.06 नुसार अपीलकर्त्यास कळविण्यात आले होते. तसेच वरील माहितीचे अभिलेखाचे झेराक्स प्रति काढून घेण्याकरीता व रेकॉर्ड उपलब्ध करुन देण्याकरीता न.प. वसुंली लिपीक श्री एस.जे.मिसाळ यांची सुध्दा वरील पत्रानुसार नियुक्ती करण्यात आली होती. परंतू अपीलकर्ता अर्जदार यांनी वरील माहिती उपलब्ध करुन घेण्यासाठी न.प.मध्ये तसेच श्री मिसाळ यांच्याकडे कोणत्याही प्रकारचा संपर्क केलेला नसुन अथवा मुख्याधिकारी यांचेशी सुध्दा माहिती मिळणे बाबत मागणी केलेली नसतांनी सुध्दा अपीलकर्ता अर्जदार यांनी अपीलीय अधिकारी अमरावती यांचेकडे अपील दाखल करुन यांचेकडे सदर्हू माहिती न मिळाल्या बद्यल अपील दाखल केली होती. त्या अपीलावर दि. 9 मे 2007 रोजी आदेश पारीत होवून ज्या माहितीच्या सत्यप्रती देणे शक्य आहे त्या उपलब्ध करुन देण्याबाबत फी आकारणी संबंधीचा निर्णय त्यांच्या स्तरावर घेण्यात येवून तात्काळ पुरविण्यात याव्यात असा आदेश पारीत झाला होता. सदर्हू आदेशान्वये अपीलकर्ता अर्जदार यांना न.प.पत्र क्र. 427/2007 रोजी नुसार सदर्हू माहिती बाबत चर्चा करण्याकरीता न.प.मध्ये मुख्याधिकारी यांचेकडे बोलाविले असता अपीलकर्ता अर्जदार यांनी सदर्हू पत्र वाचून घेण्यास नकार दिला. त्यानंतर सुध्दा मी बरेचवेळा त्यांना तोंडी वरील माहिती बाबत विचारणा केली असता त्यांनी टाळाटाळीचे उत्तरे दिली. व मला माहितीची आवश्यकता नसुन फक्त कर्मचा–यास त्रास देण्यासाठीच मी अर्ज केलेले आहेत अशी उत्तरे दिली. यावरुन असे दिसून येते की अपीलकर्ता अर्जदार हे मुद्यामून फक्त त्रास देण्याच्या दृष्टीकोणातून अशा प्रकारचे माहिती अधिकारात अर्ज देवून शासकीय वेळ व श्रम वाया घालवीत आहेत. सदर्हू माहिती देण्याबाबत न.प.ला कोणतीही हरकत नसून सदरर्हू माहिती फार मोठया प्रमाणात असल्यामुळे व अंदाजीत रु. 50000/– पर्यंत सदर्हू

माहितीच्या झेरॉक्स प्रति होत असल्यामुळे सदर्हू माहितीच्या झेरॉक्स प्रति काढून घेण्याची जबाबदारी अपीलकर्ता अर्जदारावर असल्यामुळे त्यांच्या अनुपस्थितीत सदर्हू झेरॉक्स काढणे शक्य होत नाही. तसेच अर्जदार न.प.कार्यालयात सदर्हू माहित बद्यल कुठल्याही प्रकारची चर्चा करण्यास येण्यास तयार नसून सदर्हू माहिती मी त्यांना प्रत्यक्ष अभिलेख्यात पाहण्याबाबत सुध्दा विनंती केलेली आहे. तरी सुध्दा अर्जदार हा कुठल्याही बाबीसाठी तयार नाहीत. यावरुन असे दिसून येते की अपीलकर्त्यास माहितीची आवश्यकता नसुन फक्त त्रास देणे हाच उद्येश असल्याचे दिसून येते. कारण ते न.प.ची कोणताही संपर्क न करता आपणाकडे अपील अर्ज दाखल करीत आहेत. अपीलकर्त्यांनी कोणत्याही एका ठरावीक मुद्यावर उपलब्ध अभिलेख्यातील माहिती मागितल्यास ती देणे शक्य हाईल परंतु अपीलकर्त्यानी न.प.स्थापने पासूनची मागील 16 वर्षाची माहिती मागीतली आहे व ती फार क्लीष्ट व मोठयाप्रमाणत असल्यामुळे त्यांनी मागीतलेल्या नमुन्यात सदर्हू माहिती अभिलेख्यात उपलब्ध नसल्यामुळे व अपीलकर्त्यांनी सदर्हू माहिती स्वखर्चाने काढून घेण्याबाबतची संमती दिल्यामुळे तसे त्यांना अगोदर कळविण्यात आले होते. तरी सुध्दा त्यांनी न.प.कडे कुठल्याही प्रकारचा संपर्क न करता फक्त अपील करणे एवढाच उद्येश समोर ठेवला आहे यावरुन असे दिसून येते की अपीलकर्त्यास माहितीची आवश्यकता नसून फक्त कर्मचा–या वेठीस धरुन त्रास देणे व शासकीय वेळ व श्रम वाया घालविणे असा दिसतो. माहिती न देणे हा न.प.चा मुळीच उद्येश नसून अभिलेख्यात उपलब्ध असलेली कोणतीही माहिती न.प.देण्यास तत्पर तयार आहे. तरी आपणास विनंती करण्यात येते की वरीत सर्व बाबीचा विचार करुन अपीलकर्ता अर्जदार यांचे अपील खारीत करण्यात यावे तसेच मोठया प्रमाणात मागीतलेल्या माहिती देण्याबाबत प्रशासनाने काय कार्यवाही करावी यांचे मार्गदर्शन करावे ही विनंती.

तसेच वर नमुद केल्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी माहिती उपलब्ध करुन घेण्यास कोणत्याही प्रकारचा संपर्क साधलेला नसल्यामुळे अपीलकर्ता यांना सदरची माहिती आता

उपलब्ध करुन घेण्याची आवश्यकता नाही तसेच अपीलकर्ता यांनी त्यांच्या अर्जामध्ये लागणारा सर्व खर्च भरण्यास तयार आहे तो कळवावा तसेच दारिद्रय रेषेचे प्रमाणपत्र जोडले आहे असेही नमूद केले आहे. दारिद्रय रेषेचे प्रमाणपत्र 19982–83 प्रमाणे श्री कोंडु अंबुजी मोरे (मयत) अशा प्रकारचे आहे. व त्यात श्री अशोक कोंडुजी मोरे वय 30 मुलगा असे दिलेले आहे. सदरचे प्रमाणपत्र विस्तार अधिकारी (सांख्यिकीय) पं. स. रिसोड यांनी दिलेले आहे. व तसेच सदरचे दारिद्रय रेषेचे प्रमाणपत्र अपीलकर्ता यांच्या स्वतःच्या नावाने नाही. व त्यामुळे सदरचे दारिद्रय रेषेचे प्रमाणपत्र ग्राहय धरता येणार नाही. तसेच त्यांनी खर्च भरण्यास तयारी दर्शविली आहे. माहिती ही व्यक्तिशः घेणार असे नमूद केले आहे. माहिती घेण्यास संपर्क सुध्दा साधला नाही व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे. अपीलकर्त्याच्या राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या कागदपत्रामध्ये वर नमूद केल्याप्रमाणे दि. 16.7.06 रोजी अपील क. 1611/07 मध्ये श्री रमेशचंद्र शंकरलाल साबू स्विकृत नगरसेवक व त्यांच्या पत्नी अध्यक्ष नगरपालीका यांनी सुध्दा दाखल केलेल्या अर्जाच्या प्रतिप्रमाणे व माहिती सुध्दा संपूर्ण तीच मागितलेली आहे. व आजच सदरच्या अपीलांची सुनावणी सुध्दा घेण्यात आली व अपीलकर्ता व डॉ. रमेशचंद्र शंकरलाल साबू व सौ. साबू यांनीही एकत्रितरित्या तीच माहिती मागितलेली दिसून येते. त्याकरीता अपील क. 1611/07 मध्ये माहिती मागण्याचा उद्येश हा समोर आलेला आहे. तसेच आयुक्त राज्य माहिती आयोग यांचेकडे दि. 26.7.06 रोजी श्री अशोक कोंडुजी मोरे यांचा अर्ज दि. 17.7.06 च्या संदर्भामध्ये खालीलप्रमाणे मार्गदर्शन मागीतलेले दिसून येते.

उपरोक्त संदर्भाकित विषयानुसार अर्जदार अशोक कोंडुजी मोरे हयांनी दिनांक 17.7.06 रोजी माहिती अधिकारात दोन अर्ज सादर केला असून अर्जामध्ये रिसोउ न.प. ची स्थापना झाल्यापासून म्हणजेच सन 1989–90 ते सन 2006 पर्यंतची न.प.क्षेत्रातील आतापर्यंत झालेल्या संपुर्ण नोंदी केल्याची संपुर्ण कागदपत्रासह व्यापक प्रमाणात माहिती आणि दुसरा अर्ज न.प.क्षेत्रातील संपुर्ण मालमत्ता आकारलेल्या कर आकारणी बाबत प्रती

मालमत्ता धारकाची यादी संपुर्ण अर्जात दिलेल्या मुदयासह एकुण मागील 17 वर्षाची सोबतच्या अर्जानुसार मागीतली असून सदरहु माहिती अतिशय क्लिष्ट स्वरुपाची असून संपुर्ण माहिती तयार करुन देण्याकरीता व्यापक कर्मचारी वर्ग व 1 वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त कालावधी लागण्याची शक्यता आहे त्यामुळे न.प.ची इतर वसुलीची कामे व फेरमुल्यांकनाची कार्यवाही करणे शक्य होणार नाही व न.प.चे दैनंदिन कर वसुली चे कामात व कार्यालयीन कामाकाजात अडचण निर्माण होवून दैनंदिन कामात विलंब होईल तसेच न.प.चे आर्थीक नुकसान होण्याची शक्यता आहे. अर्जदाराने मागीतलेली माहिती हि ढोबळ स्वरुपात मागीतली असुन एखादया विशिष्ट प्रकरण नमुद करुन त्या प्रकारची माहिती अज्रदारस देता आली असती. अर्जदाराने मागीतलेली माहिती देणे शक्य होणार नाही याअगोदर सुध्दा अशाच प्रकारची व्यापक स्वरुपाची माहिती डॉ. रमेशचंद्र शंकरलाल साबु यांनी मागीतली असून फक्त अर्जदाराचे नाव बदलुन परत तीच माहिती अर्जदाराने मागीतली आहे यावरुन असे दिसून येते की हि माहिती हेतुपुरस्सर व न.प. कर्मचा–याबद्यल आकस भवनेपोटी व खोडसाळ पणाने मागीतल्याची दिसते कारण डॉ. रमेशचंद्र शंकरलाल साबु हे विदयमान नगराध्यक्षाचे पती असुन हे न.प.चे विदयमान स्विकृत सदस्य आहे. त्यामुळे राजकीय दृष्टीने कर्मचा–यांना त्रास देण्याकरीता हे अशा प्रकारचे माहिती दुस–याच्या नावाने अर्ज करुन वारंवार मागणी करीत आहेत असे दिसुन येते. त्यामुळे असे निदर्शनास येते की हे माहिती अधिकाराचा दुरउपयोग करीत आहेत. तरी सदर्हु अर्जदारांनी माहिती अधिकारात केलेला अर्ज खारीज करुन योग्य ते मार्गदर्शन करण्यात यावे हि विनंती.

व त्याकरीता त्यांना दि. 2.8.2006 रोजी वरील विषयाच्या संदर्भाकीत अर्जास अनुसररुन आपणास कळविण्यात येते की नगर पालिकेची स्थापना 16 वर्षापूर्वीची आहे तेव्हापासुनच्या काळाचे अभिलेख शोधुन आपणास माहिती पुरविणे नियमाअंतर्गत विहित मुदतीत शक्य होत नाही. शिवाय आपण जे मुद्ये मांडुन माहितीची मागणी केली आहे

तशा विषयानुसार नगर परिषदेने अभिलेख रचना केलेली नसल्याने आपणास निश्चित स्वरुपात कशी व कोणती माहिती द्यावी याचा बोध होत नाही. म्हणुन आपणास विनंती करण्यात येते की आपण नगर परिषदेत उपलब्ध असलेल्या अभिलेखाची निरीक्षणे इत्यादी घेवून अवलोकनाअंती विशिष्ट प्रकारच्या अभिलेखातील माहितीची मागणी केल्यास त्याबंधाने दस्तऐवजासह माहिती पुरविणे शक्य होईल. त्या दृष्टीने आपण कार्यवाही करुन सहकार्य करावे असे कळविलेले दिसून येते व त्यामुळे माहिती देण्याची टाळाटाळ केलेली आहे असा निष्कर्ष काढता येत नाही व त्यामुळे सुध्दा अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे. वास्तविक अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे तीच माहिती वर नमूद केल्याप्रमाणे डॉ. रमेशचंद्र शंकरलाल साबू यांनीसुध्दा मागीतलेली आहे व यावरुन हा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चा गैरवापरच अपीलकर्ता व डॉ. साबू व सौ. साबू संगनमताने करीत आहेत असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही व अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांनी माहिती उपलब्ध करुन घेण्याकरीता कोणत्याही प्रकारचा संपर्क साधलेला नसल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती आवश्यकता नाही असे दिसून येत असल्याने सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )<br>
राज्य माहिती आयुक्त,<br>
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1618/2007.**

श्री सुभाष महादेव कोकणे
रा. दहातोंडा पो. हातगाव
ता. मुर्तिजापूर जि. अकोला ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अकोला
2) श्री आर. के. देशमुख
जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी
पंचायत समिती मुर्तिजापूर
ता. मुर्तिजापूर जि. अकोला ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 12.6.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 3.3.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. उत्तरवादी हजर आहेत. अपीलकर्ता विनाअनुमती गैरहजर आहे व संबंधित सचिव ग्रामपंचायत दहातोंडा हे हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 7.11.2006 रोजी गट ग्रामपंचायत दहातोंडा हद्दीतील सरकारी रस्ता जागेतील अतिक्रमण काढून टाकण्या संबंधीच्या कार्यपूर्तीचा अहवाल. वि. उपविभागीय अधिकारी मुर्तिजापूर यांचे फाईल वरील अपिल क्र. एल.ई.एन. /39/दाहातोंडा–4/01–02 सुभाष विरुध्द नामदेव + 2 प्रकरणी दि. 30.4.02 च्या आदेशाची अंमलबजावणी करुन वादग्रस्त सरकारी रस्ता जागेतील अतिक्रमण काढल्या बाबतचा अहवाल मिळण्याबाबत वा त्या संबंधी केलेल्या कार्यवाहीबाबत. सदरच्या प्रकरणातील नायब तहसिलदार मुर्तिजापूर, सरपंच, सचिव ग्रा. पं. दहातोंडा तसेच गट विकास अधिकारी पं. स. मुर्तिजापूर, उपविभागीय अधिकारी मुर्तिजापूर यांचेशी केलेला 8 पत्रांचा पत्रव्यवहारचा संदर्भ देवून अतिक्रमण केव्हा काढले याबद्यलची कार्यवाही मागितलेली दिसते.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 22.11.06 रोजी गट विकास अधिकारी पं. स. मुर्तिजापूर यांनी श्री पी.व्ही.दुधे विस्तार अधिकारी पं. यांना माहिती उपलब्ध करुन देण्यासंदर्भात पत्र दिलेले दिसून येते. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 4.1.2007 रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने पुन्हा दि. 19.1.2007 रोजी सचिव ग्रा. पं. दहातोंडा यांना माहिती उपलब्ध करुन देण्यास पत्र दिलेले दिसून येते. त्यानंतर दि. 3.2.2007 रोजी पुन्हा गट विकास अधिकारी यांनी श्री पी.व्ही.दुधे विस्तार अधिकारी पं. यांना माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता पत्र दिलेले दिसते. तसेच दि. 15.2.2007 रोजी सचिव गट ग्रा. पं. दहातोंडा यांनी अपीलकर्ता यांना दहातोंडा येथील आपण रस्त्याच्या अतिक्रमणाबाबत माहिती अधिकारात माहिती मागितलेली आहे. सदर माहिती बाबतची नस्ती ग्रा.पं.ची रेकॉर्डची पडताळणी केली असता आढळून आली नाही. सदर नस्ती मिळताच आपण मागीतलेली माहिती आपणास तात्काळ पुरविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते व त्यावर प्रत

मिळाली म्हणून किरण महादेव कोकणे अशी पोच दिलेली दिसते. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 24.1.2007 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी गट विकास अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसतात. व त्या आदेशानुसारच गट विकास अधिकारी यांनी दि. 21. 1.2007 चे पत्र दिलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध दिली नाही याबद्यल गट विकास अधिकारी यांनी असे सांगितले की सदरची माहिती ग्रा.पं. स्तरावरील असल्यामुळे व तहसिलदार यांनी सचिव ग्रा.पं. यांना सदरच्या प्रकरणी कार्यवाही करण्याकरीता पत्रव्यवहार केलेला असल्यामुळे सचिव ग्रा.पं. यांना त्याबाबत पत्रे देवून माहिती उपलब्ध करुन द्या असे कळविले होते. परंतु सचिव ग्रा.पं. दहातोंडा यांचे म्हणणे असे आहे की ते फेब्रुवारी 2006 मध्ये गट ग्रा.पं. दहातोंडा येथे कार्यरत झाले. त्यापूर्वीच्या अभिलेख, दस्तऐवजाचा प्रभार हा मागील सचिव यांनी त्यांना दिला त्यावेळेस सदरच्या प्रभारात सदरच्या प्रकरणातील कागदपत्रे नव्हती. त्यांच्या पुर्वी सुध्दा दोन सचिव त्यावेळेस कार्यरत होते व त्यामुळे उपविभागीय अधिकारी यांनी दि. 30.4.2002 रोजी कोणत्या प्रकारचे आदेश दिलेले आहेत व त्यावर कोणत्या प्रकारची कार्यवाही झाली ही माहिती उपलब्ध नसल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. या प्रकरणामध्ये संबंधित गट विकास अधिकारी यांना माहिती मागितल्या नंतर त्यांनी विस्तार अधिकारी यांना पत्र का दिले हे समजून येत नाही. माहिती ग्रामपंचायत स्तरावर होती तर ती माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता गट शिक्षणाधिकारी यांनीच माहिती अधिकारी म्हणून सचिव ग्रा.पं. यांना आदेश द्यावयास पाहिजे होते. तसेच अपीलकर्ता यांनी नायब तहसिलदार मुर्तिजापूर यांच्या पत्रव्यवहाराचा संदर्भ दिलेला आहे. याचा अर्थ नायब तहसिलदार मुर्तिजापूर यांनी सचिव, सरपंच ग्रा.पं.दहातोंडा यांचेशी जो पत्रव्यवहार

केलेला आहे त्यावरुन नायब तहसिलदार मुर्तिजापूर यांच्या कार्यालयातून सुध्दा सदरची माहिती उपलब्ध करुन घेता आली असती. परंतु तसेही प्रयत्न केले गेलेले दिसत नाही. व सदरची माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात संबंधित गट विकास अधिकारी हे गंभीर होते असेही दिसून येत नाही. सचिव, ग्रा.पं.दहातोंडा यांचेकडे प्रभार घेतांना कागदपत्रे मिळालेले नसतील तर ती कागदपत्रे ज्या सचिवाकडे कागदपत्रे असतील त्यांचेकडून घेवून उपलब्ध करुन घेवून पुरविण्याचा प्रयत्न केला गेलेला दिसत नाही. तरी पण सदरची माहिती ही नायब तहसिलदार मुर्तिजापूर यांचे कार्यालयात सदरच्या पत्राचा संदर्भ देवून माहिती उपलब्ध करुन घेता येईल व तसे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रयत्न केलेले नाहीत. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी नायब तहसिलदार मुर्तिजापूर यांचे कार्यालयातून अपीलकर्ता यांच्या दि. 7.11. 2006 च्या अर्जात दिलेल्या संदर्भावरुन हा निर्णय मिळाल्यापासून 30 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1616/2007.**

श्री ओमप्रकाश यशवंत सुरवाडे
मु. पा. बटवाडी ता. बाळापूर जि. अकोला ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एस. एस. अहमद
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा न्यायाधिश, जिल्हा व सत्र न्यायालय, आकोला
ता. जि. अकोला
2) श्री एस. एम. गुप्ते
जन माहिती अधिकारी तथा
प्रबंधक
जिल्हा व सत्र न्यायालय, आकोला
ता. जि. अकोला ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 12.6.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 10.4.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 13.2.2007 रोजी शासकीय माहिती अधिकारी म्हणून न्याय दंडाधिकारी कु. एस. एस. गाडीकर आकोट न्यायालय यांचेकडे ''125 सी.आर.पी.सी. अंतर्गत सविता विरुध्द नंदकिशोर अर्जदार तर्फे व. ह. जलतारे ॲड. गैरअर्जदार तर्फे ब्रिजमोहन गांधी व राजकुमार गांधी या केसचा दिलेला मराठीतून निकाल (स्वइच्छेने जी स्त्री माहेरी राहत असेल तिला खावटी मागण्याचा अधिकार नाही) यासह संपूर्ण केसच्या पूर्ण कागदपत्राच्या सत्यप्रती. टपालाद्वारे माहिती घेणार असे नमूद केले आहे. दारिद्रय रेषेखालील वर्गातील शुल्क No fees shall be charged from the person who are under BPL RTI Act 2005 असे नमूद केलेले आहे.

सदरच्या अर्जाच्या संदर्भामध्ये दि. 22.2.2007 रोजी दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) अकोट यांनी माहिती अधिकारी, (प्रबंधक) जिल्हा व सत्र न्यायालय आकोला यांचेकडे सदर अर्ज या न्यायालयाला डाकेद्वारे पाठविण्यात आला आहे. ''सदर अर्ज हा जिल्हा न्यायालय आकोला आदेश क्र. बी–1/20/2007 दि. 7.2.2007 प्रमाणे आपल्या अधिकारक्षेत्रात येत असल्यामुळे निकाली काढण्याकरीता आपल्याकडे वर्ग करण्यात येत आहे असे कळविलेले दिसते. जन माहिती अधिकारी यांनी सदरच्या अर्जाच्या संदर्भामध्ये खालीलप्रमाणे निर्णय दि. 7.3.2007 रोजी घेवून अपीलकर्ता यांना जा.क्र. 642 प्रमाणे रजिस्टर पोष्टाने कळविलेला दिसून येतो. <u>माहितीचा अधिकार प्रकरण क्र. 03/2007 आदेश</u>

अर्जदार ओमप्रकाश यशवंत सुरवाडे रा. बटवाडी ता. बाळापूर हयांनी दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) अकोट हयांचेकडे केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये अर्ज केल्याचे दिसुन येते. सरहु अर्ज दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) अकोट हयांनी दिनांक 22.2.2007 ला माहिती अधिकारी जिल्हा न्यायालय, अकोला हयांचेकडे टपालाद्वारे पाठविला जो हया कार्यालयास दि. 26.2.2007 ला प्राप्त झाला व अनुक्रमांक

03/2007 नोंदविण्यात आला. अर्जाची पडताळणी केली असता असे दिसून येते की सदरहु अर्ज हा महाराष्ट्र जिल्हा न्यायालय माहितीचा अधिकार 2006 च्या नियम 6 अन्वये विहीत नमुन्यात नाही. तसेच अर्जाला लागणारी कोर्ट फी रु. 12/– चे मुद्रांक लावलेले नसुन बी.पी.एल. सर्टीफीकेटची झेरॉक्स प्रत जोडली आहे. म्हणून अर्जदारास पूर्तता करण्याचे उद्देशाने दि. 27.2.2007 ला पत्र पाठवुन त्यांना दि. 6.3.07 ला हजर राहण्यास सांगितले.

दि. 6.3.2007 ला अर्जदार स्वतः हजर झाले. दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्राची सांक्षांकित प्रत दाखल केली. त्यांना अर्जास आवश्यक असलेली कोर्ट फी रु. 12/– चे मुद्रांक लावण्यास सांगितले तसेच माहिती पोष्टाद्वारे पाहीजे असल्यास त्याकरीता आवश्यक असलेले पोस्टाचे तिकीट लावलेला लिफाफा लावावे लागेल असे त्यांना समजावुन सांगीतले पण त्यांनी दोन्ही बाबी बाबत ते दारिद्रय रेषेखाली असल्या कारणास्तव असमर्थता दर्शविली.

महाराष्ट्र जिल्हा न्यायालय माहितीचा अधिकार 2006 चे नियम बारकाईने तपासले असता असे दिसते की बी.पी.एल. अर्जधारकास अर्जास कोर्ट फी ची सुट व तसेच नक्कल पाठविण्यास लागणारा खर्च याची सुट दिलेली दिसून येत नाही. त्यामुळे त्यांची विनंती मंजूर करता येत नाही.

तसेच अर्जदार हयांनी 125 सी.आर.पी.सी.अंतर्गत सविता विरुध्द नंदकिशार या केसच्या संपूर्ण कागदपत्राच्या सत्यप्रती केस सुरु झााल्यापासून केस संपेपर्यंत मागीतलेल्या आहेत.

महाराष्ट्र जिल्हा न्यायालय माहितीचा अधिकार 2006 चे नियम 9 अन्वये अर्जदाराने ज्युडीशिअल प्रोसीडींग किंवा रेकॉर्ड बद्दल माहीती मागीतल्यास ती त्याने प्रमाणित नकला मिळणेसाठी सध्या प्रचलित असलेल्या नियम व आदेश अन्वये प्राप्त करावी.

त्यामुळे अर्जदाराने ज्युडीशिअल प्रोसीडींग बद्दल मागीतलेली माहीती देता येत नाही. ती त्यांनी प्रमाणीत नक्कल मिळणेसाठी सध्या प्रचलित असलेल्या नियम व आदेशाप्रमाणे संबंधित न्यायालयात अर्ज करुन नक्कल प्राप्त कराव्या.

अशा प्रकारे अर्जदाराचा अर्ज निकाली काढला.

अर्जदारास कळविण्यात यावे. सही मो. यूनुस माहिति अधिकारी जिल्हा न्यायालय अकोला.

सदरच्या निर्णयाच्या विरुध्द अपीलकर्ता यांनी दि. 9.3.2007 रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. 13.3.2007 रोजी खालीलप्रमाणे आदेश पारीत केलेले आहेत.

''आज अपिलार्थी ओमप्रकाश यशवंत सुरवाडे, रा. बटवाडी ता. बाळापूर जि. अकोला हे नोटीसप्रमाणे आज दि. 13 मार्च 2007 रोजी हजर झाले. त्यानं माहिती अधिका–याचा निर्णय कसा बरोबर नाही याबददलचा अर्ज दिला आहे. त्या अर्जावरुन तसेच अपिलार्थी यांच्या बरोबर चर्चा केली असता असे आढळून येते की सदर अपिलार्थी सुशिक्षीत आहे भारतीय सैन्यात शिपाई पदावरुन सिग्नल कौर मधून तो 1995 साली सेवानिवृत्त झाला आहे त्याला दरमहा रु. 1200/– निवृत्ती वेतन मिळत आहे. तसेच तो मौजे बटवाडी येथे वडिलासोबत एकत्र कुटुंबात राहत आहे व त्याचेजवळ एकत्र कुटुंबाची जमीन आहे तथापी अपिलार्थी हयाने दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्राची प्रत माहिती अधिका–याकडे दाखल केली आहे त्यावरुन त्याला संपूर्ण माहिती मोफत हवी आहे. एकंदरीत अपिलार्थी हयांच्या राहणीमानावरुन व त्यांनी दिलेल्या माहितीवरुन सदर व्यक्ती दारिद्रय रेषेखालील वाटत नाही म्हणून प्रथम हयाच बाबीची चौकशी करणे आवश्यक आहे अन्यथा सरकारचा विनाकारण खर्च होण्याची शक्यता आहे. सबब अपिलार्थी हयास त्याचे सेवानिवृत्तीचे कार्ड व त्याची प्रत तसेच निवृत्तीवेतनाविषयीचे कागदपत्र हजर करण्यास सांगीतले आहे. पुढील तारीख दि. 15.3.2007 ठेवण्यात आली

आहे. व त्यावरुन पुन्हा दि. 10.4.2007 रोजी चौकशीअंती आदेश पारीत केलेले आहेत. पूढील आदेश : सदर अपिलार्थी यांना सेवानिवृत्तीचे कार्ड व निवृत्तीवेतनाविषयीचे कागदपत्र हजर करण्यास सांगण्यात आले होते. अपिलार्थी गैरहजर आहेत. त्यांनी कोणतेही कागदपत्र दाखल केलेले नाही.

अपिलार्थीचे दारिद्रयरेषा प्रमाणपत्रा विषयी शंका आल्याने ते पडताळण्या विषयी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांना विनंती करण्यात आली होती. त्याप्रमाणे संबंधित प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, अकोला यांनी त्यांच्या दि. 29.3.2007 रोजीच्या पत्राद्वारे कळविले की, अपिलार्थी यांचे दारिद्रयरेषा प्रमाणपत्र सन 2002 मध्ये झालेल्या सर्वेक्षणानुसार रद्द करण्यात आलेले आहे. अशारीतीने अपीलार्थी याने रद्द झालेल्या प्रमाणपत्राचे आधारे शासनाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला आहे त्याचे हे कृत्य गंभीर स्वरुपाच्या गुन्हयात मोडते.

अपिलार्थी दारिद्रय रेषेखालील व्यक्ती नसल्याने त्याने अर्जावर कोर्ट फि भरणे आवश्यक आहे. माहिती अधिकारी यांनी त्याप्रमाणे आदेश केलेला असून अपिलार्थी याने कोर्ट फी भरलेली नाही.

सबब माहिती अधिकारी यांचा आदेश योग्य आहे. माहिती देण्यास त्यांनी कोणतीही टाळाटाळ केलेली दिसून येत नाही.

जर अर्जदारास खटल्याची निकाल प्रती हवी असेल तर त्याने संबंधीत न्यायालयाकडे प्रत मिळण्याच्या नियमानुसार अर्ज करुन आवश्यक ती फी भरुन नकलांच्या प्रती मिळवाव्यात.

सबब सदर अपिल निकाली काढण्यात येत आहे.

अपिलार्थी यास त्याप्रमाणे कळवावे.

सदरच्या आदेशाप्रमाणे दि. 11.4.2007 रोजी अपीलकर्ता यांना निर्णय कळविण्यात आलेला दिसतो. तत्पूर्वीच अपीलकर्ता यांनी दि. 10.4.2007 रोजी राज्य

माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता यांनी त्यांच्या दि. 13.2.2007 च्या अर्जामध्ये जी माहिती मागितलेली आहे ती माहिती ही न्यायालया पुढिल न्यायीक प्रकरणातील संपूर्ण कागदपत्रे व निकालाच्या प्रति मागितलेल्या आहेत व त्याकरीता दि. 7.3.2007 रोजी माहिती अधिकारी यांनी जो निर्णय दिलेला आहे तो योग्य आहे असे दिसून येते. महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम 2005 प्रमाणे “Fee for information 1) For providing the information under sub-Section (1) of section 7, the fee shall be charged by way of cash against proper receipt or by demand draft or banker’s cheque payable or by way of money order to the public authority at the following rates, namely :

1) (A) (a) When the concerned department has already fixed the price of some document, maps etc.: The price so fixed plus postal charges. अशा प्रकारची फी ही अपीलकर्ता अर्जदार यास देणे आवश्यक असते. The Maharashtra District Courts, Right to Information Rule, 2006 च्या नियम 9 प्रमाणे “Provided that, if the information, sought by the applicant, is in respect of judicial proceedings or record, he shall obtain the information as per the procedure prescribed for obtaining certified copies by the Rules and Orders for the time being in force in that behalf.”

मा.मुख्य न्यायाधिश मा. उच्च न्यायालय यांनी जे नियम केले आहे व महाराष्ट्र शासनाने वर नमूद केलेले नियम केले आहेत ते सुसंगत व पुरक असेच आहेत व त्या नियमाच्या

अनुषंगाने दिनांक 7.3.2007 रोजी जन माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय हा योग्य आहे. परंतु सदरच्या निर्णयामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये जो आदेश पारीत केलेला आहे तो वर नमूद केलेला आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता हा दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्रधारक आहे किंवा नाही याबाबतची चौकशी करण्याचे आदेश संबंधित प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा अकोला यांना दिले होते व त्यांनी अपीलकर्ता यांचे प्रमाणपत्र सन 2003 मध्ये झालेल्या सर्व्हेक्षणानुसार रद्य करण्यात आले असे कळविलेले असल्यामुळे अर्जदारास खावटीच्या निकालाच्या प्रति हव्या असल्या तरी त्याने संबंधित न्यायालयाकडे प्रत मिळण्याच्या नियमानुसार अर्ज करुन आवश्यक ती फी भरुन निकालाच्या प्रति मिळवाव्या असा जो निर्णय दिला आहे तो योग्य आहे व त्याप्रमाणे दि. 11.4.2007 रोजी अपीलकर्ता यांना कळविलेला आहे. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की दिनांक 13.3.2007 व 10.4.2007 च्या आदेशाची प्रत त्यांना मिळालेली नाही. त्याकरीता अपीलकर्ता यांना सदरच्या आदेशाची प्रत ही उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. मात्र त्याकरीता अपीलकर्ता यांनी अर्जास रु. 10 चे व प्रथम अपीलाचे रु. 20 चे कोर्ट फी स्टॅम्प लावणे आवश्यक आहे. मात्र अपीलकर्ता यांचे अपील प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय योग्य असल्यामुळे खारीज करण्यास पात्र आहे. अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या निर्णया प्रमाणे मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये न्यायालयाकडे न्यायिक प्रकरणातील कागदपत्रांच्या छायांकित प्रती मिळण्याच्या नियमानुसार अर्ज करुन आवश्यक ती फी भरुन निकालाच्या प्रति मिळवून घेणे संयुक्तिक राहिल.

# आ दे श

1) अपीलकर्ता यांचे दि. 9.3.2007 च्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 11.4.2007 रोजी कळविलेला निर्णय हा योग्य असल्यामुळे तसेच जन माहिती अधिकारी यांनी सुध्दा दि. 7.3.2007 रोजी जो निर्णय दिला आहे तो योग्य असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता यांना श्री कि. कुळकर्णी यांच्या निर्णयाची (दि. 13.3.2007 व दि. 10.4.2007) एक प्रत उपलब्ध करुन द्यावी. मात्र त्यापूर्वी त्यांनी माहितीच्या अर्जाचे रु. 10 व प्रथम अपीलाची रु. 20 फी ही कोर्ट फी स्टॅम्प चे स्वरुपात अर्जासोबत भरावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1623/2007.**

श्री देविदास दौलत जवरे
मु. पो. माटरगांव ता. शेगाव
जि. बुलढाणा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री पी. एस. आंबेराव प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक,
भूमी अभिलेख बुलढाणा ता. जि. बुलढाणा
2) श्री डी. एच. गिरी जन माहिती अधिकारी तथा
तालुका निरीक्षक
भूमी अभिलेख शेगांव
ता. शेगांव जि. बुलढाणा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 13.6.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 23.3.2007 (कार्यालयात प्राप्त दि. 10.4.2007) रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत. अपीलकर्ता यांचे तर्फे ॲड. एस. के. अग्रवाल यांनी युक्तीवाद केला.

2. अपीलकर्ता यांनी दि. 4.12.2006 रोजी दि. 28.5.2005 ला मौजे वेलुरा ता. शेगांव येथील गट नं. 36 व 27 ची मोजणी केली त्या मोजणीची 'क' प्रत मिळणेबाबत. मोजणी केल्यानंतर क प्रतीची छायांकित नक्कल. माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 15.12.2006 रोजी जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांनी ''मौजे वेलुरा ता. शेगांव येथील दि. 28.5.2005 ला एकत्रिकरण प्रकरणात गट नं. 36 व 27 ची मोजणी ही एकत्रिकरण तक्रार प्रकरणात कार्यालयीन उपयोगा करीता मोजणी करण्यात आलेली असल्याने त्या मोजणीची नक्कल पुरविता येत नाही. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 17.1. 2007 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये दि. 31.1.2007 रोजी निर्णय दिलेला असून केलेली मोजणीची कार्यवाही ही कार्यालयीन कामासाठी केलेली असल्यामुळे नियमानुसार आवश्यक मोजणी फी चा भरणा झालेला नाही त्यामुळे शासकीय माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख शेगांव यांनी अपीलार्थी यांचेकडून नियमानुसार मोजणी फी चा भरणा करुन घेवून त्यांना माहिती/मोजणीची नक्कल पुरविण्यात यावी. सबब सदरचा अर्ज निकाली काढण्यात येत आहे. निर्णय संबंधितास कळवावा असा निर्णय दिलेला दिसतो.

3. अपीलकर्ता यांनी त्यांच्या दि. 4.12.2006 च्या अर्जामध्ये मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये जे उत्तर देण्यात आलेले आहे त्या मध्ये मोजणी ही एकत्रिकरण तक्रार प्रकरणात कार्यालयीन उपयोगा करीता करण्यात आलेली आहे असे म्हटलेले आहे त्यावरुन तक्रार अर्जदार वरुनच मोजणी करण्यात आलेली आहे असे निष्पन्न होते व मोजणी करतांना ज्या गट नंबरची मोजणी करावयाची आहे त्या लगतच्या सर्व जमिन धारकांना नोटिस काढावयाची असते व त्यानंतर मोजणी करता येते. त्यात अपीलकर्ता यांचा सुध्दा गट नंबर आहे असे अपीलकर्ता यांचे वकीलांनी सांगितले व त्यामुळे सदरच्या मोजणीच्या संदर्भामध्ये जी संपूर्ण कार्यवाही झालेली आहे त्या कार्यवाहीशी

अपीलकर्ता यांचा संबंध असल्यामुळे व अपीलकर्ता ही बाधित व्यक्ती असल्याने मोजणीच्या सर्व कार्यवाहीच्या कागदपत्रांच्या अंतिम नकाशा सहित छायांकित प्रति अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी वेगळेच मुद्दे घेवून निर्णय दिलेला दिसून येतो. तक्रार जर त्रयस्थ व्यक्तींनी केलेली असेल व त्यानुसार मोजणी केलेली असेल तर अपीलकर्ता अर्जदार यांचेकडे मोजणीची फी भरुन घेवून नक्कल देण्यात यावी हा निर्णय कोणत्याही प्रकारे प्रकरणी विचार केल्याशिवाय दिलेला दिसून येतो. व त्यामुळे अपीलकर्ता यांना त्यांनी मागितलेल्या मोजणीच्या नकाशाची नक्कल तर उपलब्ध करुन देणे आवश्यक आहेच परंतु दाखल झालेल्या तक्रारीपासून ते सर्व कागदपत्रे बयाण व निर्णया सहित त्यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे कारण मोजणीचे ते आवश्यक पक्षकार आहेत. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत मौजे वेंलुर ता. शेगांव येथील दि. 28.5.2005 ला एकत्रिकरणातील तक्रार प्रकरण गट नं. 36 व 27 ची मोजणीच्या संदर्भात तकारीच्या छायांकित प्रति सर्व तयार सर्व मोजणी प्रक्रियेतील नकाशासहित कागदपत्राच्या छायांकित प्रति विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात याव्या.

2) अपीलकर्ता यांनी माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलले असल्यामुळे हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांनी सदरच्या माहितीच्या छायांकित प्रति उपलब्ध करुन घेण्याकरीता जन माहिती अधिकारी यांचेकडे

जावून छायांकित प्रति विनामुल्य उपलब्ध करुन घ्याव्या. व तशी पोच जन माहिती अधिकारी यांना दयावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि. 13.6.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.49–52

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1624/2007.**

श्री राजेश श्रीराम मापारी
रा. शिवाजी नगर, लोणार ता. लोणार
जि. बुलढाणा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्रकल्प संचालक/अति. मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा बुलढाणा
जिल्हा परिषद बुलढाणा
2) श्री ए. यु. गुडधे
जन माहिती अधिकारी तथा
गट विकास अधिकारी
पंचायत समिती लोणार
ता. लोणार जि. बुलढाणा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 13.6.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 25.3.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज ठेवण्यात आली होती. अपीलकर्ता गैरहजर

असून त्यांनी ''सदर मी मागीतलेली जवाहर विहीरीची माहिती मला प्राप्त झाली. सदर माहिती मला प्राप्त झाल्यामुळे या विभागाविरोधात माझी कुठलीही तक्रार राहिलेली नाही. सदर विभागा विरोधात माझे कोणतीच तक्रार राहीली नसल्यामुळे सदर अपील खारीज केल्यास माझे कोणतेही म्हणणे नाही असे लेखी आयोगाकडे दिलेले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे. उत्तरवादी हजर आहेत.

नागपूर

दि. 13.6.2008

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.53–54

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1625/2007.**

श्री राजेश श्रीराम मापारी
रा. शिवाजी नगर, लोणार ता. लोणार
जि. बुलढाणा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्रकल्प संचालक/अति. मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा बुलढाणा
जिल्हा परिषद बुलढाणा
2) श्री ए. यु. गुडधे
जन माहिती अधिकारी तथा
गट विकास अधिकारी
पंचायत समिती लोणार
ता. लोणार जि. बुलढाणा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 13.6.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 25.3.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज ठेवण्यात आली होती. अपीलकर्ता गैरहजर

असून त्यांनी ‘‘सदर मी मागीतलेली हरियाली योजनेची माहिती मला प्राप्त झाली. सदर माहिती मला प्राप्त झाल्यामुळे या विभागाविरोधात माझी कुठलीही तक्रार राहिलेली नाही. सदर विभागा विरोधात माझे कोणतीच तक्रार राहीली नसल्यामुळे सदर अपील खारीज केल्यास माझे कोणतेही म्हणणे नाही असे लेखी आयोगाकडे दिलेले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे. उत्तरवादी हजर आहेत.

नागपूर
दि. 13.6.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.55–56

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1631/2007.**

श्री सचिन प्रकाश परळकर
रा. शुक्रवार पेठ, मन्नासिंह चौक,
वाशिम ता. जि. वाशिम ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद वाशिम ता. जि. वाशिम
2) जन माहिती अधिकारी तथा
उपशिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद वाशिम ता. जि. वाशिम ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 16.6.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 16.4.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता विनाअनुमती गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 23.1.2006 रोजी शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद वाशिम यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1) श्री काशीरामजी पाटील विद्यालय सुपखेला शाळेने आपल्या कार्यालयात सन 2005–2006 मध्ये सादर केलेल्या तसेच दि. 28.3.2006 ला निकालात काढलेल्या शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यता प्रस्तावाच्या संपूर्ण कागदपत्रासहीत सत्यप्रती

2) श्री का.पा.वि.सुपरखेला शाळेतील श्री रविंद्र सवाई यांच्या मृत्युनंतर आपल्या कार्यालयात सादर केलेल्या दि. 22.8.2006 नंतर शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यता प्रस्तावाच्या संपूर्ण कागदपत्रासहीत सत्यप्रती.

3) वरील प्रमाणे शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यता प्रस्तावास मंजुरी देण्यासाठी वरीष्ठ लिपीक यांनी लिहीलेल्या नोटशीटच्या सत्यप्रती.

4) श्री का.पा.वि.सुपरखेला शाळेतील शिक्षकांना आपल्या कार्यालयातून दिलेल्या सर्व शिक्षकांच्या मान्यता आदेशाच्या सत्यप्रती.

सदरची माहिती विहित मुदतीत मिळाली नाही म्हणून दि. 26.2.2007 रोजी प्रथम अपील दाखल केले. व प्रथम अपीलाचा सुध्दा निर्णय झाला नाही म्हणून द्वितीय अपील दाखल केले. सदरच्या द्वितीय अपीलाच्या संदर्भामध्ये शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद वाशिम यांनी खुलासा करतांना अपीलकर्ता यांनी अपील क्र. 1631/07 मध्ये जी मागितलेली आहे तीच माहिती अपील क्र. 1109/07 मध्ये मागितलेली होती. सदरची माहिती यापूर्वीच त्यांना दिलेली आहे. या दोनही अपीलांचे अनुषंगाने असलेली माहिती या कार्यालयाने दि. 25.2.2008 ला घेतलेल्या सुनावणीत अपीलकर्ता श्री परळकर यांनी मागितलेली आहे व माहिती न मिळाल्याबाबतची काहीही तक्रार नसल्याचे कबूल केले आहे त्यामुळे अपील क्र. 1631/07 हे खारीज करण्यात यावे अशी विनंती केली आहे. दि. 25.2.2008 च्या सुनावणीच्या संदर्भात टिपणीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की अपीलकर्ता यांना माहिती प्राप्त झाली आहे व त्याकरीता त्यांनी त्यांची सही करुन पोच दिलेली दिसून येते. व अपील क्र. 1109/07 च्या निर्णया वरुन सुध्दा त्यांना तीच माहिती उपलब्ध झालेली आहे असे दिसून येते. तसेच जन माहिती अधिकारी यांनी

तोंडी असे सांगितले की अपीलकर्ता यांना संस्थेनी सेवेतून काढून टाकले असल्यामुळे अपीलकर्ता हे त्यांच्या वडिलांच्या नावावर पूर्वी माहिती मागत होते व ही संपूर्ण माहिती त्यांना उपलब्ध करुन दिली आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात यावे अशी पुन्हा विनंती केली आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांचे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि. 16.6.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.60–62

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1632/2007.**

श्री रामदास नारायण कावणे
मु.पो.खैरा ता. नांदुरा जि.बुलढाणा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री विजय शिराळ
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तालुका कृषी अधिकारी
कृषी विभाग नांदुरा
ता. नांदुरा जि.बुलढाणा
2) जन माहिती अधिकारी तथा
कृषी पर्यवेक्षक (कृषी विभाग)
तालुका कृषी कार्यालय नांदुरा
ता. नांदुरा जि.बुलढाणा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 16.6.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 11.4.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. माहिती अधिकारी गैरहजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत व त्यांनी खुलासा दाखल केलेला आहे.

2. अपीलकर्ता यांनी दि. 17.11.2006 रोजी कृषी विभागा अंतर्गत केंद्र पुरस्कृत

1) राज्य पुरस्कृत ता. शेतकरी प्रशिक्षण किती व कोठे घेण्यात आले

2) शेतकरी प्रशिक्षण घेतले असल्यास लाभार्थी यादी

3) शेतकरी प्रशिक्षणासाठी निधी किती व झालेला खर्च किती.

माहितीचा कालावधी सन 2005–2006. माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले दिसून येते. अपीलकर्ता यांना सदरच्या अपीलाच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. 20.12.2006 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचासुध्दा निर्णय दिलेला नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे खुलासा दाखल केलेला आहे त्यामध्ये नांदुरा तालुक्यामध्ये ऑगष्ट 2006 मध्ये मोठया प्रमाणात अतिवृष्टी झालेली होती. सर्व नद्या नाल्यांना महापूर आलेला होता. अशा परिस्थितीत कार्यालयाचे सर्व कर्मचारी सर्व्हेक्षणाच्या कामामध्ये गुंतले होते. म्हणून विहित मुदतीत माहिती सादर करु शकलो नाही. तथापी या कार्यालयाचे पत्र क. ताक1अ/रामाअ/688/08 दि. 13.6.08 अन्वये मागीतलेल्या माहितीच्या अनुक्रमांक 2 म्हणजेच शेतकरी प्रशिक्षण घेतलेल्या लाभार्थ्याची यादी पोस्टाद्वारे पाठविण्यात आलेली आहे. उर्वरीत माहिती सुध्दा तात्काळ पाठविण्यात येईल. तरी खुलासा मान्य करावा असे लेखी दिलेले आहे.

4. अधिनियमाच्या कलम 19 प्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही हे सिध्द करण्याची जबाबदारी जन माहिती अधिकारी यांची आहे व त्याकरीता अधिनियमाच्या कलम 20 प्रमाणे जन माहिती अधिकारी हे जबाबदार धरले जातात. परंतु जन माहिती अधिकारी आज गैरहजर आहेत. संबंधित जन माहिती अधिकारी यांची बदली झालेली आहे असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले. व वर्तमान जन माहिती अधिकारी यांची प्रकृति ठिक नाही म्हणून ते गैरहजर आहेत.

5. ऑगष्ट 2006 मध्ये मोठया प्रमाणात अतिवृष्टी झालेली होती व त्यामुळे नंतर जे दोन तीन महिन्यात जरी माहिती उपलब्ध करुन देवू शकले नसतील तरी त्यानंतर माहितीचे अर्ज किती आले आहे व त्याबाबत किती माहिती उपलब्ध करुन द्यावयाची आहे याबाबत कोणत्याही प्रकारची काळजी कृषी खात्यात घेतली जात नाही असे दिसून येते. अपीलकर्ता यांचा माहितीचा अर्ज हा नोव्हेंबर मध्ये आला त्यानंतर प्रथम अपील डिसेंबर मध्ये कमीत कमी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी तरी त्यावेळेस किती प्रथम अपील दाखल केले आहेत त्याबद्यलची माहिती घेवून त्याच वेळेस निर्णय देवून माहिती उपलब्ध करुन दिली असती तर माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे असे म्हणता आले असते. परंतु दि. 20.12.2006 नंतर दि. 13.6.2008 पर्यंत कोणत्याही प्रकारची कार्यवाही करावयाची नाही व आयोगाची नोटिस आल्यानंतर दंड होईल या भितीने माहिती उपलब्ध करुन द्यावयास सुरुवात करावयाची अशा प्रकारची प्रथा कृषी खात्याने स्विकारलेली दिसते. व त्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी हे जेवढे दोषी आढळुन येतात तेवढेच प्रथम अपीलीय अधिकारी सुध्दा दोषी आढळुन येतात व त्याबद्यलची दखल ही जिल्हा कृषी अधिकारी यांनी घेणे आवश्यक आहे. अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती तीन मुद्यांची माहिती आहे व ती उपलब्ध करुन देणे तसे अवघड दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 17.11.2006 च्या अर्जामध्ये तीन मुद्यांची सन 2005–2006 या कालावधीची माहिती छायांकित प्रतिच्या स्वरुपात विनामुल्य हा निर्णय मिळाल्यापासून दहा दिवसाचे आंत रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) संबंधित जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून ते अधिनियमाच्या कलम 20 प्रमाणे दोषी आढळुन येत असल्यामुळे त्यांची विभागीय चौकशी करण्याची शिफारस जिल्हा कृषी अधिक्षक यांना करण्यात येत आहे.

3) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुध्दा दखल न घेतल्यामुळे त्यांना ताकीत देण्यात यावी.

4) सदरच्या निर्णयाची एक प्रत जिल्हा कृषी अधिकारी बुलढाणा यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

5) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर ( विलास पाटील )

दि. 16.6.2008 राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.63–66

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1636/2007.**

श्री विजय शंकरराव सोनकर
कोठारी नगर, आगाशे गुरुकुल,
पो. मलकापूर अकोला 444004 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अति. मुख्य कार्यपालन अधिकारी
जिल्हा परिषद अकोला
2) जन माहिती अधिकारी तथा
समाज कल्याण अधिकारी (गट अ)
जिल्हा परिषद अकोला
ता. जि. अकोला ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 17.6.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 17.3.2006 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांची प्रकृती ठिक नसल्यामुळे ते उपस्थित राहू शकत नाही असे त्यांनी कळविले त्यावरुन दि. 17.7.2008 रोजी ते जिल्हा परिषद कार्यालयात सुध्दा रजेवर असावेत असे गृहित धरण्यात आलेले आहे.

2. अपीलकर्ता यांनी दि. 30.1.2006 रोजी खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1) श्री कांबळे यांनी कनिष्ठ लिपीक पदाबाबत आपणाकडे सादर केलेले अपील याची नक्कल प्रत

2) विसकअचे पत्र क्र. 581/2000–01 दि. 8.1.2001 नुसार आपल्या कार्यालयाकडून विसकअ अमरावती यांना सादर केलेला अहवाल नकल प्रत

3) संस्थेचे पत्र अकव पत्र अकोला/खुलासा/पद/क्यू 2000–01 दि. 3.1.2001 नुसार आपण केलेली कार्यवाही नकल प्रत. या पत्रानुसार कनिष्ठ लिपीक पद लवादात असल्याचे कळवूनही दखल न घेण्याची कारणे

4) श्री कांबळे यांची कनिष्ठ लिपीक पदावर नियुक्ती करणबाबत संस्थेचे अपील/याचीका नकरप्रत

5) दि. 8.1.2001 ला विसकअ अमरावती येथे सुनावणी दरम्यान आपल्या कार्यालयाकडून सादर करण्यात आलेली नस्ती नकल प्रत व संस्थेतर्फे हजर प्रतिनिधी बाबत माहिती.

माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले दिसते.

3. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 24.2.2006 रोजी आपणास हवी असलेली माहिती ही सदर विभाग हस्तांतरण होण्या पूर्वीची असल्याने ती विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी अकोला यांचेकडेच आहे. कृपया सदर कार्यालयास आपण संपर्क साधावा करीता आपला अर्ज नस्तीबध्द करण्यात येत आहे. त्यानंतर अपीलकर्ता यांना दि. 7.3.2006 रोजी विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांचेकडे माझा अर्ज दाखल केला असे त्यांचे म्हणणे आहे. दि. 28.3.2007 रोजी सर्व कागदपत्रे हस्तांतरीत केलेले आहेत असे त्यांनी उत्तर दिल्यामुळे पुन्हा दि. 1.4.2006 रोजी समाज कल्याण अधिकारी (गट अ) यांचेकडे सदरच्या माहिती करीता स्मरणपत्राच्या स्वरुपात अर्ज केलेला दिसून येतो. पुन्हा दिनांक 25.9.2006 रोजी स्मरणपत्राच्या स्वरुपात अर्ज

केलेला दिसून येतो. दि. 3.10.2006 रोजी सदरचा अर्ज हा नस्तीबध्द केला असे कळविण्यात आले. नंतर दि. 5.10.2006 ला प्रथम अपील दाखल केले. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दि. 3.11.2006 रोजी देण्यात आलेला दिसून येतो. त्यानंतर दि. 2.12. 2006 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा अति. मुख्य कार्यपालन अधिकारी यांनी विभागीय समाज कल्याण अधिकारी अमरावती यांचेकडून सदर प्रकरणाच्या संदर्भात प्राप्त माहिती देण्याबद्यल 2 रु. प्रति प्रमाणे 35 रु. व समक्ष माहिती पाहिजे असल्यास पोस्टाचा खर्च लागणार नाही अन्यथा पोस्टाचा खर्च रु. 50 चालानाद्वारे भरावा लागेल असे कळविण्यात आलेले दिसते. दि. 14.2.2007 रोजी पुन्हा समाज कल्याण अधिकारी यांनी या कार्यालयात उपलब्ध झालेल्या अभिलेखाची पाहणी केली असता आपल्या मुळ अर्जातील मागणी केलेले अभिलेख उपलब्ध होवू शकत नाही करीता प्रकरण नस्तीबध्द करण्यात येत आहे असे कळविलेल दिसते. दिनांक 30.11.2006 रोजी अपीलकर्ता यांना हवी असलेल्या माहितीपैकी या कार्यालयास उपलब्ध असलेली माहिती ही आपणास पाठविण्यात येत आहे हया व्यतिरिक्त विसकअ अमरावती यांचेकडे माहिती मागविली आहे माहिती प्राप्त होताच आपणास पुरविण्यात येईल. त्यावर अर्जाप्रमाणे माहिती मिळाली नाही पत्र प्राप्त झाले असे अपीलकर्ता यांचा शेरा दिसून येतो तसेच पत्रासोबत जोडलेली माहिती संबंधितास नको आहे असाही शेरा दिनांक 30.11.2006 रोजी देण्यात आलेला आहे. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की मी जी माहिती मागीतलेली आहे ती माहिती त्यात नसल्यामुळे मी ती माहिती घेतली नाही. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे माहितीचा अर्ज हा कार्यालयात आल्यानंतर त्या अर्जामध्ये जी माहिती मागीतलेली आहे ती त्या माहितीच्या अनुषंगाने जी कागदपत्रे उपलब्ध असतील ती मुद्येनिहाय उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांच्या अर्जात जी माहिती मागीतलेली आहे त्यामध्ये मुद्येनिहाय कागदपत्रे उपलब्ध असल्यास त्यांच्या छायांकित प्रति उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल ज्या

मुद्यांच्या संदर्भामध्ये कागदपत्रे उपलब्ध नसतील त्याबद्यल स्पष्ट असे उत्तर देणे आवश्यक असते व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी. अपीलकर्ता यांनी सुध्दा जी काल्पनिक कागदपत्रे उपलब्ध नाहीत तीच कागदपत्रे मागण्याचा आग्रह धरल्यास माहिती केव्हाही उपलब्ध होवू शकणार नाही. त्याकरीता उपलब्ध असलेल्या नस्तीची पाहणी करणे हा एक मार्ग कागदपत्रे उपलब्ध करुन घेण्याचा असतो. कोणत्याही बाबत निर्णय प्रक्रियेच्या संदर्भामध्ये प्रश्न उपस्थित करुन कागदपत्रांची मागणी करणे हे अपेक्षित नाही. निर्णय जर 2000 मध्ये झालेला असेल तर आज माहिती अधिकारी त्याबद्यल कोणत्याही प्रकारचे कारण किंवा स्पष्टीकरण देवून शकत नाही व त्यामुळे हे अपेक्षित सुध्दा नाही. उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे अपीलकर्ता यांना स्वतंत्रपणे न्यायालयात किंवा सक्षम अधिका–याकडे निर्णय प्रक्रियेतील त्रुटी दाखवून न्याय मिळवून घेता येईल. निर्णय प्रक्रियेसाठी एखाद्या कागदपत्राची आवश्यकता असतांना तोच कागदपत्र नसल्यास त्याबाबत अपीलकर्ता यांना योग्य ती तक्रार सक्षम अधिका–याकडे किंवा मा. न्यायालयाकडे करता येईल व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 30.1.2006 च्या अर्जाप्रमाणे मुद्येनिहाय माहिती कागदपत्राच्या छायांकित प्रतिच्या स्वरुपात हा निर्णय मिळाल्यापासून तीन दिवसाचे आंत विनामुल्य उपलब्ध करुन द्याव्यात.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि. 17.6.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.67–70

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1639/2007, 1640/2007, 1641/2007, 1642/2007, 1643/2007, 1551/2007, 1552/2007, 1553/2007.**

श्री मनोहर मारोतराव धकाते
रा. अंचलेश्वर वार्ड, गोंडपूरा,
चंद्रपूर ता.जि. चंद्रपूर–442402. ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
वरीष्ठ संशोधन अधिकारी,
अनुसूचित जमाती–जात प्रमाणपत्र तपासणी समिती,
आदिवासी भवन, गिरीपेठ, नागपूर.
2) जन माहिती अधिकारी तथा
संशोधन अधिकारी,
अनुसूचित जमाती–जात प्रमाणपत्र तपासणी समिती,
आदिवासी भवन, गिरीपेठ, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 17.6.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे दिनांक 12.11.2007 रोजी दोन द्वितीय अपीले, दि. 5.11.2007 रोजी तीन द्वितीय अपीले दि. 24.9.2006 रोजी तीन द्वितीय अपीले माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दाखल केलेली आहेत. सदरच्या आठ द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता विनाअनुमती गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी राज्य जन माहिती अधिकारी अनुसूचित जमाती–जात प्रमाणपत्र तपासणी समिती यांना अपील क्र. 1639/2007 रोजी सन 1995 ते एप्रिल 2002 या कालावधीतील एकुण 10 उमेदवारांची तसेच अपील क्र. 1641/2007 दि. 27.8.2007 च्या अर्जाप्रमाणे एकुण 9 उमेदवारांची माहिती मागितली आहे. अपील क्र. 1642/2007 मध्ये दि. 1.10.2007 च्या अर्जाप्रमाणे एकुण 10 उमेदवारांची माहिती, अपील क्र. 1643/2007 मध्ये दि. 1.10.2007 च्या अर्जाप्रमाणे एकुण 10 उमेदवारांची माहिती, अपील क्र. 1640/2007 मध्ये दि. 1.10.2007 च्या अर्जाप्रमाणे एकुण 8 उमेदवारांची माहिती, अपील क्र. 1551/2007 मध्ये दि. 20.7.2007 च्या अर्जाप्रमाणे श्री तानाजी नारायण नैताम यांची माहिती, अपील क्र. 1552/2007 मध्ये दि. 20.7.2007 च्या अर्जाप्रमाणे सौ. माया चिंतामण इवनाते यांची सन 2000 ते 2007 या कालावधीतील माहिती तसेच अपील क्र. 1553/2007 मध्ये दि. 21.7.2007 च्या अर्जाप्रमाणे दिनांक 19.4.2002 ते आजपर्यंत अनुसूचित जमाती–जात प्रमाणपत्र तपासणी समिती नागपूर यांनी अनु. क्रमांक 4468 पासून अनुसूचित जातीच्या उमेदवारांना दिलेल्या वैधता प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत. तसेच दक्षता पथकाचा अहवाल तपासणी समितीने पारीत केलेल्या आदेशाची उमेदवाराचे व त्यांच्या वडीलांचे शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र व जातीचा दाखल यांच्या प्रमाणित प्रति देण्यात याव्या अशी माहिती मागितलेली दिसून येते. वरील सर्व अपीलातील नमूद केलेल्या अर्जाच्या संदर्भामध्ये शासकीय माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी यांनी दि. 29.9.2007, दि. 26.9.2007, दि. 30.8.2007, दि. 14.8.2007, दि. 23.10.2007 रोजी त्रयस्थ पक्षाची माहिती असल्यामुळे व त्या सर्वांचे पत्ते उपलब्ध नसल्यामुळे किंवा त्रयस्थ पक्षाची वैयक्तिक स्वरुपाची माहिती असल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता येत नाही किंवा नाकारण्यात येत आहे असे अपीलकर्ता यांना कळविण्यात आलेले दिसून येते. अपील क्र. 1553/2007 मध्ये दि. 14.8.2007 रोजी दि. 21.7.2007 व दि. 30.7.2007 च्या अर्जाच्या संदर्भामध्ये आपण मागितलेली

माहिती ही प्रमाणाबाहेरची असल्याने सदर यादया तयार करण्याकरीता शासनाची साधनसामुग्री व कर्मचा–यांची सेवा प्रमाणाबाहेर वळती करावी लागत असल्याने परिणामी दैनंदिनी कामकाजावर परिणाम होत असल्याने आपण मागणी केलेल्या पाच वर्षाच्या यादया देणे वरील कारणास्तव शक्य नसल्याने आपला अर्ज फेटाळण्यात येत आहे तसेच आपणास कळविण्यात येते की मोजकी माहिती मागितल्याने उपलब्धते नुसार ती देता येईल करीता कळविण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. या सर्व उत्तरांमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी जोडपत्र 'ब' मध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या काही प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये निर्णय दिलेला दिसून येतो व काही अपीलांच्या संदर्भामध्ये निर्णय दिलेला दिसून येत नाही. परंतु ज्या प्रथम अपीलामध्ये निर्णय दिलेला आहे त्या प्रथम अपीलामध्ये जन माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम केलेला दिसून येतो. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. सदरच्या द्वितीय अपीलाच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केलेला दिसून येतो.

| | |
|---|---|
| 1. दिनेश महादेव मरसकोल्हे | गोंड |
| 2. आनंद गंगाधर राजगडकर | गोंड |
| 3. राजेंद्रकुमार गंगाराम मरसकोल्हे | गोंड |
| 4. महेश रामदास देशमुख | गोंड |
| 5. मंगला माणिकराव मरसकोल्हे | गोंड |
| 6. शेकर गोपाळराव मरसकोल्हे | गोंड |
| 7. अविनाश किसन मरसकोल्हे | गोंड |
| 8. नरेंद्रकुकार रामकिष्ण मरसकोल्हे | गोंड |

| | |
|---|---|
| 9. योगराज गणपत कोकाडे | गोंड |
| 10. निलेश केशव तुमराम | गोंड |
| 11. वामन महादेव मरसकोल्हे | गोंड |
| 12. भूपेंद्र प्रल्हादराव चांदेकर | गोंड |
| 13. सुरेश सदाशिवराव नागभिडकर | गोंड |
| 14. कृष्णा श्रीराम मरसकोल्हे | गोंड |
| 15. कु.प्रमिला विठ्ठलराव तुमडाम | गोंड |
| 16. सोनलाल शालीकराम मरसकोल्हे | गोंड |
| 17. रमेश मोतीराम चांदेकर | गोंड |
| 18. रविंद्र लक्ष्मण मरसकोल्हे | गोंड |
| 19. दिगांबर शिवराम मरसकोल्हे | गोंड |
| 20. उपासना लक्ष्मण मरसकोल्हे | गोंड |
| 21. राजकुमार एकनाथ महेशकर | गोंड |
| 22. शंकर अवधूतरात मरसकोल्हे | गोंड |
| 23. शशिकला सुरेश तुमराम | गोंड |
| 24. धरमपाल बापूराव मरसकोल्हे | गोंड |
| 25. संजय गोंविंदा मरसकोल्हे | गोंड |
| 26. शारदा मारोती मरसकोल्हे | गोंड |
| 27. पुनम मधुकर तुमराम | गोंड |
| 28. सुभाश शंकरराव मरसकोल्हे | गोंड |
| 29. विनोद रामकृष्ण मरसकोल्हे | गोंड |
| 30. प्रज्वला नारायण मरसकोल्हे | गोंड |
| 31. जयेंद्रकुमार श्रीचंद मरसकोल्हे | गोंड |

| | |
|---|---|
| 32. रुपाली सुरेश तुमडाम | गोंड |
| 33. रत्नाकर दाराराम तुमडाम | गोंड |
| 34. बाळकृष्ण महादेवरात तुमडाम | गोंड |
| 35. संजय पत्रू तुमडाम | गोंड |
| 36. योगीराज मनोहर कोचाडे | गोंड |
| 37. संजू पत्रू आत्राम | परधान |
| 38. मनोज धोंडुजी पांढरे | गोंड |
| 39. शेरसींग रामदास पंधरे | गोंड |
| 40. बाबहिरु सुदाम पंधरे | गोंड |
| 41. संजय चिंतामण पंधराम | गोंड |
| 42. चेतनकुमार भिमराव मसराम | गोंड |
| 43. सुरेश सदाशिव नागभिडकर | गोंड |
| 44. मारोती सखाराम मूळे | गोंड |
| 45. दिपक मारोती मरसकोल्हे | राजगोंड |
| 46. कमलेश सुरेश पंधरे | गोंड |
| 47. प्रदिप वासुदेव कुंभारे | गोंड |

अपीलीय अधिकारी यांनी दि. 13.3.3007, 17.7.2007, चे प्रथम अपील अर्जावर श्री मनोहर मारोतराव धकाते यांना असे कळविले की, आपणास आतापर्यंत सहा प्रकरणामध्ये माहिती दिलेली असून सदर माहिती त्यांनी दि. 30.8.2007 व दि. 29.7.2007 अन्वये प्राप्त केलेली आहे. तरी देखील त्यांनी उक्त नमुद अर्जात 9 प्रकरणाची माहिती मागितलेली आहे. तसेच शासकीय अधिकारी व अपीलीय अधिकारी यांचेकडे मोजक्या प्रकरणाची माहिती न मागता वारंवार मोठया प्रमाणावर शेकडो प्रकरणाची माहिती मागण्याचा ओघ सतत सुरु आहे. त्यामुळे अधिनियमाच्या कलम 8 (त्र) (ज) नुसार

मागीतलेली माहिती ही सार्वजनिक कामकाजाशी किंवा हि संबंधाशी नाही. त्यामुळे आपण मागितलेली माहिती कलम 8 (त्र) (ज) तसेच कलम 7 (9) अन्वये फेटाळण्यात येत आहे.

अपीलकर्ता श्री मनोहर मारोतराव धकाते यांनी जन माहिती अधिकारी/ अपीलीय अधिकारी यांना पाठविलेले अर्ज पाहता निव्वळ मोघम स्वरुपात शेकडो नावे कळवुन त्रयस्थ पक्षाशी संबंधित वैयक्तिक माहिती मागीतलेली आहे. तसेच माहिती व्यक्तीशः हवी आहे असे मुळ अर्जामध्ये नमुद केलेले असतांना सदर प्रकरणाची माहिती त्यांनी व्यक्तीशः घेवून जाणे नियमानुसार आवश्यक होते. तथापी त्यांनी श्री लीलाधर पी. डफाडे यांचे नावे अधिकारपत्र देवून त्यांच्या करवी माहिती प्राप्त केली आहे.

जन माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी यांचेकडे मोजक्या प्रकरणाची माहिती न मागता वारंवार मोठया प्रमाणावर शेकडो त्रयस्थ पक्षाशी संबंधीत माहिती मागण्याचा ओघ सतत सुरु आहे व सदरची माहिती मागतांना संबंधित त्रयस्थ व्यक्तींचे फक्त नाव कळवुन त्याच्या प्रकरणातील काहिती मागणी केली जाते. त्यामुळे हजारोच्या संख्येत असलेल्या प्रकरणामधून सदरच्या व्यक्तीची माहिती शोधणे अधिनियमाच्या कलम 8 (त्र) नुसार ही सार्वजनिक कामाशी हिसंबंधाशी नाही. त्यामुळे त्यांनी मागीतलेली शेकडो प्रकरणाची माहिती मागण्यात त्यांची मानसिकता स्पष्ट दिसुन येते.

श्री रवी सयाम या अर्जदाराने श्री प्रशांत मनोहर धकाते, सौ. कलावती धकाते व श्री मनोहर धकाते अपीलकर्ते यांची संदर्भात जन माहिती अधिकारी यांना त्यांची माहिती मागीतलेली असता जन माहिती अधिकारी यांनी धकाते कुटुंबियांना त्यांची व्यक्तीगत माहिती संबंधितास द्यावी काय या संदर्भात त्यांना कलम 11 (1) अन्वये विचारणा केली असता अपीलकर्त्यांनी आपल्या कार्यालयात असलेली त्यांची वैयक्तिक माहिती तसेच दावा पडताळणीसाठी सादर केलेली माहिती तसेच दस्ताऐवज, प्रमाणपत्रे देण्यात येवू नये आणि जर कार्यालयाने त्यांच्या संबंधातील कोणतेही दस्ताऐवज, प्रमाणपत्रे दिले

आणि त्यामुळे त्यांच्या जिवितास किंवा शारीरीक सुरक्षिततेस धोका झाला तर त्याची सर्वस्वी जबाबदारी आपणावर राहीत अशी धमकी जन माहिती अधिकारी यांना अपीलकर्त्यांनी दिली. तसेच त्यांनी व्यक्तीगत व त्यांचे कुटुंबाचे हितार्थ त्यांची माहिती देण्यात येवू नये अशी न्यायाची भुमिका स्विकारली परंतु इतरांचरूा बाबतीत तसा विचार केलेला नाही. उलट जन माहिती अधिकारी यांना एक प्रकारची धमकी दिलेली आहे. ही गंभीर स्वरुपाची बाब आहे. तसेच या समितीचे सदस्य श्री सुरेन्द्र वामणराव सावरकर, संशोधन अधिकारी यांना सुध्दा वारंवार धमक्या येवून शेवटी त्यांचेवर प्राणघातक हल्ला करण्यात आला. ज्यामुळे ते अद्यापही या धक्यातुन सावरलेले नाही.

अपीलकर्ता श्री मनोहर मारोतराव धकाते हे सन 2006 मध्ये नगरपरिषद, चंद्रपूर नगरपरिषद सदस्य या पदावर निवडणूक लढले त्यांचे विरुध्द निवडणुकीमध्ये श्री दिनेश बाबुराव सोडमाके हे होते. श्री दिनेश बाबुराव सोडमाके हे अनुसूचित जमातीचे आरक्षित पदावर निवडुन आले. श्री दिनेश बाबुराव सोडमाके हे अनुसूचित जमातीचे वैधता प्रमाणपत्रधारक आहे. श्री मनोहर मारोतराव धकाते हे निवडणुकीत पराभुत झाल्याने त्यांनी श्री दिनेश बाबुराव सोडमाके यांचे वैधता प्रमाणपत्रासंदर्भातील हरकतीचा मुद्या न्यायालयात उपस्थित करुन मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर येथे रिट याचिका क्र. 3545／2007 अन्वये याचिका दाखल केली त्तपुर्वी श्री मनोहर मारोतराव धकाते यांचे पुत्र प्रशांत मनोहर धकाते यांनी माहिती अधिकार अंतर्गत श्री दिनेश बाबुराव सोडमाके यांचे जातीविषयक कागदपत्रे मागितले रिट याचिकाची प्रत प्राप्त होताच श्री दिनेश बाबुराव सोडमाके हे नागपूर समिती कार्यालयात आले त्यांनी कार्यालयास असे सांगितले की, मी गरीब ऑटोचालक असुन माझ्या गरीब परिस्थितीमुळे मला सदर न्यायालयीन प्रकरणी नागपूरला येण्या जाण्याचा खर्च तसेच सदर प्रकरणी स्वतःचा वकील लावण्यास्तव येणारा खर्च माझे परिस्थितीला झेपणारा नाही. न्यायालयानिमित्त चंद्रपुरहुन नागपूर येथे येणे जाणे करतांना मला सदर दिवशी ॲटो बंद ठेवल्यामुळे राजी सुध्दा

मिळणार नाही. सदर प्रकरणावरुन स्पष्ट होते की अपीलकर्ता यांनी वैयक्तिक स्वार्थापोटी सदर प्रकरण उपस्थित केले आहे. यावरुन हे स्पष्ट होते की अपीलकर्त्याचा मुळ हेतु स्वहितार्थ असुन जनहितार्थ नाही हे स्पष्ट होते. अपीलकर्त्याने स्वहितार्थ शेकाडो प्रकरणी माहिती मागितल्याने इतर दुर्गम भागात राहणा—या शेकडो आदिवासीच्या बाबतीत अशी गंभीर परिस्थिती येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

उक्त नमुद केलेले अपील क्र. 1639/07 तसेच दि. 22.5.2008 तसेच दि.23.5. 2008 दि. 4.6.2008 व 6.6.2008 रोजी आपणाकडे सुनावणीनंतर निर्णय झालेली अपीले क्र. 1532/2006 ते 1540/07 तसेच 1539 ते 1582, 1592 ते 1595 तसेच 1541 व 1542 व दि. 13.6.2006 रोजी आपणाकडे सुनावणीनंतर निर्णय झालेली अपीले क्र. 1626/07 ते 1629/07, 1548/07 ते 1550/07 सव्वीस प्रकरणे याबाबत अपीलकर्त्याच्या मागणीमध्ये बरीच साम्यता आहे. तेव्हा सदर प्रकरणी आपण दिलेला निर्णय ही अपील क्र. 1639/07 मध्ये ही कायम करणे विषयी आपणास नम्र विनंती करण्यात येत आहे.

श्री मनोहर मारोतराव धकाते तसेच प्रशांत मनोहर धकाते यांचा जातीचा दावा तपासण्यास्तव प्रकरण समितीकडे सादर केलेले आहे. सदर प्रकरणी समितीचा निर्णय अद्याप झालेला नाही. तेव्हा इतरांनी स्वतःचे संदर्भात माहिती मागीतली असता ती नाकारली जाते. तेव्हा वारंवार हेतुपुरस्पर अर्ज पाठवुन शासकीय माहिती अधिकारी व अपीलकर्त्यास माहिती दिली नाही म्हणून वेठीस धरणे ही बाब सष्ट होते.

उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर येथे रिट याचिका क्र.3343/1990 कुं. नंदा शंखपाले व रिट याचिका क्र.1279/2003 मधील दि. 29.7.2003 चे कोर्ट निर्देशानुसार समितीला मासिक 600 प्रकरणे निकाली काढण्याचा लक्षांक दिलेला आहे. समिती किमान सार्षिक 6 हजार ते 7 हजार दाव्यावरती निर्णय घेत असते त्यानुसार सदर माहिती ही कलम 7(9) नुसार सार्वजनिक प्राधिकरणाची साधनसामग्री या कामासाठी

प्रमाणाबाहेर लागणार असल्याने त्यांनी मागितलेली माहिती शोधुन त्यांना देणे हे कार्यालयाला शक्य होत नाही.

जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी वर्ग 2 यांचे पद दि. 6.11.06 पासुन ते दि. 15.4.2007 पर्यंत रिक्त असुन तसेच संशोधन अधिकारी यांची पदोन्नती झाल्यामुळे सद्यस्थितीत अद्यापपर्यंत पद रिक्त आहे. उपसंचालक तथा सदस्य सचिव यांचे पद रिक्त आहे. व सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार वरिष्ठ संशोधन अधिकारी तथा सदस्य गडचिरोली यांचेकडे देण्यात आलेला आहे व तेच प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून काम करीत आहेत. संशोधन अधिकारी गडचिरोली नागपूर वरीष्ठ संशोधन अधिकारी यांचे पद रिक्त असुन त्या पदाचा अतिरिक्त कार्यभार देखील कनिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांचेकडे देण्यात आलेला आहे. तेव्हा अशा परिस्थितीत समितीकडे जमातीचा दावा तपासण्यास्तव दररोज प्राप्त होणारी प्रकरणे तपासणी तसेच मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे सुध्दा विहित कालावधीत प्रकरणे निकाली काढावी लागतात.

तसेच समितीच्या निर्णयाविरुध्द मा. उच्च न्यायालय/सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या शेकडो प्रकरणात समितीचे पॅनल ॲडव्होकेट व सरकारी वकील यांना रेकॉर्ड पुरविणे तसेच सदर प्रकरणामध्ये उत्तरे सादर करणे व न्यायालयाचे सुनावणीच्या वेळी न्यायालयात उपस्थित राहणे या व्यतिरिक्त अनुसूचित जमातीविषयक संशोधनात्मक माहिती गोळा करणेकरीता गावोगावी जावून तेथील आदिवासी घरकुलांना भेटी देणे तसेच आदिवासी खात्यातील कर्मचा–यांसाठी प्रशिक्षणाचा कार्यक्रम दरमहा राबविणे इत्यादी कामे पार पाडावी लागतात तेव्हा अपीलकर्त्याने पाठविलेल्या अर्जाच्या प्रतिवरुन सदर खुलाशास पुष्टी मिळु शकेल. तेव्हा सदर खुलासा मान्य व्हावा हि विनंती.

वरील खुलाशावरुन व मागीतलेल्या माहिती वरुन असे दिसून येते की अपीलकर्ता यांनी स्वतः तसेच प्रशांत मनोहर धकाते व सौ. कलावती मनोहर धकाते यांचे जातीचे दाखल तपासणीसाठी प्रकरण जात पडताळणी समितीकडे प्रलंबित आहे. तसेच

अपीलकर्ता यांनी नगर परिषद चंद्रपूर येथील नगर परिषद सदस्य या पदाची निवडणूक लढविली परंतु सदरच्या निवडणूकीमध्ये श्री दिनेश बा. शेडमाके यांनी अपीलकर्ता यांचा पराभव केलेला होता. श्री सेडमाके यांचे वैधता प्रमाणपत्र संदर्भातील हरकतीच्या मुद्या न्यायालयात उपस्थित केलेला असल्यामुळे तसेच अपीलकर्ता व त्यांच्या कुटुंबियांच्या संदर्भामध्ये श्री रवी सयाम यांनी ज्या पडताळणी समितीकडे माहिती मागितली असता अपीलकर्ता, श्री प्रशांत मनोहर धकाते व सौ. कलावती मनोहर धकाते यांनी दि. 6.5.2008 रोजी जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या स्वतःबद्यलच्या कागदपत्रांची माहिती उपलब्ध करुन देवू नये अशी हरकत सुध्दा घेवून उपलब्ध करुन दिल्यास त्याचे गंभीर परिणाम होतील अशीही दिलेली धमकीच्या संदर्भामध्ये जात पडताळणी समितीवर मानसिकरित्या दबाव आणून त्या समितीस व त्यांच्या कुटुंबियांच्या जातीच्या प्रमाणपत्राच्या संदर्भामध्ये त्यांच्या बाजुने निर्णय यावा याकरीता शेकडो अर्जांच्या माध्यमातून जात पडताळणी समितीच्या अधिका—यांना वेठीस धरुन त्रस्त करुन भाग पाडावे असा हेतू दिसून येतो. अन्यथा अशा प्रकारे स्वतःबद्यलची माहिती इतरांना देण्यास मनाई करणे व इतर शेकडो उमेदवारांची माहिती ही कोणत्याही प्रकारचा संदर्भ न देता मोघमरित्या मागणे यास कोणत्याही प्रकारचा सार्वजनिक व्यापक हित संबंधिचे कारण दिसून येत नाही. वरील सर्व अपीलांमध्ये ज्या प्रमाणे अपीलकर्ता यांनी माहिती मागितलेली आहे तशाच संदर्भामध्ये अपीलकर्ता यांचे आतापर्यंत अपील क्र. 1579/07 ते 1585/07, अपील क्र. 1592/07 ते 1595/07, 1541/07, 1542/07 तसेच 1532/07 ते 1540/07, अपील क्र. 1626/07 ते 1629/07, 1548/07 ते 1550/07 असे एकुण 24 अपीले ही खारीज करण्यात आलेली आहेत. व अशी अजूनही अपीले राज्य माहिती आयोगाकडे प्रलंबित आहेत असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. व यावरुनच अपीलकर्ता हे स्वतःला एक न्याय व इतरांना दुसरा न्याय लावतात. त्यामध्ये कोणत्याही प्रकारची नैतिकता व सार्वजनिक व्यापक हेतू दिसून येत नसल्यामुळे अपीलकर्ता यांची वरील सर्व अपीले ही खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांची अपील क्र. 1639/2007 ते 1643/07 आणि 1551/07 ते 1553/07 ही खारीज करण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दि. 17.8.2008

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.71–81

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1647/2007.**

श्री बबन गोंविंदराव पुनसे
निंभोरा (देल.) ता. तिवसा जि. अमरावती ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री बी. डब्लू. दिवाण
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी (उ.श्रे.)
पंचायत समिती तिवसा
ता. तिवसा जि. अमरावती
2) श्री दि. दि. जोल्हे
जन माहिती अधिकारी तथा
ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय
निंभोरा (देल.) ता. तिवसा जि. अमरावती ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 18.6.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 17.4.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 8.2.2007 रोजी ग्रामसेवक तथा माहिती अधिकारी ग्रामपंचायत निंभोरा (देल.) ता. तिवसा जि. अमरावती यांनी खालीलप्रमाणे 18 मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते.

1) स्वीच हॉल किती आणले. कोठे लावले, त्यांचे उरलेले सामान कोठे आहेत

2) जुलई मध्ये आणलेले मोठे पी यु सी पाईल कोठे टाकले

3) जुने टयुब लाईट कोठे कोठे लावले. एकुण पूर्ण लाईट किती आहे एकुण पूर्ण लाईल किती आहे

4) एक वर्षापासून कोणत्या कामावर किती रुपये खर्च केला व मजुर कोणता होता, पावत्या सहित पूर्ण माहिती देणे

5) ग्रामीण रोजगार माहिती काम का चालु केले नाही

6) अतिक्रमणे व अवैध्य बांधकामे तक्रारी प्रमाणे यावर आजपर्यंत कोणती कार्यवाही केली

7) आपल्या येथे दुध डेअरी कोणत्या गटाला मिळाली ठराव क्र. डेरीचे ठिकाण

8) ग्रा.पं.ने सिमेंट किती आणले कोठे ठेवले किती स्टंपाड पोष्ट बांधले

9) नळ योजना व ग्रा.पं.च्या कामाकरीता लागणारे सामान कोणते आणले ते कोठे आहे आणलेल्या सामानाची स्टॉक बुकवर नोंद झाली आहेत का?

10) ग्रा.पं.चे काम करते वेळी ग्रा.पं.कर्मचारी हजर होते का. राहतात का, हजर न राहण्यास व ठेवण्यास त्यांचे कारण कोणते?

11) कॅश बुक व एक वर्षापासून दोन्ही फंड व आले यांचे मिटिंग मध्ये वाचन का होत नाही हे व्हाउचर मिटींगमध्ये दाखवने?

12) दिनेश पांडे यांना आपण आजपर्यंत किती पगार दिला त्यांचा हिशोब व्हाउचर प्रमाणे देणे तो पगार आपण कशा मधुन भरला. तो विनाकारण खर्च होता?

13) आपण आठवडयातून किती दिवस हजर असता ते दिवस कोणते?

14) शंकर होले ग्रा.पं.चे कामात समोर समोर व सामान घेवून दिसतात कोणतेही. त्यांचा ग्रा.पं.शी संबंध कोणता तो कोण आहे ग्रा.पं.चा सरपंच/सचिवाचा

15)कामाला लावलेले मजुर आपण स्वतः किंवा ग्रामपंचाच्या कर्मचारी यांनी सागीतले असतात का. व लावले का ते कोणी लावले. त्यांची माहिती देणे?

16) आणलेले नवीन सामान व काढलेले जुने ग्रा.पं.चे सामान ग्रा.पं.मध्ये ठेवले आहेत का, नसल्यास त्यांचे कारण काय?

17) सन 2002 ते 2003 पासून मागास वर्गीयांच्या 22 टक्के मधुन सन 2006 पर्यंत कोणती कामे केली व घेतली?

18) ग्रा.पं.च्या मासीक मिटींगचे नोटीसवर कामकाजाचे विषय का घेतले जात नाही.

3. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना कोणत्याही प्रकारची विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 12.3.2007 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसू येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय न देता सचिव ग्रामपंचायत यांना अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करुन द्यावी म्हणून एक पत्र दिनांक 14.3.2007 रोजी दिलेले दिसून येते. व सदरच्या पत्राची प्रत ही अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते. सदरच्या पत्राच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांनी सदरचा दि. 8.2.2007 चा अर्ज हा रजिस्टर पोस्टाने पाठविला होता. परंतु त्याकरीता त्यांनी रजिस्टर पोस्टाचे पावती आयोगाकडे दाखल केलेले नाही. परंतु सदरचा अर्ज प्राप्त झाला नाही असे माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामसेवक श्री डी. डी. जोल्हे यांनी शपथपूर्वक आयोगापुढे प्रतिज्ञापत्र केलेले आहे. त्याकरीता पुन्हा अर्जदार यांनी माहिती मिळण्याचे दृष्टीने माझे कार्यालयास लहान गावात राहूनही संपर्क न करता माहिती अप्राप्त असल्याने दि. 12.3. 2007 रोजी गट विकास अधिकारी पं. स. तिवसा यांचेकडे अपील दाखल केले. अपील अर्जामध्ये त्यांनी ग्रामपंचायतचे कामकाजाबाबत 1 ते 18 मुद्यांची माहिती मागितली होती. सदर मुद्ये कोणते याचा सविस्तर उल्लेख केलेला नाही. किंवा अपीलीय अधिकारी यांचे दिनांक 15.2.2007 रोजीचे पत्रा सोबत सुध्दा अर्जदाराचा दि. 8.2.2007 रोजीचे

अर्जानुसार संबंधीतास निश्चित कोणती माहिती आवश्यक आहे याचा कुठेच बोध झाला नाही. किंवा त्यांनी सुध्दा पुढे माझे कार्यालयाशी संपर्क सुध्दा केला नाही. त्यामुळे माहिती देण्यास मी असमर्थ ठरलो. अर्जदारास माहिती न देण्याचा कोणताही उद्येश नसल्याने कृपया अर्जदाराला आवश्यक असलेल्या माहितीचा सविस्तर खुलासा त्यांनी केल्यास ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध असलेल्या माहितीच्या प्रति त्यांना माहितीचे अधिकाराचे नियमानुसार शुल्क भरणा केल्यावर विहित वेळेत माहिती देण्यास मी बांधील आहे असा खुलासा केलेला आहे. त्यावरुन असे दिसून येते की अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलासोबत सुध्दा कोणत्या 18 मुद्यांवर माहिती मागीतली याबाबतचा मुळ अर्जाची प्रत जोडलेली नाही. त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस माहिती दिली किंवा कसे याबाबत आढावा घेण्याच्या दृष्टीने क्र. 1110 दिनांक 30.3.2007 अन्वये स्मरणपत्र सुध्दा देण्यात आले. परंतु पुढे अपीलार्थीने किंवा माहिती अधिका–यानी या कार्यालयाकडे कोणताही संपर्क न केल्यामुळे अपीलाचे अंतिम आदेश निर्गमित करण्याचे काम प्रलंबित राहिले आहे असा खुलासा सादर केला. संवर्ग विकास अधिकारी यांनी असेही सांगितले की अपीलकर्ता हे त्यावेळेस उपसरपंच होते. वास्तविक उपसरपंच या पदावर असतांना त्यांना ही सर्वच माहिती पदाच्या अधिकारातून उपलब्ध करुन घेता आली असती किंवा त्यांची तक्रार असती तर ग्रामपंचायतच्या सर्व साधारण सभेत किंवा ग्रामसभेत त्यांना याबाबतचे प्रश्न उपस्थित करता आले असते. असे असले तरी त्यांचे म्हणणे असे आहे की त्यांनी प्रश्न मांडले परंतु त्याबद्यल त्यांची दखल घेण्यात आलेली नाही. व म्हणून त्यांना माहितीच्या अधिकारामध्ये अर्ज करावा लागला. सदरचा अर्ज त्यांनी जरी रजिस्टर पोस्टाने पाठविलेला होता तरी रजिस्टर परतही आले नाही किंवा रजिस्टर मिळाल्याची पोच सुध्दा त्यांना मिळालेली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. वास्तविक रजिस्टर मिळाल्याची पोच आली नसल्यास त्यांनी

पोस्टामध्ये तक्रार करावयास पाहिजे होती परंतु ती त्यांनी केलेली दिसून येत नाही. तसेच रजिस्टर पोस्ट करतांना त्यास acknowledgement due अशी पावती जोडली नाही असे त्यांनी मान्य केलेले आहे. त्यामुळे माहिती अधिका–याना अर्ज प्राप्त झाला नाही ही बाब मान्य करण्यास कोणत्याही प्रकारची अडचण नाही. माहिती मात्र उपलब्ध करुन देणे हा माहितीचा अधिकार अधिनियमाचा प्रमुख उद्येश असल्यामुळे अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 8.2.2007 च्या अर्जाप्रमाणे व जन माहिती अधिकारी यांनी खुलाशात मान्य केल्याप्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. अपीलकर्त्याच्या अर्जातील 18 मुद्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की ब–याच मुद्यांमध्ये कारण काय असे विचारलेले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे माहिती ही कार्यालयात उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रतिच्या स्वरुपात मिळते. कोणत्याही निर्णय प्रक्रियेच्या संदर्भामध्ये कारण विचारुन अभिप्राय हे अपेक्षित नाहीत व त्यामुळे ज्या मुद्यामधील माहिती ही कागदपत्रांच्या स्वरुपात उपलब्ध असेल त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रति अपीलकर्ता यांना विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. व त्याकरीता अपीलकर्ता यांनी त्यांच्या दि. 8.2.2006 च्या सविस्तर 18 मुद्ये असलेल्या अर्जाची प्रत ही पुन्हा जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांचेकडे उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून दहा दिवसाचे आंत त्यांनी दि. 8.2.2007 च्या अर्जाची प्रत उपलब्ध करुन दिल्यास त्यांना नंतर दहा दिवसामध्ये मुद्येनिहाय माहिती

छायांकित प्रतिच्या स्वरुपात विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावे.

2) अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून दहा दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांचेकडे दि. 8.2.2007 चा सविस्तर 18 मुद्याची माहिती असणारा अर्ज त्यांचे कार्यालयात जावून उपलब्ध करुन घेण्यात यावा व अर्ज दिल्याची पोच घेण्यात यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि. 18.6.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.80–85

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1649/2007.**

श्री विद्याधर तुकाराम काकड
मु. पो. तांदळी (बु.)
ता. पातुर जि. अकोला 444501 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री बी. के. इंगळे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी
बाळापूर ता. बाळापूर जि. अकोला
2) श्री आर. टी. ठाकरे
जन माहिती अधिकारी तथा
तहसिलदार पातुर
ता. बाळापूर जि. अकोला ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 18.6.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 18.4.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 5.10.2007 रोजी 2 ऑगष्ट ते 7 ऑगष्ट दरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे व पुरामुळे झालेल्या नुकसानीबद्यल मदत मिळालेल्या लाभार्थ्यांची यादी. सदरची माहिती व्यक्तिशः लेखी स्वरुपात घेणार असे नमूद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 21.12.2006 रोजी उपविभागीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. उपविभागीय अधिकारी बाळापूर यांनी दि. 2.1.2007 रोजी तहसिलदार पातूर यांना 2 ऑगष्ट ते 7 ऑगष्ट दरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे व पुरामुळे झालेल्या नुकसानीबाबत सर्व्हेक्षण करुन लाभार्थ्यांना अन्नधान्य, रॉकेल वाटपाबाबत अर्जदारास माहिती देवून त्याबाबतची रितसर नियमानुसार लागू असलेली नकलेची फी संबंधीताकडून वसुल करुन आवश्यक ती माहिती संबंधितास परस्पर द्यावी व आपला अनुपालन अहवाल या कार्यालयास उलट टपाली सादर करावा व सदरच्या पत्राची एक प्रत अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते. परंतु सदरच्या पत्राप्रमाणे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. सदरच्या अपीलाच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांनी दि. 9.6.2008 रोजी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती खोटी असून खरी माहिती मिळाली नाही असे आयोगापुढे लेखी दिलेले आहे. जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार पातुर यांनी या कार्यालयाचे पत्र क. कक्ष/अभि/वि/कावी/279/07 दि. 14.2.2007 नुसार मी उपविभागीय अधिकारी बाळापुर यांना माहिती करीता पाठविलेल्या पत्रानुसार अर्जदारास दि. 9.1.2007 रोजी माहिती दिल्याचे आढळुन आले व माहिती दिल्याबाबत पावती कमांक सीआर 5322/07 दि. 9.1.2007 प्रमाणे रु. 30 भरणा करुन सदर माहिती अर्जदारास मिळाल्याचे दिसून येते सोबत पावती झेरॉक्स प्रत जोडली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांनी रु. 30 सुध्दा भरलेले नाही त्यांना

त्यावेळेस माहिती सुध्दा प्राप्त झालेली नाही व म्हणूनच त्यांनी दि. 11.12.2006 रोजी (30 दिवाची मुदत संपल्यानंतर) स्मरणपत्र दिले. त्यानंतर पुन्हा दि. 31.1.2007 रोजी स्मरणपत्र दिले. पुन्हा दि. 5.2.2007 रोजी स्मरणपत्र दिलेले दिसून येते. पुन्हा दि. 8.2. 2007 रोजी स्मरणपत्र दिले. पुन्हा दि. 12.2.2007 रोजी जिल्हाधिकारी यांचेकडे तक्रार अर्ज दाखल केला. मात्र जुन 2008 मध्ये अपीलकर्ता यांना दि. 9.6.2008 रोजी मागितलेली माहितीचे अधिकाराखाली अर्जाचे प्रतिसह हजर राहावे असे पत्र दिलेले दिसून येते. त्याप्रमाणे दि. 9.6.2008 रोजी सदर माहिती संबंधित परवानाधारक यांचेकडून वाटपाबाबत माहिती प्राप्त करण्यात आली असून सदर माहिती या कार्यालयात उपलब्ध ठेवण्यात आली असून आपण मागितलेली माहिती कृपया घेवून जावी असे कळविलेले दिसून येते. सोबत 1 ते 9 पुष्ठ दिसतात. यावरुन अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही असा निष्कर्ष दिसून येतो. व त्यामुळे अधिनियमाच्या कलम 7 (1) प्रमाणे अर्ज मिळाल्यापासून 30 दिवसात माहिती उपलब्ध करुन दिली नसेल तर माहिती अधिकारी हे कलम 20 प्रमाणे दोषी आढळुन येतात. व त्यामुळे संबंधित माहिती अधिकारी या प्रकरणात दोषी आढळुन येतात. तसेच अपीलकर्ता यांना जी माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिलेली आहे ती माहिती पुन्हा त्यांच्या दि. 5.10.2006 च्या अर्जाप्रमाणे मागितली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. संबंधित तहसिलदार यांनी त्यावेळेस जी लाभार्थ्यांची यादी तयार करुन वाटपास दिली होती ती लाभार्थ्यांची यादी त्यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 5.10.2006 च्या अर्जामध्ये दिलेल्या माहितीचे वर्णनानुसार संबंधित

तहसिलदार यांनी आदेशित केलेले लाभार्थ्यांची यादीची छायांकित प्रत हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचं आंत रजिस्टर पोस्टानी विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून संबंधित तहसिलदार हे दोषी आढळुन येत असल्यामुळे त्यांचे विरुध्द विभागीय चौकशीची शिफारस करण्यात येत आहे. सदरची विभागीय चौकशी ही जिल्हाधिकारी यांनी करुन त्याप्रमाणे अहवाल आयोगास सादर करावा.

3) सदरच्या निर्णयाची एक प्रत जिल्हाधिकारी अकोला यांचेकडे स्वतंत्रपणे पाठविण्यात यावे.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दि. 18.6.2008

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.85–88

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे्त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1498/2007.**

श्री देवेंद्र राघो खोत

फ्लॅट नं. 501, उत्कर्ष परिजात अपार्टमेंट,

खरे टाऊन, धरमपेठ, नागपूर 440 010. ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा

महाराष्ट्र एयरपोर्ट डेव्हलपमेंट कार्पोरेशन (MADC)

12 वा मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कॅप परेड, मुंबई 400 005.

2) जन माहिती अधिकारी तथा

महाराष्ट्र एयरपोर्ट डेव्हलपमेंट कार्पोरेशन (MADC)

नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 19.6.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 10.4.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 26.12.2006 रोजी संचालक तथा माहिती अधिकारी महाराष्ट्र एयरपोर्ट डेव्हलपमेंट कार्पोरेशन यांचेकडे "Digital prepared by

AUTOCAD computerized MIHAN (CARGO) final plan in C.D.Format.” सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 30.12.2007 रोजी माहिती अधिकारी श्री सी. एस. गुप्ता यांनी अपीलकर्ता यांना “The Auto CAD drawing of the cargo plan cannot be provided as they can be altered. However you may choose to collect the drawing in PDF format as has been informed to you earlier. This is for your information please.” असे कळविलेले दिसून येते. उपरोक्त निर्णयामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 28.2.2007 रोजी Vice Chairman & Managing Director (MADC) यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. 2.3.2007 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी खालीलप्रमाणे दिला आहे. “We refer to your above cited application under Right to Information Act 2005 regarding MIHAN Cargo Plan in Auto CAD drawing. As informed to you earlier the Auto CAD drawing can be altered. Therefore the same cannot be made available under section 8 (1) (d) of RTI Act 2005 which states that “information including commercial confidence, trade secrets or intellectual property, the disclosure of which would harm the competitive position of a third party, unless the competent authority is satisfied that larger public interest warrants the disclosure of such information”. Hence appeal is rejected. सदरच्या

निर्णयाने अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

3. वरील निर्णयामधून असे दिसून येते की अपीलकर्ता यांनी Auto CAD drawing ही C.D.Format मध्येीील असल्याने मागितलेली दिसून येते. परंतु सदरचे drawing हे C.D.Format मधील असल्याने केव्हाही त्यात बदल करता येतो व त्यामुळे PDF format मध्ये माहिती घ्यावी. त्याकरीता अपीलकर्ता यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की PDF format मध्ये मिहान प्रकल्पामध्ये कोण कोणते सर्व्हे नंबर व कोणत्या झोन मध्ये आहे याची माहिती होत नाही. त्याकरीता पूर्वी त्यांना जो प्लॅन उपलब्ध करुन दिला आहे त्याची प्रत त्यांनी आयोगाचे निदर्शनास आणले. त्यामध्ये निश्चितच सर्व्हे नंबर नाही त्यामुळेच त्यांनी Auto CAD drawing हे C.D.Format मध्ये मागितले आहे असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु Auto CAD drawing ची जर त्यांना मुद्रित प्रती (प्रिंट आऊट) प्रमाणित प्रत उपलब्ध करुन दिली तर त्यांचा हेतू साध्य होईल काय असे विचारले असता त्यात सर्व्हे नंबर आसल्यास त्यांचा हेतू साध्य होईल असे त्यांचे म्हणणे आहे. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये अधिनियमाच्या कलम 8 (1) (d) चा आधार घेतला आहे तो अर्थातच माहिती अधिकारी यांनी Auto CAD drawing C.D.Format मध्ये असला तरी बदल करता येवू शकतो व त्यामुळे त्यांनी उपलब्ध करुन देता येणार नाही व ही माहितीही प्रकट करता येणार नाही असा आधार घेतलेला दिसतो. परंतु वर नमुद केल्याप्रमाणे अपीलकर्ता यांचे म्हणण्यानुसार Auto CAD drawing चे प्रिंट आऊट त्यांना हव्या असलेल्या आकारांत (मुद्रीत प्रती) निरनिराळया रंगात दाखविलेल्या झोनसहित प्रमाणित करुन

उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता जो खर्च येईल तो भरण्यात ते तयार आहेत व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 26.12.2006 च्या अर्जात मागितलेल्या माहितीप्रमाणे Digital prepared by AUTOCAD computerized MIHAN (CARGO) ची प्रमाणित कलर प्रिंट आऊट प्रमाणित करुन हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रिंट आऊट उपलब्ध करुन देण्याकरीता जो खर्च येणार असेल तो अपीलकर्ता यांना कळवावा व खर्चाचा भरणा केल्या नंतर कलर प्रिंट आऊट उपलब्ध करुन देण्यात यावे.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि. 19.6.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 560/2007, 668/2007, 1670/2007.**

श्री दामोधर किसन राऊत
मु.पो.ता. पातूर, पितांबर वाडी,
ता. पातूर जि. अकोला ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपकार्यकारी अभियंता (सु.)
महा. राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(ग्रामीण विभाग) गोरक्षण रोड, ता.जि.अकोला
2) जन माहिती अधिकारी तथा
सहा. अभियंता
महा. राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(ग्रामीण विभाग) गोरक्षण रोड, ता.जि.अकोला ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 19.6.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे अनुक्रमे दिनांक 2.2.2007 रोजी, दिनांक 6.10.2006 रोजी व दिनांक 28.3.2007 रोजी तीन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या तीनही अपीलांची सुनावणी आज दि. 19.6.2008 रोजी ठेवण्यात आली होती. परंतु अपीलकर्ता यांनी दि. 17.6.2008 रोजी कार्यालयात प्राप्त दि. 18.6.2008

रोजी वरील तीनही अपीलांच्या संदर्भामध्ये ती अपीले पुढे चालवायची नाही करीता माझा अर्ज मंजुर करुन वरील अपीले पुढे चालविण्यात येवू नये ही विनंती असे लेखी दिलेले असल्यामुळे उपरोक्त तीनही अपीले ही निकाली काढण्यात येत आहे.

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.96–97

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1655/2007.**

श्री पुरुषोत्तम धर्माजी आठवले
विठ्ठल नगर, हातेकर वाडी, मोठी उमरी,
अकोला, ता. जि. अकोला ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री जी. व्ही. भालेराव
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था अकोला
''सहकार संकुल'' आदर्श नगर अकोला.

2) श्री पी. आर. फडणवीस
जन माहिती अधिकारी तथा
उपनिबंधक
सहकारी संस्था गंगाधर प्लॉट अकोला
ता. अकोला ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 20.6.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 21.4.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 16.10.2006 रोजी जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था अकोला यांचेकडे खालिलप्रमाणे सहा मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते.

1) सन 2000 ते 2005 या कालावधीत संस्थेचे ऑडीट झाले. संस्थेने या कालावधीत सादर केलेल्या पूर्तता अहवालाच्या प्रती दयाव्या.

2) संस्थेने प्रत्यक्षात पूर्तता केली. संस्थेवर केलेल्या कार्यवाहीच्या अहवालाच्या सत्यप्रती संस्थेने दाष कलंकी प्रत्यक्षात न केल्यास संस्थेवर कोणत्या नियमानुसार कोणती कार्यवाही करण्यात येते त्या अभिलेख्याची सत्य प्रत.

3) तालुका उपनिबंधक सहकारी संस्था हयांचे कर्तव्य व जबाबदारीची सत्य प्रत.

4) तालुका उपनिबंधक सहकारी संस्था हयांनी त्यांच्या कर्तव्य व जबाबदा—या प्रामाणिकपणे पार पाडाव्यात कसुर केल्यास त्यांचेवर कोणती कार्यवाही करण्यात येते त्या अभिलेख्याची सत्य प्रत दयावी.

5) संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव व संचालक मंडळाच्या कर्तव्य व जबाबदारीची सत्य प्रत दयावी.

6) संस्थेत अनियमितता, गंभीर स्वरुपाचे दोष तालुका उपनिबंधक हयांची परवानगी न घेता व्यवहार किंवा घोटाळा झाल्यास अध्यक्ष व संचालक मंडळावर कोणती नियमानुसार कार्यवाही करण्यात येते त्या अभिलेख्याची सत्य प्रत दयावी.

माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केले आहे.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 9.11.2006 रोजी अपीलकर्ता यांना उपनिबंधक सहकारी संस्था अकोला यांनी आपण आपले अर्जाप्रमाणे मागणी केलेली माहिती बाबत या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती आपले अर्जानुसार आपण स्वतः येवून व माहितीचे छायाप्रती करीता येणा—या खर्चाचा भरणा करुन कार्यालयीन वेळेत माहिती प्राप्त करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर दि. 10.11.2006 रोजी

(अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की सदरची दिनांक 10.11.2006 तारीख ही खोडतोड केलेली आहे व ती प्रत्यक्षात 10.11.2006 नसून 10.12.2006 आहे) सदरचे पत्र दि. 29.12.2006 रोजी अपीलकर्ता यांना प्राप्त झाले अशी त्यावर पोच दिलेली आहे. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 8.1.2007 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 25.1.2007 रोजी देण्यात आलेला असून सदरच्या निर्णया प्रमाणे माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसते.

3. अपीलकर्ता यांनी त्यांच्या दि. 16.10.2006 च्या अर्जामध्ये माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केलेले असल्यामुळे अपीलकर्ता अर्जदार यांनी माहिती उपलब्ध करुन घेण्याकरीता 30 दिवसाचे आंत व्यक्तीशः माहिती अधिकारी यांचेकडे जावून माहिती उपलब्ध करुन घेणे अपेक्षित असते. असे असले तरी अपीलकर्ता यांना दि. 9.11.2006 रोजी पत्र देवून माहिती ही खर्चाचा भरणा करुन घेवून जावी असे कळविलेले दिसते व त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब केला किंवा माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता टाळाटाळ केलेली आहे असा निष्कर्ष काढता येत नाही. त्याचप्रमाणे दि. 10.11.2006 (10.12.2006) च्या माहिती उपलब्ध करुन देण्याच्या पत्रावर दि. 29.12.2006 रोजी प्रत्यक्ष अपीलकर्ता यांनी उपस्थित होवून माहिती उपलब्ध करुन घेतलेली दिसून येते. व स्वतः दि. 29.12.2006 ला उपस्थित होवून माहिती उपलब्ध करुन घेतलेली असल्यामुळे सदरची माहिती विलंबाने मिळाली असे म्हणता येत नाही. मात्र अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती अपूर्ण आहे असे त्यांचे जे म्हणणे आहे त्याकरीता त्यांच्या माहितीच्या अर्जातील प्रत्येक माहितीची छाननी केल्यास असे दिसून येते की श्री गजानन शासकीय दूध योजना कर्मचारी पत संस्थाचा जो ऑडिट रिपोर्ट दिला आहे त्यामध्ये त्यांचे म्हणण्याप्रमाणे त्रुटी आहे व शासनाने विहित केलेल्या

नमुन्यामध्ये पूर्ण अहवालाच्या प्रती प्राप्त व्हाव्या. उपलब्ध झालेल्या माहितीचे अवलोकन केले शेरा असलेला कॉलम छायांकित प्रतीमध्ये नाही असे दिसते. त्याबाबत त्यांना शेरा असलेला कॉलमची संपूर्ण छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 मधील संबंधित कलमांच्या तरतुदींची छायांकित प्रती उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता नाही. मात्र शासन निर्णय, परिपत्रके किंवा इतर शासकीय आदेशाच्या प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे अपीलकर्ता अर्जदार यांनी जो अधिनियम उपस्थित केलेला असतो त्या अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे सक्षम अधिका–याकडे तक्रार करणे व न्याय मिळवून घेणे अशी कार्यपध्दती प्रत्यक्षात असल्यामुळे त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी उपलब्ध झालेल्या माहितीतून विश्लेषण करुन घ्यावयाचे असते. व त्यामुळे वर नमूद केल्याप्रमाणे प्रत्यक्ष अधिनियमाच्या तरतुदींच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे हे अपेक्षित नाही. प्रथम अपिलाच्या निर्णयामध्ये पुस्तके व रेकॉर्डच्या प्रती पाहणी करण्याकरीता व छायांकित प्रती उपलब्ध करण्याकरीता निर्णय दिलेला आहे. त्यामुळे वर नमूद केल्याप्रमाणे छायांकित प्रती उपलब्ध करुन देण्यात याव्या व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 16.10.2006 च्या अर्जातील मुद्येनिहाय मागितलेल्या माहितीच्या छायांकित प्रती हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात याव्या. मात्र महाराष्ट्र नागरी सेवा नियमाच्या छायांकित प्रती करीता अपीलकर्ता यांनी खर्चाचा भरणा करावा.

2) अपीलकर्ता यांनी सदरची माहिती स्वतः माहिती अधिकारी यांचेकडे जावून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत उपलब्ध करुन घ्यावी व त्याकरीता आधी खर्चाचा भरणा करावा.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि. 20.6.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.98—102

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1654/2007 व अपील कमांक 1823/2007.**

श्री धोंडु गोबा चव्हाण

मु.पो. डोंगरखंडाळा ता. जि. बुलढाणा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) सौ. मिनल कुटे

प्रथम अपीलीय अधिकारी तथा

गट विकास अधिकारी

पंचायत समिती बुलढाणा

ता. जि. बुलढाणा

2) श्री व्ही. वी. दराखे

जन माहिती अधिकारी तथा

सचिव, ग्राम पंचायत कार्यालय डोंगरखंडाळा

ता. जि. बुलढाणा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 20.6.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 20.4.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या द्वितीय अपीलांची सुनावणी आज ठवेण्यात आली होती. अपीलकर्ता यांनी माहिती उपलब्ध झालेली आहे व त्यांची कोणत्याही प्रकारची तकार नाही व समाधान झालेले आहे असे लेखी शासकीय जन माहिती अधिकारी तथा

ग्राम विकास अधिकारी ग्राम पंचायत डोंगरखंडाळा यांना लेखी दिलेले असून जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्राम पंचायत डोंगरखंडाळा यांनी सुध्दा माहिती रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन दिलेली आहे असे लेखी दिलेले असून भविष्यात काही प्रशासकिय बाबी उदभवल्यास त्यास जबाबदार राहू असे लेखी दिलेले असल्यामुळे वरील दोनही अपीले ही खारीज करण्यात येत आहे.

नागपूर

दि. 20.6.2008

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.103–104

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 409/2008.**

श्री श्रीराम रंगनाथ बल्लाळ
अशोकनगर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक
वार्ड क्र. 5, अकोला 444003 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
(सा. प्र. वि.) महानगर पालिका अकोला
2) जन माहिती अधिकारी तथा
अभिलेखापाल (विभाग प्रमुख)
महानगर पालिका अकोला ता. जि. अकोला ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 20.6.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 15.5.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हे सुनावणीच्या मागील तारखेस गैरहजर असल्यामुळे उत्तरवादी यांचे म्हणणे एकुन घेतले होते व अपीलकर्ता यांचे म्हणणे एकुन घेण्यासाठी त्यांचे विनंतीप्रमाणे पुढिल तारीख आज देण्यात आली होती. आज अपीलकर्ता यांचे म्हणणे एकुन घेण्यात आले.

2. अपीलकर्ता यांनी दि. 23.11.2006 रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा

अभिलेखापाल (विभाग प्रमुख) महानगर पालिका अकोला यांचेकडे खालिलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. श्री एस. आर. बल्लाळ यांच्या सेवापुस्तकातील नोंदी नुसार दि. 8.5.1984 रोजी मा. प्रशासक न.पा.यांनी त्यांचे आदेशान्वये विभागीय चौकशी न करता विभागीय चौकशी अधिकारी हयांनी केलेली चौकशी दि. 20.6.84 च्या अहवालामध्ये दि.20.8.83 ते 8.5.84 पर्यंतचा निलंबीत काळ ही शिक्षा समजुन 1 वेतनवाढ कायमची रद्य करण्याबाबत केलेल्या शिफारस ही विहीत मुदतीचा अवलंब न करता नियमानुसार केलेली नाही. हा अन्याय आहे. सदरच्या नोंदी संदर्भात मुळ दस्तऐवजाची सत्यप्रत प्रमाणीत प्रत.

2. श्री बल्लाळ यांनी दि. 16.7.84 रोजी वरिल आदेशाच्या संदर्भात स्थगिती मिळवुन कामावर घेण्याचा केलेला विनंती अर्ज व तो मान्य केल्यचे मा. प्रशासकीय आदेशाची प्रत व माफ केलेल्या शिक्षेची माहिती संदर्भात मुळ दस्तऐवजाची सत्य प्रमाणीत प्रत.

3. अ.ले.प. व मुख्य ले.प. यांनी विभागात माझे 21 वर्षाची एक वाढ रोखलेली मा. आयुक्त महोदय यांनी दि. 29.3.06 रोजी सहानुभुतीपुर्वक मंजुरी दिलेली आहे. या देयकामध्ये देयकाची पुर्तता करणे आहे. त्रुटयांच्या संदर्भात सा.प्र.विभागाकडून आज तारखेपर्यंत धोरणात्मक कार्यवाही न केल्यामुळे त्याची कारण मिमांसाची सत्यप्रत व मुळ दस्तऐवजाच्या सत्य प्रतिसह कारण प्रलंबित सदर प्रकरणात त्रुटयाची पुर्तता करणे आवश्यक आहे. करीता हात जोडुन विनंती आहे.

माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दि. 18.12.2006 रोजी तीन मुद्याच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 29.1.2006 रोजी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 29.6.2007 रोजी सुनावणी घेण्यात आली व लेखापाल तथा जन माहिती अधिकारी यांनी घेतलेला निर्णय कायम करण्यात येवून दि. 6.7.2007 च्या पत्राप्रमाणे अपीलकर्ता यांना कळविले. परंतु

अपीलकर्ता यांना निर्णय न मिळाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. सदरच्या द्वितीय अपीलाच्या संदर्भामध्ये माहिती अधिकारी यांनी खुलासा करतांना अर्जदार हे म.न.पा.चे सेवानिवृत्त कर्मचारी असून सेवानिवृत्तीचे लाभ मिळण्याच्या दृष्टीने प्रकरणात माहिती मागितल्यामुळे प्रकरण अभिलेखापाल यांच्या ऐवजी कार्यालयीन अधिक्षक सा.प्र.वि. व लेखापाल लेखा विभाग यांचेकडे दि. 23.11.2006 रोजी पाठविण्यात आले. व तसे दि. 27.11.2006 व 28.11.2006 ला अवगत करण्यात आले असे दिसून येते. पुन्हा खुलासा करतांना तत्कालीन अभिलेखापाल श्री बल्लाळ यांनी त्यांचे हस्ताक्षरात कार्यालयीन टिपणी (परिशिष्ट–4) ''श्रीराम रंगनाथ बल्लाळ यांना कोर्टाने दोषी ठरविले नाही न.पा. प्रशासनाने विभागीय चौकशी न करता चौकशी अधिकारी न नेमता विभागीय चौकशीवी शिक्षा दिलेली आहे हा अन्याय केलेला आह. कोर्टाचा अवमान झालेला आहे. तरी महादय निलंबनाखाली ही शिक्षा गृहित धरावी व सन 1983 पासून एक वेतनवृध्दी थांबविण्यात आलेली पुर्ववत करण्याबाबत हरकत नसावी म्हणजे मागासवर्गीय कर्मचा–यावरील अन्याय दूर होईल असेही मी सुचवितो''. अशी सुचना करुन ''लेखापाल यांचेकडून सविस्तर सेवा पुस्तकाच्या आधारे अहवाल मागविण्याची आवश्यकता आहे म्हणजे सोयीचे होईल अशी शिफारस देखील केलेली आहे. या कार्यालयीन टिपणीचे सखोल अवलोकन केले असता श्री बल्लाळ यांचे 1983 साली झालेले निलंबन आणि चौकशी प्रकरणाशी संबंधित दस्तऐवज नस्ती महानगरपालिकेच्या अभिलेख विभागात उपलब्ध नसल्याची बाब श्री बल्लळ यांना माहित असल्याचे स्पष्ट होते. श्री बल्लाळ यांनी कोर्टाने निर्दोष मुक्तता केले असल्यासंबंधी आदेशाची प्रमाणित प्रत मिळण्याकरीता दि. 10.1.2006 रोजी अकोला जिल्हा न्यायालयात (परिशिष्ट–5) दाखल करुन मागितली होती. न्यायालयातून सदर प्रत त्यांना उपलब्ध झाली नाही. निलंबन चौकशी आणि शिक्षा या संदर्भातील दस्तऐवजाच्या नस्ती अभिलेख्याच्या 'ड'

श्रेणीत समावेश होतो. शिक्षेच्या संदर्भात आदेश पारीत झाल्यानंतर या आदेशा विरुध्द विहित कालावधीत अपील दाखल करण्यात आले तर अपीलाचा अंतिमतः निपटारा झाल्यानंतर अथवा अपील करण्यात आले नाही तर शिक्षेचे आदेश मान्य असल्यामूळे त्या आदेशाच्या 5 वर्षानंतर सदर प्रकरणाची कागदपत्रे कायमस्वरुपी दस्तऐवज नसल्यामूळे शिक्षेचे सेवा पुस्तकात नोद घेवून सदर प्रकरणाची नस्ती नष्ट करण्यात येते. सबब प्रस्तूत प्रकरणामध्ये 1984 साली घेण्यात आलेल्या नोंदी संदर्भातील मुळ प्रकरणाची मुळ दस्तऐवज उपलब्ध नसल्याचे अपीलकाराला माहित असलेलीच वस्तुस्थिती माहितीचा अधिकार अधिनियमाच्या तरतुदीनुसार विहित कालावधीत अपीलकाराला पत्राद्वारे कळविण्यात आली. सबब अपीलकारालाचे अपील अस्विकृत करण्यास पात्र ठरते अशी विनंती करण्यात येत आहे. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांच्या अर्जातील मुद्या क. 3 नुसार मा. आयुक्त यांनी दि. 29.3.2006 रोजी माझे 21 वर्षाच्या 1 वेतनवाढ रोखल्यास सहानुभूतीपूर्वक मंजुरी दिलेली आहे. या देयकामध्ये देयकाची पूर्तता करणे आहे. त्रुटीच्या संदर्भात सा.प.विभागाकडून आज पर्यंत धोरणात्मक कार्यवाही न केल्यामुळे याची कारणमिमांसाची सत्यप्रत आणि मुळ दस्तऐवजाच्या सत्यप्रती सह कारण प्रलंबित सदर प्रकरणात त्रुटयांची पुर्तता करणे आवश्यक आहे. व हया अर्जातील मुद्या सा.प्र.वि.शी संबंधित नाही असे उत्तर दिलेले असल्यामुळे सदरचे उत्तर हे अपूर्ण आहे व दि. 28.3.2006 रोजी आयुक्तांनी दिलेल्या निर्णयाप्रमाणे झालेल्या कार्यवाहीची माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही ती उपलब्ध करुन दयावी. सदरचे प्रकरण स्था. (कार्यालय) हयांचे उक्त बाबीवरील सविस्तर अहवाल सादर करावा असे जे नमूद केलेले आहे तर सदरच्या अहवालाची व अंतीम कार्यवाहीची प्रत उपलब्ध करुन दयावी असे अपीलकर्ता यांनी सांगितले. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

5

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे दि. 23.11.2006 च्या अर्जातील मुद्या क्र. 3 च्या संदर्भात अपीलकर्ता यांना झालेल्या अंतिम कार्यवाहीची प्रत हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत रजिस्टर पोस्टानी विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दि...2008

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.105–109

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1661/2007.**

श्री डॉ. माहसीन अहमद
268–269, न्यु कॉलनी, मंगल बाजार,
सदर, नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसचिव,
राज्य उत्पादन शुल्क, गृह विभाग,
मंत्रालय, मुंबई 400 032.
2) जन माहिती अधिकारी तथा
अवर सचिव (इएक्ससी–3)
गृह विभाग, मंत्रालय, मुंबई 400 032. ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 21.6.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 6.3.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 20.10.2006 रोजी प्रधान सचिव, परिवहन व राज्य उत्पादन शुल्क यांचेकडे खालिलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

Subject : Recovery against M/s. Meher Distilleries Pvt. Ltd. Dist. Thane.

Required Information : Copies of the total file pertaining to the High Power Committee, its report, copies of opinion of each and every member, copies of the decision taken by the State Government in this regards, copies of the minutes and notesheets be provided.

Request % The aforestated information in the form of copies of all documents mentioned as above be provided by speed post against payment of requisite fees for the same.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव गृह विभाग यांनी दि. 16.11.2006 रोजी आपण आपल्या दि. 20.10.2006 च्या अर्जामध्ये मागणी केलेली कागदपत्रे पुरविण्याबाबतची आपली विनंती राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम 8 (1) (झ) यामधील तरतूदीनुसार अमान्य करण्यात येत आहे. आपणास असेही कळविण्यात येते की सदर निर्णयाने आपण व्यथित झाला असला तर श्री गौ.जो.रसाळ, अपीलीय प्राधिकारी उपसचिव, राज्य उत्पादन शुल्क, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई 32 यांच्याकडे विहीत मुदतीत अपिल दाखल करु शकता. सदरच्या निर्णयामुळे अपीलकर्ता हे व्यथित झाल्यामुळे त्यांनी दि. 23.11.2006 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 2.1.2007 रोजी निर्णय दिला असून अपीलकर्ता यांचे अपील फेटाळण्यात आले आहे. व

जन माहिती अधिकारी यांचा निर्णय कायम करण्यात आला आहे. सदरच्या निर्णयाने व्यथित होवून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. अपीलकर्ता यांच्या दि. 20.10.2006 च्या अर्जात मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता मेहेर डिस्टीलरीज प्रा. लि. जि. ठाणे यांचे विरुध्द वसुलीच्या संदर्भामध्ये उच्च स्तरीय समितीचा अहवाल, प्रत्येक सदस्याचा अभिप्राय आणि शासनाने घेतलेल्या निर्णय व नोटशिट मधील सर्व टिपणीची माहिती मागितलेली दिसते व त्या माहितीच्या संदर्भामध्ये ती उपलब्ध करुन देता येणार नाही म्हणून अधिनियमाच्या कलम 8 (1) (झ) प्रमाणे ती देता येणार नाही असा निर्णय घेतलेला दिसून येतो. अधिनियमाच्या कलम 8 मध्ये माहिती प्रकट करण्यात अपवाद देण्यात आलेले आहे. कलम 8 (1) (झ) येणेप्रमाणे ''मंत्रीमंडळाची कागदपत्रे तसेच मंत्रिपरिषद, सचिव व इतर अधिकारी यांच्या विचारविमर्शाचे अभिलेख, परंतु मंत्रिपरिषदेचे निर्णय त्याची कारणे आणि ज्या आधारावर ते निर्णय घेण्यात आले होते ती सामग्री ही निर्णय घेतल्यानंतर आणि ते प्रकरण पूर्ण झाल्यावर किंवा समाप्त झाल्यावर जाहीर करण्यात येईल : परंतु आणखी असे की या कलमामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या अपवादांतर्गत असणा—या बाबी प्रकट करण्यात येणार नाहीत :'' अशा प्रकारची तरतुद आहे. अर्जाचे तारखेस संपूर्ण प्रक्रिया ही अपूर्ण असल्यामुळेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अधिनियमाप्रमाणे कलम 8 (1) (झ) चा आधार घेतलेला दिसतो त्याकरीता या संपूर्ण प्रकरणाची माहिती जी अपीलकर्ता यांनी त्यांच्या द्वितीय अपील मेमोमध्ये दिलेली आहे तशीच माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या निर्णयामध्ये व खुलाशामध्ये दिलेली आहे. ती थोडक्यात खालिलप्रमाणे :

''मेहेर डिस्टलरीज यांचेकडे विक्रीकर व उत्पादन शुल्क यांची थकबाकी होती. त्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांनी पी आय एल रिट पिटिशन नं. 1337/2002 दाखल केलेला आहे. व त्या पी आय एल च्या संदर्भामध्ये त्यांना उपलब्ध माहितीची आवश्यकता

आहे असे त्यांनी नमूद केले आहे. मेहेर डिस्टलरीज कडे जी थकबाकी आहे त्या संदर्भात सुध्दा मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी दि. 18.6.2001 रोजी वसुली करावी असा निर्णय दिलेला आहे. असे अपीलकर्ता यांनी सांगितले त्यानुसार उच्चधिकार समितीची नियुक्ती करण्यात आली होती व त्या उच्चधिकार समितीच्या शिफारशीप्रमाणे मंत्रीमंडळाने निर्णय घेतला. व त्यानंतर सुध्दा मेहेर डिस्टलरीज कडून तशा प्रकारे वसुली करावी याबद्यल मा. मुख्य सचिव यांचेकडे प्रकरण सोपविण्यात आले आहे. वरील कारणास्तव प्रकरण पूर्ण झालेले नसल्यामुळे अधिनियमाच्या कलम 8 (1) (झ) चा आधार घेतलेला दिसून येतो. परंतु त्यानंतर मेहेर डिस्टलरीजच्या संदर्भामध्ये विधानसभा तारांकित प्रश्न क्र. 52068 श्री एकनाथ शिंदे, श्री सुरेश गंभीर (माहिम) विधानसभा सदस्य यांनी विचारलेला होता. सदरच्या संपूर्ण प्रश्नामध्ये श्री गणेश नाईक मंत्री राज्य उत्पादन शुल्क यांनी उत्तरे दिलेली आहेत. ती उत्तरे सुध्दा स्वयंस्पष्ट दिसून येतात. तसेच मा. उच्च न्यायालयामध्ये रिट पिटिशन नं. 110/04 व 111/04 खंडपीठ मुंबई येथे उच्च समितीचा अहवालाकरीता दाखल करण्यात आलेला आहे असे अपीलकर्ता यांनी सांगितले व जन माहिती अधिकारी यांनी सुध्दा मान्य केले. त्यावरुनही

अधिनियमाच्या कलम 8 (1) (झ) च्या परंतूकामध्ये ''जी माहिती संसदेला किंवा राज्य विधानमंडळाला देण्यास नकार देता येणार नाही, ती माहिती कोणत्याही व्यक्तीला देण्यासही नकार देता येणार नाही'' अशी तरतुद असल्यामुळे व ही माहिती राज्य विधान मंडळाला दिलेली असल्यामुळे तसेच वर नमूद केल्याप्रमाणे मा. उच्च न्यायालयामध्ये सुध्दा सादर केलेली असल्यामुळे अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यास अपवाद करता येणार नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी त्यांच्या अर्जात मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांना माहिती न दिल्याबद्यल शिक्षा व्हावी अशी विनंती केली आहे. त्यावर नमूद केल्याप्रमाणे संपूर्ण प्रकरण हे त्यावेळेस अनिर्णित

असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाच्या कलम 8 (1) (झ) प्रमाणे माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही असे जे म्हटलेले आहे ते सद्‌भावनेने दिलेले आहे असे म्हणवे लागते. त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी याकरीता मात्र अपील मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 20.10.2006 च्या अर्जात मागितलेली माहिती हा निर्णय मिळाल्यापासून 30 दिवसाचे आंत रजिस्टर पोस्टाने मागितलेल्या माहितीच्या छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि. 21.6.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.110–114

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1666/2007.**

श्री शैलेश माणिकराव हुमणे
56/2, पाटील माळा, कुकडे ले आउट,
नगपूर 440 027. ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री आर. एस. आगवणे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक,
भूमी अभिलेख नागपूर
2) श्री शिवदास गुंड
जन माहिती अधिकारी तथा
नगर भूमापन अधिकारी क. 2, नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 21.6.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 11.5.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 15.12.2006 रोजी मौजा बाबुलखेडा खं. नं. 53/06 नगर भूमापन शीट क. 282/53 आणि 282/52 मध्ये येणा–या प्लॉटच्या फेरफाराबाबत

संपूर्ण माहिती. माहितीचा कालावधी 2006 पर्यंत. आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णनामध्ये खालीलप्रमाणे 6 मुद्यांमध्ये शासकीय माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी क्र. 2 यांना माहिती मागितलेली दिसून येते.

1. मौजा बाबुलखेडा व खसरा 53/6, नगर भूमापन शीट क्र. 282/53 आणि 282/52 मध्ये एकंदर किती लोकांच्या प्लॉटचे फेरफार झाले आहे त्या लोकांची यादी.

2. मौजा बाबुलखेडा व खसरा 53/6, नगर भूमापन शीट क्र. 282/53 आणि 282/52 मध्ये एकंदर किती लोकांच्या प्लॉटचे फेरफार नाही झाले (शेती आहे) त्या लोकांची यादी.

3. मौजा बाबुलखेडा व खसरा 53/6, नगर भूमापन शीट क्र. 282/53 आणि 282/52 मध्ये एकंदर किती लोकांच्या प्लॉटचे गैरकृषी/एन ए पी 34 चे आदेश झाले आहे त्या लोकांची यादी व आदेशाची प्रत.

4. मौजा बाबुलखेडा व खसरा 53/6, नगर भूमापन शीट क्र. 282/53 आणि 282/52 मध्ये एकंदर किती लोकांनी फेरफार करता प्लॉटचे गैरकृषी/एन ए पी 34 चे आदेश दिले होते त्या लोकांची यादी

5. मौजा बाबुलखेडा व खसरा 53/6, नगर भूमापन शीट क्र. 282/53 आणि 282/52 मध्ये ज्या लोकांचे फेरफार झाले आहे त्या प्लॉटचे फेरफार नगर भूमापन अधिकारीने कोणत्या नियमाने केले आहे किंवा कोणत्या योजनेखाली केले आहे त्याची पुर्ण माहिती आहे.

6. मौजा बाबुलखेडा व खसरा 53/6, नगर भूमापन शीट क्र. 282/53 आणि 282/52 भूमापन क्रमांक 6621 प्लॉट नं. 37 दि. 2.2.1995 ची खरेदी असल्यावर ही नगर भूमापन अधिकारीने फेरफार का केले नाही.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने नगर भूमापन अधिकारी क्र. 2 यांनी दि.11.1.2007 रोजी मुद्या क्र. 1 ते 5 : सदरचे कार्यालयात खसरा नंबर प्रमाणे कार्यवाही होत नाही.

नगर भूमापन क्रमांक प्रमाणे कार्यवाही करण्यात येते. तसेच शीट क्र. 282/53 आणि 282/52 मधील खं. नं. 53/06 चे संबंधाने आपणास ज्या मिळकती बाबत आवश्यकता असल्यास शासकीय नियमान्वये फी चा भरणा करुन मिळकत पत्रिका प्राप्त करुन घ्यावी. मुद्या क्र. 6 : याबाबत आपणास प्राप्त कार्यालयीन त्रुटीपत्र क्र. बा.नि.935/प.भू./बाबुळखेडा/06 दि. 11.8.2006 चे अवलोकन करावे असे कळविण्यात आलेले दिसून येते. सदरच्या निर्णयाने अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 2.2.2007 रोजी प्रथम अपील प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक भूमी अभिलेख यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या निर्णय दि. 3.3.2006 रोजी देण्यात आला असून नगर भूमापन अधिकारी क्र. 2 नागपूर हे माहिती देण्यास तयार आहेत त्यांनी त्याबाबत विहीत फी अर्जदार यांना कळविलेली नाही ती त्यांनी एकुण नगर भूमापन क्रमांक किती व फी किती हे अर्जदार यांना 3 दिवसात कळवावे व सदर बाब कळविल्या नंतर अपिलार्थी यांनी नगर भूमापन अधिकारी क्र. 2 नागपूर यांचेकडे नकलसाठी वाजवी ती नियमानुसार फी भरुन नकला प्राप्त करुन घ्याव्यात असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयाप्रमाणे नगर भूमापन अधिकारी तथा शासकीय माहिती अधिकारी यांना रु. 675/- शुल्क या कार्यालयाकडे प्रदान करावे किंवा मनिऑर्डरने पाठवावे असे कळविलेले दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांनी दि.20.3.07 रोजी माहिती विनामुल्य मिळावी याकरीता अपेक्षा करणो असे पत्र दिलेले दिसून येते. व त्यावर कोणत्याही प्रकारचे उत्तर न मिळाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता यांनी दि. 15.3.2007 चे पत्रा प्रमाणे माहिती उपलब्ध करुन का दिली नाही याबद्यल माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की माहितीचे शुल्क भरले नसल्यामुळे माहिती उपलब्ध करुन का दिली नाही. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना विहीत मुदतीत फी कळविलेली नसल्यामुळे

माहिती त्यांना विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी. विहीत मुदतीत फी कळविली नाही त्याचे कारण माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की किती भूमापन क्रमांक असतील याची निश्चित माहिती असल्याशिवाय सदरची माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. त्याकरीता त्यांनी संपूर्ण भूमापन शीट क्र. 282/53 आणि 282/52 आयोगाचे निदर्शनास आणला. त्यावर माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की खसरा नंबर हा जमीन ही शेतीकडे असल्यास असतो. व शेती अकृषिक झाल्यावर त्याला भूमापन क्रमांक मिळतो व त्यामुळे नगर भूमापन कार्यालयामध्ये भूमापन क्रमांकावरच कोणतीही माहिती उपलब्ध होवू शकते. शीट क्र. 282/53 व 282/52 मध्ये जे भूखंड आहेत त्या भूखंडाच्या संदर्भामध्ये भूमापन क्रमांक दिलेला आहे. त्यामध्ये संबंधीत खसरा नंबर दिलेला नाही. व त्यामुळे खसरा नंबरच्या स्वरुपात भूमापन क्रमांकाची माहिती उपलब्ध होवून शकत नाही. आखीव पत्रिकेवरुन अभिप्रायाची माहिती उपलब्ध होवू शकते परंतु आखीव पत्रिकेसाठी सुध्दा भूमापन क्रमांकाची गरज आहे. व भूमापन कार्यालयातून तयार माहिती उपलब्ध करुन घ्यावयाची असेल तर ती त्यांच्या पूर्वीच ठरविलेल्या नियमाप्रमाणे उपलब्ध करुन घेता येते. व ती त्यांना प्रत्येकी रु. 15 नोंद या प्रमाणे आकारणी करण्यात येईल त्यामुळे एका आखिव पत्रिकेत जेवढया नोंदी येतील तेवढया प्रत्येकी 15 रु. प्रमाणे आकारणी करावी लागेल. त्यापेक्षा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना असे सुचविले की त्यांनी त्यांना आवश्यक असलेल्या खसरा नंबर किंवा शिटच्या संदर्भात भूमापन क्रमांकाच्या आखिव पत्रिकेची पाहणी करावी व त्यावरुन त्या नोंदी घेण्यात याव्या. व त्याबाबतची फी त्यांना मात्र भरावी लागेल. व तसेच अपीलकर्ता यांना सुध्दा मान्य झालेले आहे त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी क्र. 2 यांचे कार्यालयामध्ये उपस्थित होवून त्यांना आवश्यक असलेल्या माहितीची पाहणी करुन त्यातून आवश्यक असलेल्या नोंदी करुन घ्याव्या. त्याकरीता अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांना तारीख व वेळ कळवावी व त्याप्रमाणे पाहणी करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी व तशी पोच द्यावी.

2) जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांनी तारीख व वेळ कळविल्यावर त्यावेळेस त्यांच्या नियमाप्रमाणे अपीलकर्ता यांना अभिलेखे पाहणीकरीता उपलब्ध करुन देण्यात यावे.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि. 21.6.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1676/2007.**

श्री सतीश आर. दळवे
शेडे नगर, कामठी रोड, पोष्ट उप्पलवाडी
नगपूर 26 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री सी. एस. डहाळकर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अतिरिक्त जिल्हाधिकारी नागपूर
2) श्री आर. एस. मावस्कर
जन माहिती अधिकारी तथा
अन्न धान्य वितरण अधिकारी नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 23.6.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 8.6.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी माहिती मागण्याचा अर्ज प्रपत्र 'अ' कागदपत्रामध्ये दाखल केलेले नाही. दि. 6.9.2006 चा एक अर्ज दाखल केलेला दिसून येतो परंतु अपीलकर्ता

सांगतांना इतर अर्जाचा संदर्भ देत आहे. तसेच दि. 6.9.2006 चा अर्ज हा माहितीच्या अधिकारातील अर्ज दिसून येत नाही किंवा त्या नमूत्यात सुध्दा नाही. सदर अर्ज हा तक्रारस्वरुपातील अर्ज दिसून येतो. प्रथम अपील दि. 28.2.2007 रोजी दाखल केलेले दिसून येते. परंतु ते कोणत्या अर्जाच्या संदर्भात दाखल केले आहे त्याबाबतचा उल्लेख त्या प्रथम अपीलात नाही. त्या कोळसा हे अन्न व नागरी विभागाच्या अखत्यारित येत नाही हया संबंधीचा जी. आर. कॉपी मिळाली नाही असे त्यांनी कारण दिलेले दिसून येते. तसेच द्वितीय अपीलात सुध्दा वरील स्वरुपाची माहिती व विषयाचे जी. आर. मिळाले पाहिजे असे दिलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी दाखल केलेले प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 1.11.2006 रोजी अर्ज दाखल केला होता असा उल्लेख दिसून येतो. त्यामध्ये दि. 19.12.2006 रोजी त्यांना माहिती दिलेली दिसून येते. त्यानंतर अपीलार्थी यांनी सदर विषयाच्या अनुषंगाने दि. 11.1.2007 रोजी दाखल केलेला अर्ज हा आत्मदहन करण्याचा इशा–याचा आहे. त्यावर अन्नधान्य वितरण अधिकारी नागपूर यांनी दि. 23.1.2007 रोजी अपीलार्थी यांस कळविलेले आहे. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयात लोकशाही दिन टोकन क्र. 70 नुसार दि. 14.11.2005 रोजी तसेच शासनाकडून दिनांक 29.7.2006 रोजी अपीलार्थीस मिळविण्यात आलेले दिसून येते. अपीलार्थीस विविध स्तरावरुन कळविण्यात आलेल्या उत्तराचे अवलोकन केले असता अन्नधान्य वितरण अधिकारी नागपूर यांनी दि. 19.12.2006 रोजी दिलेला असा निर्णय कायम ठेवण्यात येत आहे. दि. 19.12.2006 रोजी दिलेल्या निर्णयाप्रमाणे सुध्दा अपीलकर्ता यांनी दाखल केलेली नाही. यावरुन अपीलकर्ता यांनी अनेक कार्यालयामध्ये अनेक प्रकारे अर्ज करुन सुध्दा माहिती चुकीची दिली आहे असे म्हणत आहे. मात्र माहिती चुकीची देली आहे याबद्यल सिध्द करण्यासाठी त्यांच्या जवळ कागदपत्राच्या स्वरुपात कोणत्याही प्रकारचा पुरावा नाही. जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तरावरुन तसेच कार्यासन अधिकारी अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग मंत्रालय यांनी दिलेल्या

उत्तरावरुनच त्यांच्या स्वतःच्या कल्पनेप्रमाणे ते युक्तीवाद करीत आहेत. या संपूर्ण प्रकरणातून असे दिसून येते की दगडी कोळशाच्या संदर्भामध्ये अधिकारी अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचेकडून त्यांना Sponsership मिळवून पाहिजे आहे असे दिसते. परंतु औद्योगीक वापरासाठीच्या दगडी कोळशाच्या संदर्भामध्ये अन्न नागरी पुरवठा हा विषय नाही असे त्यांना कळविलेले आहे. तरी शासन कार्यनियमावलीतील मंत्रालयीन विभागांना नेमून दिलेल्या विषयाच्या यादीनुसार उद्योग, उर्जा व कामगार विभागाला नेमून दिलेल्या विषयाच्या यादीतील अनु.क्र.10 येथे ''औद्योगिक वापरासाठी दगडी कोळसा, कोक (त्यापासून उत्पादीत पदार्थासह) याचा पुरवठा व वितरण करणे'' हा विषय नेमून दिलेला आहे असे कळविलेले आहे व त्याच आधारावर त्यांना दि. 9.6. 2003 चे पत्र दिलेले आहे असेही कळविलेले आहे. शासन स्तरावर जे मंत्रालयीन विभाग केलेले असतात त्या मंत्रालयीन विभागाच्या अंतर्गत कोणकोणते विषय असावेत त्याकरीता संविधानाच्या अनुच्छेद 166 प्रमाणे शासन कार्यनियमावली ही मा. राज्यपालांनी तयार केलेली असते व त्यामध्ये शासनाचे जे विभाग आहे त्या विभागाअंतर्गत येणारे विषय नेमून दिलेले असतात त्यास शासन निर्णय म्हणत नाहीत. व शासन निर्णयाप्रमाणे कोणताही विषय हा कोणत्या विभागाअंतर्गत येईल असे ठरविले जात नाही व त्यांना शासन कार्यनियमावलीतील उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या संदर्भात अनु.क्र.10 विषय औद्योगिक वापरासाठी दगडी कोळसा, कोक (त्यापासून उत्पादीत पदार्थासह) याचा पुरवठा व वितरण करणे'' हा विषय नेमून दिलेला आहे असे कळविलेले आहे. अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचेकडे सदरचा विषय नसल्याचा अशा प्रकारचा शासन निर्णय पुरविणे शक्य नाही. त्याकरीता अपीलकर्ता यांना शासन कार्यनियमावलीची प्रत पुरविणे हा एकच मार्ग आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

4

# आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना शासन कार्यनियमावलीची छायांकित प्रत मागवून त्यांना 30 दिवसाच्या आंत उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि. 24.6.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.120–123

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1680/2007.**

श्री सत्तार खान अब्बास खान
पांडे महाल समोर, भंडारा
ता. जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस अधिक्षक भंडारा
ता. जि. भंडारा

2) जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय पोलीस अधिकारी
भंडारा उपविभाग भंडारा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 23.6.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 7.6.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज ठेवण्यात आली होती. अपीलकर्ता व

उत्तरवादी हजर आहेत. अपीलकर्ता यांनी आयोगाकडे Pursis दाखल केले आहे. त्यांना जी माहिती अपेक्षित होती ती माहिती मिळालेली असल्यामुळे सदरचे अपील हे मागे घेण्यास परवानगी मिळावी व त्याप्रमाणे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

नागपूर
दि. 23.6.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.124–125

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1689/2007.**

श्री राजू रामाजी राहूलकर
वल्लभ भाई वार्ड, पॉल चौक, रेलटोली,
गोंदिया सिटी ता. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसचिव,
अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई – 32.
2) श्री गि. ज. ताहराबादकर
जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,
अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई – 32. ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 25.6.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 10.6.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या अपीलाची सुनावणी आज ठेवण्यात आली हेती. अपीलकर्ता यांनी मुदत मागितलेली आहे. जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव श्री गि. ज. ताहराबादकर हे हजर आहेत. अपीलकर्ता यांचा मुदतीचा अर्ज अमान्य केलेला आहे.

2. अपीलकर्ता यांनी दि. 15.5.2006 रोजी शासकीय माहिती अधिकारी अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे माहिती मागितलेली होती. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 20.6.2006 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी दि. 12.7.2006 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दि. 28.2.2007 रोजी देण्यात आला. प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या निर्णय विरुध्द अपीलकर्ता यांनी दि. 10.6.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. तसेच दि. 9.7.2007 रोजी सुध्दा पुन्हा आयोगाकडे मुंबई येथे अपील दाखल केले. सदरच्या अपीलाची सुनावणी दि. 11.9.2007 रोजी झालेली असून दि. 12.9.2007 रोजी सद्यःपरिस्थितीनुसार माहिती देण्यात विभागकडून खोटी झाल्याचे दिसून येत नाही असा निर्णय देवून राज्य मुख्य माहिती आयुक्त यांनी सदरचे अपील निकाली काढलेले दिसून येते. अपीलकर्ता यांचे दि. 10.6.2006 चे अपील सुध्दा दि. 28.2.2006 च्या प्रथम अपीलाच्या निर्णया विरुध्द आहे. याचा अर्थ अपीलकर्ता यांनी एकाच प्रथम अपीलाच्या निर्णया विरुध्द दोन द्वितीय अपीले राज्य माहिती आयोगाकडे दोन वेगवेगळया तारखांना म्हणजे दि. 10.6.2007 व 9.7.2007 रोजी दाखल केलेले आहे. व एका अपीलामध्ये निर्णय दिलेला असल्यामुळे तशाच प्रकारच्या दुस–या अपीलामध्ये पुन्हा निर्णय देणे योग्य नाही. अपीलकर्ता यांनी मा. मंत्री महोदय यांचेकडे श्री केशव लालवानी, श्रीमती कमलाबाई लालवानी व सुरेश लालवानी रा. गोंदिया मा. मंत्री महोदय यांचेकडे केलेल्या अपीलाच्या संदर्भामध्ये काय कार्यवाही झाली याबाबतची माहिती त्यांनी द्वितीय अपीलात मागितलेली दिसून येते. आता 2008 मध्ये त्याबद्यलची काय परिस्थिती आहे हे जन माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की त्या अपीलाचे निर्णय झालेले आहेत. जर मा. मंत्री महोदय यांचेकडे अपीलकर्ता यांनी अपेक्षित केलेल्या अपिलाच्या संदर्भामध्ये निर्णय झालेला असल्यास त्याबाबत त्यांना कळविणे हे योग्य राहिल. मात्र अपीलकर्ता यांच्या दिनांक

15.5.2006 च्या माहितीच्या अर्जाच्या संदर्भामध्ये द्वितीय अपीलापर्यंत निर्णय होवून कार्यवाही पूर्ण झालेली असल्यामुळे पुन्हा त्याच वेगळया तारखांच्या अपीलाच्या संदर्भात वर म्हटल्याप्रमाणे निर्णय देणे योग्य नसल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांनी एकच अपील वेगवेगळया तारखांना दाखल केले असल्यामुळे व एका अपीलामध्ये राज्य माहिती आयोगाने निर्णय दिलेला असल्यामुळे अपीलकर्ता यांचे दि. 20.6.2006 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि. 25.6.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.126–128

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1687/2007.**

श्री सुनिलकुमार ग. मिश्रा
रा. सेंट्रल इंडिया इंन्सिटिटयुट ऑफ मास कम्युनिकेशन
व्ही.आय.पी.रोड धरमपेठ नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री वि. ना. मोरे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सह सचिव,
सामान्य प्रशासन विभाग (का.9)
मंत्रालय, मुंबई – 32
2) श्री दि. भि. कुदळे
जन माहिती अधिकारी तथा
अवर सचिव,
सामान्य प्रशासन विभाग (का.9)
मंत्रालय, मुंबई – 32 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 25.6.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 25.6.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 18.4.2007 रोजी कक्ष अधिकारी तथा माहिती अधिकारी यांचा भा. प्र. से. 1992 तुकडीचे अधिकारी श्री लोकेशचंद्र व श्रीमती आभा शुक्ला यांनी आपल्या संपत्तीची माहिती शासनाला कळविली आहे त्याची माहिती देण्यात यावी. माहिती व्यक्तिशः किंवा टपालाद्वारे स्विकारणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अवर सचिव तथा जन माहिती अधिकारी यांनी दि. 4.5.2007 रोजी अपीलकर्ता यांना '' माहितीचा अधिकार अधिनियम 2005 मधील नियम 8 (अ) प्रमाणे जी माहिती प्रकट करण्याचा कोणत्याही सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबंधाशी काही संबंध नसला किंवा (कोणत्याही) व्यक्तीच्या खाजगी बाबीमध्ये विनाकारण हस्तक्षेप होत असेल तर अशी माहिती देण्यास अपवाद केला आहे. आपण मागणी केलेली माहिती याच स्वरुपाची असल्याने सदर माहिती देता येत नाही असे कळविलेल दिसून येते. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दि. 15. 5.2007 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहसचिव यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले आहे. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहसचिव यांनी दि. 19.5.2007 रोजी दिलेला असून जन माहिती अधिकारी यांचा निर्णय कायम केलेला आहे. सदरच्या निर्णयाने व्यथीत होवून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

3. अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे युक्तीवाद करतांना असे सांगितले की मा. श्री शिवराज विश्वनाथ पाटील (गृहमंत्री भारत सरकार) लातूर लोकसभा मतदार संघामध्ये निवडणूक लढवितांना त्यांच्या संपत्तीचे विवरण दिलेले आहे. तसेच मा. श्रीयुत विलासराव देशमुख मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, यांनी सुध्दा लातून विधानसभा मतदार संघातील निवडणूक लढवितांना निवडणून निर्णय अधिकारी यांचेकडे त्यांच्या संपत्तीचे विवरण दिलेले आहे. व ती माहिती त्यांना माहितीच्या अधिकारत उपलब्ध झालेली आहे.

राज्याच्या मा. मुख्यमंत्र्याची किंवा देशाचे मा. गृह मंत्र्याची जर संपत्तीची माहिती उपलब्ध होवू शकते तर शासकीय अधिकारी यांची नियमाप्रमाणे सादर केलेली माहिती ही उपलब्ध झाली पाहिजे असे त्यांचे म्हणणे आहे. व त्याकरीता त्यांनी पुरावा म्हणून मा. श्रीयुत शिवराज पाटील व मा. श्रीयुत विलासरावजी देशमुख यांनी निवडणूक आयोगाकडे दाखल केलेले शपथ्पत्राच्या छायांकित प्रती दाखल केलेल्या आहेत. परंतु माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की श्रीयुत लोकेशचंद्र आणि श्रीमती आभा शुक्ला हया भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी असल्यामुळे व All India Services Act 1951 च्या तरतुदीखाली केलेल्या नियमाप्रमाणे त्यांच्या सेवा कालावधीत संपत्तीचे विवरणपत्र दरवर्षी दाखल करणे हे बंधनकारक असले तरी सदरचे विवरणपत्र हे बंद लिफाफ्यामधून दाखल करावयाचे असल्यामुळे तो एक प्रकारे गोपनिय दस्तऐवज होतो. व सदरची माहिती ही त्या अधिका–याने वैयक्तिक माहिती म्हणून विश्वासार्ह म्हणून शासनाकडे सादर केलेली असते. व त्या माहितीचा आणि सार्वजनिक कामकाजाशी कोणत्याही प्रकारचा तसा संबंध नसल्यामुळे त्यांच्या खाजगी बाबीमध्ये हस्तक्षेप करण्यासारखे होईल व त्यामुळे ती माहिती उपलब्ध करुन देता येत नाही याकरीता अधिनियमाच्या कलम 8 (1) (ञ) चा आधार घेतलेला आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा जन माहिती अधिकारी यांचा निर्णय कायम केलेला असून आयोगापुढे युक्तीवाद करतांना त्यांनी असे सांगितले की सदरची माहिती ही माहिती अधिकारी यांचेकडे बंद लिफाफ्यामध्ये असते व तो लिफाफा त्यांना उघडण्याचा अधिकार नाही परंतु एखाद्या अधिका–याच्या विरुध्द अपसंपदा गोळा केल्याची तक्रार असेल त्यावेळेस त्या अधिका–याच्या संपत्तीचे तक्रारीतील विवरण व शासनाकडे नियमाप्रमाणे दाखल केलेल्या बंद लिफाफ्यातील माहिती ती तपासून निर्णय शासन घेते व तो पर्यंत सदरची माहिती ही गोपनिय असते किंवा असावयास पाहिजे. व त्यामुळेच सदरची माहिती प्रकट

करण्या करीता अपवादाचा आधार घेण्यात आलेला आहे. याबाबत अधिनियमाच्या तरतुदींचा विचार केल्यास व जन माहिती अधिकारी यांनी घेतलेल्या अभिप्रायाचा विचार केल्यास एकतर त्या अधिका–याची माहिती मागितलेली आहे ते सार्वजनिक सेवक आहेत व सार्वजनिक सेवेत असतांना त्यांची सेवा ही शिस्तीच्या नियमाप्रमाणे नियमीत (regulate) केलेली असते. व त्यामुळे सदरची माहिती ही त्यांना सार्वजनिक सेवक म्हणून सादर करावयाची असेल व त्या नियमाचा उद्येश कोणत्याही सार्वजनिक सेवकांना अपसंपदा गोळा करु नये असा असेल तर त्याबाबत सदरची माहिती ही विश्वासार्ह म्हणून दिलेली नसून ती त्या सर्व नियमाचे पालन करण्याकरीता सार्वजनिक सेवक म्हणून दिलेली आहे व त्यामुळेच सदरची माहिती ही प्रकट करण्यास कोणत्याही प्रकारचा अपवाद करता येणार नाही. जरी भारतीय प्रशासकीय सेवा अधिनियम 1951 प्रमाणे किंवा त्याखालील नियमाप्रमाणे गोपनिय असावी असे असले तरी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 22 प्रमाणे ''अधिनियमाचा अधिभावी परिणाम असणे'' अशा प्रकारची तरतुदीमध्ये ''या अधिनियमाच्या तरतुदी या शासकीय गुपिते अधिनियम, 1923 (1923 चा 19) यामध्ये त्यावेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यामध्ये किंवा या अधिनियमा खेरीज कोणत्याही अन्य कायद्याच्या अन्वये अंमलात असणा–या कोणत्याही संलेखा मध्ये त्याच्याशी विसंगत असेल काहीही अंतर्भूत असले तरी अंमलात येतील'' अशी तरतुद आहे. व त्यामुळे ज्या भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिका–याची माहिती अपीलकर्ता यांनी मागितलेली आहे ती उपलब्ध करुन देणे हे अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणेच संयुक्तिक राहिल. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी युक्तीवाद करतांना असेही सांगितले की सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीचा गैरवापर होवू शकतो परंतु माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 6 प्रमाणे माहिती मागणे व ती कलम 7 (1) प्रमाणे उपलब्ध करुन देणे ही एवढीच पूर्ण प्रक्रिया

अधिनियमाच्या तरतूदीप्रमाणे आहे. उपलब्ध झालेल्या माहितीच्या संदर्भात कोणते परिणाम होतील याबाबतचा विचार अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीमध्ये नाही. व त्यामुळे सदरची माहिती ही सार्वजनिक व्यापक हिताच्या दृष्टीनेच व केलेल्या नियमाच्या उद्येशासी सुसंगतच असल्यामुळे उपलब्ध करुन देणे हे संयुक्तिक राहिल. व त्यामुळे अधिक पारदर्शकता येईल. व वर नमुद केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी सदरची माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता अधिनियमाच्या कलम 8 प्रमाणे उपलब्ध करुन देता येणार नाही असे जे म्हटले आहे ते अर्थातच त्यांना सदरचे बंद लिफाफा उघडण्याचा अधिकार नाही या त्यांच्या स्वतःच्या अभिप्रायाप्रमाणे सद्‌भावनेनीच म्हटले आहे हा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. कारण बंद लिफाफ्यात माहिती असल्यामुळे त्यांना ती प्रकट करता येणार नाही असे त्यांचे मत झाल्यामुळेच त्यांनी ती नाकारलेली आहे मात्र ती जाणूनबुजुन त्यांनी नाकारलेली नाही हा निष्कर्ष काढावयास हरकत नाही व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना त्याबाबत दोषी धरता येणार नाही. मात्र सदरची माहिती ही उपलब्ध करुन देण्याच्या करीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी दि. 18.4.2007 च्या अर्जाप्रमाणे जी माहिती मागितलेली आहे ती माहिती त्यांना हा निर्णय मिळाल्यापासून 30 दिवसाचे आंत नोंदणीकृत टपालाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर  
दि. 25.6.2008

( विलास पाटील )  
राज्य माहिती आयुक्त,  
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1192/2007.**

श्री धनीप्रसाद सुखदेव उसरबर्से
रा. कस्तुरबा गांधी वार्ड, झोपडपटटी भंडारा
ता. जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसंचालक
क्रिडा व युवा सेवा विभाग
विभागीय संकुल इमारत कोराडी रोड
मानकापुर नागपूर 30.
2) जन माहिती अधिकारी तथा
समादेशक अधिकारी
4 महा. नवल, एन.सी.सी.नागपूर
राजनगर, सदर छावणी नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 25.6.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 18.12.2006 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता विनाअनुमती गैरहजर आहे. माहिती अधिकारी सुध्दा आयोगापुढे हजर झाले नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेतर्फे खुलासा दाखल केलेला आहे परंतु तेही हजर नाहीत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 12.10.2006 रोजी भोळे वेतन ऐरिअर्स की मुळ रक्कम 1407 वर व्याज मिळणेबाबत. दि. 22.6.2006 रोजी स्मरणपत्र दि. 26.7.2006 उपसंचालक क्रिडा विभाग आवेदन की प्रति लिपीकी दि. 11.9.06. सिटी ॲन्ड कोरिअर सर्वीस अशी माहिती घेणार. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 25.10.2006 च्या अर्जानुसार आपणास आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन किंवा आवश्यक असलेली कागदपत्रे याबाबतचा उल्लेख अर्जामध्ये केला नाही. त्यामुळे आपणास कोणती कागदपत्रे आवश्यक आहे याचा बोध होत नाही. करिता आपणास आवश्यक असलेलया माहितीचा वर्णनाचा उल्लेख करुन अर्ज सादर केल्यास आपणास माहिती उपलब्ध करण्यात येईल असे अपीलकर्ता यांना कळविण्यात आलेले दिसते. त्यावर दि. 16.11.2006 रोजी अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केलेले दिसते. प्रथम अपीलात सुध्दा त्यांनी व्याज मिळणेबाबत दाखल केलेले अर्जाच्या संदर्भामध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 7.12.2006 रोजी व 12.12.2006 अन्वये माहिती अधिकारी 4 महा. नावीक दल नागपूर यांना श्री उसरबर्से यांच्यावर कारवाई करण्याबाबत सुचित करण्यात आले आहे. त्याची प्रत श्री उसरबर्से यांना देण्यात आलेली आहे. त्यानुसार 4 महा. नावीक दल नागपूर यांनी त्यांचे पत्र क्र. 4 एनयु/लेखा/527 दि. 15.12.2006 व 20.12.2006 अन्वये केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करुन त्याची प्रत श्री उसरबर्से यांना पाठविण्यात आलेली आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक 22.1.2007 च्या पत्रान्वये 4 महा. नाविक दल राष्ट्रीय छात्र सेना नागपूर यांनी केलेले होते ती श्री उसरबर्से यांना व्याजापोटी देणे असलेली रक्कम अदा करण्याबाबत काही बाबीचा खुलासा करावा त्यानुसार त्यांचे 5 फेब्रुवारी 2007 च्या पत्राप्रमाणे उपसंचालक कार्यालयास खुलासा करुन त्याची एक प्रत श्री उसरबर्से यांना पाठविलेली आहे. (प्रत जोडली आहे) परंतु या कार्यालयाचे दि. 28.7.2007 च्या पत्रान्वये संबंधित कार्यालयास कळविण्यात आले आहे की शासन निर्णयानुसार श्री उसरबर्से यांना

व्याजापोटी देय असलेली रक्कम अनुज्ञेय ठरत नाही त्यानुसार संबंधित कार्यालयाने श्री उसरबर्से यांना दि. 12.5.2007 च्या पत्रान्वये कळविले आहे की त्यांना भोळे वेतन आयोगाचे ऐरिअर्सच्या रकमेवर व्याज देता येत नाही. तसेच श्री उसरबर्से यांनी मा. लोक आयुक्त तसेच शासनाकडुन व्याज मिळणेबाबत वारंवार तक्रारी व अर्ज केलेले आहे परंतु सर्व तक्रारींचे निराकरण करण्यात आलेले आहे त्यावरुन श्री उसरबर्से यांची तक्रार करण्याची प्रवृत्ती दिसून आली आहे. असा खुलासा क्रिडा व युवक संचालक यांनी दाखल केला आहे व सर्व पत्रव्यवहाराची छायांकित प्रत सुध्दा दाखल केलेली आहे.

3. अपीलकर्ता यांनी माहितीच्या अधिकारामध्ये अर्ज दाखल केलेला असून त्यामध्ये व्याजाची मागणी केली आहे परंतु माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकारच्या निर्णय प्रक्रियेच्या संदर्भातील कार्यवाही करुन मागता येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांची व्याजाची मागणी ही ‘‘माहिती‘‘ या संज्ञेच्या व्याख्येत येत नाही व त्यामुळेच जन माहिती अधिकारी यांनी दि. 25.10.2006 रोजी कागदपत्राची माहिती मागितलेली नाही अशा प्रकारे अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये सुनावणी घेतली नाही मात्र माहितीच्या अधिकाराच्या अर्जाप्रमाणे निर्णय न देता व्याज देय आहे किंवा नाही याबाबतचा निर्णय दिलेला आहे तो अपेक्षित नाही. असे असले तरी अपीलकर्ता यांच्या या संपूर्ण प्रकरणामध्ये त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे प्रथम अपीलाच्या निर्णया विरुध्द द्वितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे करावयाचे असते व राज्य माहिती आयोगाकडे अपीलकर्ता अर्जदार व जन माहिती अधिकारी असे दोन पक्षकार असतात व तसेच अधिनियमाच्या कलम 19 (6) प्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही हि सिध्द करण्याची जबाबदारी जन माहिती अधिकारी यांनी असते व

माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यास अधिनियमाच्या कलम 20 प्रमाणे जन माहिती अधिकारी हे जबाबदार असतात व त्यामुळे यापुढे जन माहिती अधिकारी यांनी राज्य माहिती आयोगापुढे अपीलाच्या सुनावणीस हजर राहून माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही हे सिध्द करणे आवश्यक असते. तसेच आयोगास माहिती उपलब्ध करुन दिली नसली तर अधिनियमाच्या कलम 20 प्रमाणे शास्ती करण्याचे अधिकार आहे व आयोगाची खात्री झाली असल्यास शास्ती लादतांना ज्या माहिती अधिका–याच्या विरुध्द शास्ती लादावयाची आहे त्यांचे म्हणणे ऐकुन घेणे बंधनकारक असते व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे हजर राहणे आवश्यक आहे अन्यथा त्यांच्या गैरहजरीमध्ये त्यांचेविरुध्द शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करण्याचा अधिकार हा राज्य माहिती आयोगास आहे याची नोंद जन माहिती अधिकारी यांनी घेणे आवश्यक आहे. आयोगाचा दर्जा याबाबतची माहिती सुध्दा अधिनियमाच्या कलम 16 मध्ये जन माहिती अधिकारी यांना माहिती होवू शकेल व याबाबतची नोंद जन माहिती अधिकारी यांनी घ्यावी.

4. वर नमुद केल्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे नसली तरी त्यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

# आ दे श

1) अपीलकर्ता यांच्या दि. 12.10.2006 च्या अर्जातील मागितलेली महिती ही ''माहिती'' या संज्ञेच्या व्याख्येत येत नसल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि. 25.6.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.134–138

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1693/2007.**

श्री जितेश गोविंदराव मात्रे

मु.पा. पिपरी (पारगोठण)

ता. आर्वी जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा

उद्योग सहसंचालक (आस्थापना)

उद्योग संचालनालय, नवीन प्रशासन भवन,

मंत्रालयासमोर, मुंबई – 32.

2) जन माहिती अधिकारी तथा (आस्थापना)

उद्योग संचालनालय, नवीन प्रशासन भवन,

मंत्रालयासमोर, मुंबई – 32. ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 26.6.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 7.6.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी पुढील मुदत मिळावी म्हणून अर्ज केलेले आहेत परंतु नागपूर येथील सहसंचालक यांचे कार्यालयातून उद्योग उपसंचालक हे हजर

आहेत. नस्तीमधील सर्व कागदपत्रांचे अवलेकन केले असता असे दिसून येते की ही सर्व माहिती उद्योग सहसंचालक नागपूर विभाग नागपूर यांचे कार्यालयातच उपलब्ध आहे व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी माहिती जरी उद्योग संचालनालय, नवीन प्रशासन भवन, मंत्रालय यांचेकडे मागितलेली असली तरी त्याबाबतची माहिती ही विभागीय कार्यालय नागपूर यांचेकडेच उपलब्ध आहे व तफावत अहवाल सुध्दा विभागीय कार्यालय नागपूर यांचेकडेच त्या माहिती अधिका–याने मागितलेली दिसून येत असल्यामुळे सदरच्या अपीलाची सुनावणी ही घेण्यात आली.

2. अपीलकर्ता यांनी दि. 26.10.2006 रोजी शासकीय माहिती अधिकारी उद्योग संचालनालय, नवीन प्रशासन भवन, मंत्रालय यांचेकडे खालीलप्रमाणे मागितलेली दिसून येते.

सांख्यिकी सहाय्यकाचे अनु.जाती बिंदु नामावलीचे सोबत जोडलेल्या 1 ते 12 मुद्याची माहिती उद्योग संचालनालय नागपूर येथे निवड नस्तीची चौकशी करुन सदर पद सांख्यिकी सहाय्यक व्यपगत झाल्याबाबत सदर पदाचा उनुशेष 2004 मध्ये असल्यामुळे सदर पद भरण्याची प्रक्रिया सुरु केल्यामुळे सन 2004 मध्ये अनुशेष निर्माण केल्यामुळे दि. 2.11.2006 व्यपगत कसे झाले याची संपूर्ण माहिती मिळण्याबाबत. दि. 2.2.97 रोजी कार्यरत असल्याचे यादी. खुल्या प्रवर्गातील कर्मचारी सांख्यिकी सहाय्यक आहेत. या अगोदर अनु.जातीच्या बिंदू नामावलीची माहिती. सदरची माहिती रजिस्टर पोस्टाने घेणार असे नमूद केले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 10.11.2006 रोजी जन माहिती अधिकारी तथा आस्थापना अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या दि.16.9.06, 16.10.07 व 26.11.06 रोजीच्या अर्जानुसार नागपूर विभागातील सांख्यिकी सहाय्यक या पदावर दि. 2.7.97 रोजी कार्यरत असलेल्या कर्मचा–याची यादी व बिंदु नामावलीची माहिती ही विभागीय कार्यालय नागपूर येथे उपलब्ध आहे तरी आपण कार्यालयात समक्ष जावून हवी असलेली माहिती उपलब्ध करुन घ्यावी तशा सुचना विभागीय कार्यालय

नागपूर यांना दिलेल्या आहेत असे अपीलकर्ता यांना कळविलेले दिसते. व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी दि. 30.11.2006 रोजी रजिस्टर पोस्टाने कार्यरत असलेल्या कर्मचा–याची यादी व बिंदु नामावलीची माहितीची छायांकित प्रत उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे सदरच्या माहितीने समाधान न झाल्याने त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी श्री आनंद गेडाम उद्योग संचालनालय, मुंबई यांचेकडे प्रथम अपील दि. 26.12.2006 रोजी दाखल केलेले दिसून येते. परंतु प्रथम अपीलाचा निर्णय हा विहित मुदतीत दिलेला नाही परंतु दि. 25.1.2007 रोजी अपीलकर्ता यांना सदरची माहिती विभागीय कार्यालय नागपूर कार्यालयातून देण्यात आलेल्या विवरणपत्रातील तफावती बाबत अहवाल मागविण्यात आलेला आहे. सदर कार्यालयातून अहवाल प्राप्त होताच याबाबतची माहिती आपणास त्वरीत पाठविण्यात येईल तसेच सहपत्रातील 1 ते 13 मुद्याबाबत चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर आपणास अहवाल कळविण्यात येत आहे. अपीलीय अधिकारी तथा उद्योग सहसंचालक (आस्थापना) यांनी अपीलकर्ता यांना कळविलेले दिसते परंतु त्यानंतर अपीलकर्ता यांना कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 7.6.2006 रोजी द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. सदरचे द्वितीय अपील विलंबाने सादर केलेले असले तरी सुनावणीस घेण्यात आले आहे.

3. ज्याप्रमाणे दि. 25.1.2007 रोजी अपीलकर्ता यांना तफावतीबाबत अहवाल व चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर कळविण्यात येईल असे कळविले आहे त्याच दिवशी दि. 25.1.2007 रोजी उद्योग उपसंचालक (आस्थापना) यांनी उद्योग सहसंचालक विभागीय कार्यालय नागपूर यांना अपीलकर्ता यांच्या दि. 26.12.06 च्या प्रथम अपील व 30.11.2006 चे कार्यालयाचे पत्राचे संदर्भ देवून सुधारीत पदाच्या आढाव्याअंती नागपूर विभागास एकच पद मंजुर झाल्याने अतिरिक्त ठरलेल्या कर्मचा–यांची माहिती मागितल्यास उलट टपाली सादर करावी व माहितीच्या अधिकाराखाली मागविण्यात

आलेली माहिती अर्जदारास देणे बाबत संबंधितास समज देण्यात यावी असे पत्र दिलेले दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 26.2.2007 रोजी उद्योग सहसंचालक नागपूर विभाग नागपूर यांनी अपीलकर्ता यांच्या सर्व माहितीच्या संदर्भामध्ये माहिती ही उद्योग उपसंचालक (आस्थापना) उद्योग संचालनालय, मुंबई यांचेकडे पाठविण्यात आलेली दिसून येते. उद्योग सहसंचालक नागपूर विभाग नागपूर यांचे म्हणणे असे आहे की अपीलकर्ता यांना सांख्यिकी सहाय्यकाच्या रिक्त पदाच्या संदर्भात संपूर्ण नस्तीची छायांकित प्रती पुर्वीच उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. तसेच राज्य माहिती आयोगापुढील अपील क्र. 32 व 33/2007 सुध्दा दि. 10.4.2007 रोजी निर्णय झालेला असून त्यामध्ये अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे ही अपीले निकाली काढण्यात आलेली आहेत. तसेच अपीलकर्ता यांना त्यात तफावत आढळत असल्यास त्याबद्यलची तक्रार त्यांनी योग्य त्या प्राधिकरणाकडे करावी असाही निर्णय दिलेला आहे. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांचे म्हणणे प्रमाणे त्यांनी संचालक उद्योग मुंबई यांचेकडे तक्रार केलेली आहे परंतु त्या तक्रारीबाबत निर्णय झालेला नाही. तसेच त्यांनी मॅट कडे सुध्दा याचिका दाखल केलेली आहे व ती सुध्दा प्रलंबित आहे. असे असले तरी अपीलकर्ता यांना दि. 26.2.2007 रोजी जी माहिती उद्योग सहसंचालक नागपूर विभाग नागपूर यांनी उद्योग उपसंचालक (आस्थापना) यांना दि. 25.1.2007 च्या पत्राप्रमाणे त्या माहितीच्या छायांकित प्रती अपीलकर्ता यांना विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. सदरची माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिली नाही असे त्यांचे म्हणणे आहे परंतु जन माहिती अधिकारी उद्योग संचालनालय, मुंबई हे जरी हजर नसल्यामुळे त्याबाबत त्यांचा खुलासा दाखल झालेला नाही. असे असले तरी वर नमूद केल्याप्रमाणे अपीलकर्ता यांना सदर प्रकरणातील माहिती ही संपूर्ण उपलब्ध करुन दिलेली असली तरी दि. 26.2.2007 चे पत्र व सहपत्राची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता त्यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना उद्योग सहसंचालक नागपूर विभाग नागपूर यांनी उद्योग उपसंचालक (आस्थापना) उद्योग संचालनालय, मुंबई यांना दि. 26.2.2007 रोजी दिलेले पत्र व सोबतची आठ सहपृष्ठांची छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी. अपीलकर्ता यांना सदरची माहिती उपलब्ध झाल्यावर त्याबद्यलची पोच द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि. 26.6.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.139–143

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1698/2007.**

श्री महादु गांडो परसे
मु. घोडेझरी पो. गठ्ठा
ता. धानोरा जि. गडचिरोली ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी
पंचायत समिती धानोरा
ता. धानोरा जि. गडचिरोली
2) जन माहिती अधिकारी तथा
गट शिक्षणाधिकारी
पंचायत समिती धानोरा
ता. धानोरा जि. गडचिरोली ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 26.6.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 11.6.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी विनाअनुमती गैरहजर आहे.

2. ग्राम शिक्षण समिती जि. प. प्रा. शाळा घोडेझरी अध्यक्ष इंदरशा केशव परसे, उपाध्यक्ष गंगाराम मादु परसे, सदस्य मंगू सैनु पदा, सुका राजू नरोटे, मानकीबाई मंगू पदा, कारु चौदरी परसे, यादो लालू परसे, धर्मा गांडो परसे व इतर गावगण राज्यातील सभासद एकुण 60 यांनी सदरचा अर्ज शासकीय माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती धानोरा जि. गडचिरोली यांचेकडे दि. 16.10.2006 रोजी केलेला असून त्यामध्ये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. जि.प.प्राथ.शाळा घोडेझरी येथील माहे जुन 1005 ते एप्रिल 2006 पर्यंत व माहे जुन 2006 ते ऑक्टोबर 2006 पर्यंत शालेय पोषण आहार वाटप कारवाईची अहवालाची सत्यप्रत मिळणेबाबत.

2. सर्व शिक्षा अभियान अंतर्गत शालेय विकासासाठी जि.प.प्राथ.शाळा घोडेझरी निधीचा खर्चाचा सन 2004 ते 2005 च्या साहीत्य व बांधकामाच्या खर्चाच्या व्हाउचरची प्रमाणित सत्य प्रत मिळण्याबाबत.

3. शाळे करीता बांधकामासाठी जो पैसा खर्च करण्यात आला त्यांचे प्लान्स व इस्टीमेट ची सर्टिफाईड कॉपी मिळण्याबाबत.

4. शाळेच्या विकासासाठी प्रत्येक घरातून 45/— रु. प्रमाणे 25 घराचे रक्कम 1125/— रु. श्री सनकु कोसू उसेंडी (गुरुजी) यांनी वसुली केली. त्यांचे हिशाबाचे व्हाउचरची प्रमाणित प्रत मिळणेबाबत आणि खरेदी केलेले साहित्यची यादी व साहित्य सादर करणे बाबत.

सदरची माहिती घेण्यासाठी ग्रामसभा घोडेझरीचे सर्व सभासद आपल्या कार्यालयात येतील तसेच अपिलीय अधिकारीकडे पुर्ण घोडेझरी गावातील परंपरागत वेश भुषेत व नृत्य करत येतील आणि त्याच दिवशी अपिलाचा निर्णय घेतील असे नमुद केलेले आहे. टपालाद्वारे असेल त्याबाबत प्रश्नच उद्भवत नाही असे दिलेले आहे. त्यावर उपस्थित असलेले अर्जदार व अपीलकर्ता यांनी असे सांगितले की जवळ जवळ 500

लोक नमुद केल्याप्रमाणे गट शिक्षणाधिकारी यांचे कार्यालयात माहिती घेण्यास गेले होते. परंतु त्यांना तारीख सांगता येत नाही तरीही माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नाही. म्हणून त्यांनी दि. 26.1.2007 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलामध्ये दि. 9.2.2007 रोजी गट विकास अधिकारी (प्रशासन) तथा माहिती अधिकारी आयुक्त कार्यालय नागपूर यांनी गट विकास अधिकारी पंचायत समिती धानोरा यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी व सदरच्या अर्जाची प्रत श्री गंगाराम माहू परसे उप सभापती ग्राम शिक्षण समिती घोडेझरी यांना दिलेली दिसून येते व गट विकास अधिकारी यांचेकडे पाठपुरावा करा असे कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे दिनांक 21.2.2007 रोजी गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती धानोरा यांनी सभापती ग्राम शिक्षण समिती तथा सदस्य गण तथा ग्रामवासी घोडेझरी यांनी मागितलेली माहिती घेवून जाण्याबाबत पत्र दिलेले दिसून येते. तसेच पुन्हा जिल्हाधिकारी गडचिरोली करीता यांनी दि. 5.10.2006 रोजी श्री कारु चौधरी परसे व इतर यांच्या दि. 7.9.2006 च्या तक्रारीच्या संदर्भामध्ये कार्यवाही करण्याबाबत पत्र दिलेले दिसून येते. अर्थात सदरची तक्रार ही माहितीचा अर्ज करण्यापूर्वीची दिसून येते. विभागीय आयुक्त कार्यालयातून पाठविलेली दि. 9.2.2007 च्या पत्राप्रमाणे पुन्हा दि. 5.3.2007 रोजी गट विकास अधिकारी यांनी एस. के. उसंडी मुख्याध्यापक जि. प. प्राथ. शाळा घोडेझरी च्या संबंधात सर्व कामाची माहिती आपण संबंधीतांना वेळेत सादर केली नाही म्हणून पत्र दिलेले दिसून येते व त्याबाबतची प्रतिलिपी गट शिक्षणाधिकारी तसेच गंगाराम माहु परसे यांना दिलेली दिसून येते. तसेच केंद्र प्रमुख केंद्र मेन्लाटोला यांना अग्रेषित केलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की आजपर्यंत त्यांना मागितलेली माहिती मिळालेली नाही अपीलकर्ता व इतरांनी अर्ज सादर केला असला तरी ते वैयक्तिक रित्यासुध्दा हजर आहेत व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना मागितलेली माहिती हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने श्री मनिराम बुधु उसेंडी सभापती ग्राम शिक्षण समिती जिल्हा परिषद प्राथ. शाळा घोडेझरी यांना उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) अपीलकर्ता व इतर सदस्यांनी मागीतलेली माहिती ही विहित मुदीतीत उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे जन माहिती अधिकारी हे दोषी आढळुन येत असल्यामुळे त्यांना अधिनियमाच्या कलम 20 प्रमाणे शास्ती कां लादण्यात येवू नये याबाबतचा खुलासा त्यांना हा निर्णय मिळाल्यापासून आयोगाकडे दहा दिवसात करण्यात यावा अन्यथा त्यांचे विरुध्द रु. 25000/– ची शास्ती ही कायम होईल. व सदरची शास्ती ही त्यांचे दरमहाचे वेतनातून मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद गडचिरोली यांनी वसुल करावी.

3) सदरच्या निर्णयाची एक प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद गडचिरोली यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी व माहितीसाठी स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दि. 26.6.2008

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1205/2007.**

श्री मोहन गजाननराव गव्हाणकर
रा. चरखासंघ–मूल, पा. ता. मूल 441224
जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री प्रकाश हिर्सेकर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसचिव,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग
मंत्रालय, मुंबई 32.
2) श्री मोहम्मद हूसेन मुजावर
जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव
ग्राम विकास व जलसंधारण विभाग
मंत्रालय, मुंबई 32. ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 27.6.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 5.3.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 6.12.2006 रोजी कक्ष अधिकारी तथा माहिती अधिकारी महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग यांचेकडे दि. 1.10.1994 व त्यानंतरच्या कालावधीतील शासन निर्णय सा.प्र.वि. क्र. एसआरव्ही 1095/प्र.क्र. 1/95/12 दि. 8 जुन 1995 व क्रमांक एसआरव्ही 1095/प्र.क्र.33/95/12 दि. 20 मार्च 1997 मधील तरतुदीनुसार रु. 1640–2900 व रु. 2000–3200 या वेतनश्रेणीमधील ज्या कर्मचा–यांना ग्राम विकास व जलसंधारण मंत्रालयाने, दि. 1.10.1994 व त्यापुढील तारखेपासून कालबध्द पदोन्नतीचा लाभ दिला आहे, अशा कर्मचा–यांची, कर्मचारीनिहाय व लाभ दिलेल्या दिनांकासह माहिती आवश्यक आहे. माहिती टपालाने उपलब्ध करुन द्यावी असे नमूद केले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 11.1.2007 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी सुध्दा घेतलेली दिसून येत नाही. अपीलकर्ता यांना उत्तर पाठवितांना कोणत्याही प्रकारे अपील मेमोमधील किंवा अपीलकर्ता यांच्या दि. 6.12.2006 च्या अर्जातील मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारचा विचार न करता दि. 23.2.2007 रोजी उत्तर पाठविलेले दिसून येते व अपील फेटाळण्यात आले आहे असे कळविण्यात आलेले दिसून येते. व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांच्या दि. 6.12.2006 च्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही हे जन माहिती अधिकारी यांचे खुलाशावरुन दिसून येते. आयोगापुढे खुलासा दाखल करतांना दि. 6.12.2006 च्या अर्जाचा कोणताही उल्लेख केलेला दिसून येत नाही. व त्याबद्यलची माहिती काही माहिती उपलब्ध करुन दिली नाही असे खुलाशात दिसून येत नाही. व त्यामुळे जन माहिती अधिकारी हे अधिनियमाच्या कलम 20 प्रमाणे दोषी आढळून येतात. प्रथम अपील दि. 10.1.2007 चे त्यानिर्णयातून सुध्दा कोणत्याही प्रकारचा विचार करुन निर्णय दिला आहे असे दिसून

येत नाही. व त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केलेले दिसून येते. दि. 15.3.2008 रोजी आवश्यक कागदपत्रे उपलब्ध नाहीत असे आढळुन आल्याने सुनावणीसाठी सादर करता आले नाही तरी सुनावणीसाठी मुदतवाढ मिळावी असा अर्ज जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला आहे व तरीसुध्दा त्या अर्जाच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारची कागदपत्रे ही दाखल केलेली नाहीत. मात्र 18 जुन 2008 रोजी अपीलकर्ता यांना मागितलेली माहिती कोणत्या कार्यालयातून अपेक्षित आहे याचा बोध न झाल्याने आवश्यक ती माहिती देण्यास विलंब झालेला आहे तसेच या प्रकरणी आपण जिल्हा परिषद चंद्रपूर या नियुक्ती प्राधिकरणाकडे त्यांच्या आदेशा विरुध्द अपीलीय अधिकारी म्हणून विभागीय आयुक्त नागपूर यांचेकडे संपर्क करु शकता असे कळविलेले दिसून येते. व त्याबाबतचा अर्थबोध हा त्या पत्रातून होत नाही. तसेच सहपत्र म्हणून दि. 13 जुन 2008 चे पत्र माहिती दिलेली आहे ती माहिती सुध्दा अपीलकर्ता यांच्या अर्जाप्रमाणे आहे असेही दिसून येत नाही. अशा प्रकारे अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती 15 महिन्यानंतर उपलब्ध करुन देण्यात आली. व ते अपीलकर्ता यांचे म्हणण्यानुसार त्यांनी मागितलेली माहिती प्रमाणे नाही व यावर जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी 15 महिन्यामध्ये कोणत्याही प्रकारे अपीलकर्ता यांच्या अर्जात मागितलेल्या माहितीच्या अर्जाचे वाचन सुध्दा केलेले नाही व विचार सुध्दा केलेला नाही व आयोगास सुनावणीकरीता येईपर्यंत सुध्दा उडवाउडवीची उत्तरे दिलेली आहेत व ही बाब अर्थातच ग्राम विकास व जलसंधारण विभाग यांच्या सचिवाच्या निदर्शनास आणणे हे आवश्यक आहे. तसेच जन माहिती अधिकारी हे अधिनियमाच्या कलम 20 प्रमाणे सुध्दा दोषी आढळून येतात. परंतु अपीलकर्ता यांनी त्यांच्या द्वितीय अपील मेमोमध्ये शास्तीच्या बद्यल कोणत्याही प्रकारची विनंती केलेली नाही तसेच त्यांना तोंडी विचारले असता त्याबद्यल त्यांना काहीही म्हणवयाचे नाही असे त्यांनी सांगितले. असे असले तरी त्यांना त्यांच्या

दि. 6.12.2006 च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 6.12.2006 च्या अर्जात मागितलेल्या माहिती प्रमाणे माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत रजिस्टर पोस्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) रजिस्टर पोस्टाचा खर्च तसेच माहितीच्या संदर्भातील छायांकीत प्रतीचा खर्च हा जन माहिती अधिकारी यांनी स्वतः करावयाचा आहे तो शासनाच्या निधीतून करावयाचा नाही.

3) सदरच्या निर्णयाची एक प्रत सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई 32 यांचेकडे माहितीकरीता स्वतंत्रपणे पास्टाने पाठविण्यात यावे.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि. 27.6.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1701/2007.**

श्री वसंतराव बापुराव गावंडे
मु. पो. काळी (दौ.) ता. महागाव
जि. यवतमाळ ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी पुसद
ता. पुसद जि. यवतमाळ
2) श्री एस. जी. परतेकी
जन माहिती अधिकारी तथा
तहसिलदार महागाव
ता. महागाव जि. यवतमाळ ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 27.6.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 25.6.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 23.1.2007 रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा तहसिलदार महागाव यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागीतलेली दिसून येते.

सलीम ट्रेडींग कंपनी अर्धघाउक रॉकेल दुकानाबाबत खालीलप्रमाणे माहिती देण्यात यावी.

1) जानेवारी 2002 ते डिसेंबर 2006 पावेतो 5 वर्षाचा दरवर्षी एकूण प्राप्त झालेला दुकानाचे स्टॉक रजिस्टर नुसार रॉकेल पुरवठा (लिटरमध्ये)

2) माहे डिसेंबर 2005, माहे डिसेंबर 2006 ची विक्री रजिस्टर व स्टॉक रजिस्टरची प्रमाणीत फोटाकॉपी.

3) सलीम ट्रेडींग कंपनीकडून चिल्लर रॉकेल विक्रीकरीता उचल करण्याचा किरकोळ रॉकेल चिल्लर विक्रेत्याचे नाव, परवाना क्रमांक, क्षेत्र (विक्रीचे), दरमहा पुरवठा लिटरमध्ये, सलीम ट्रेडींग कंपनी, अर्धघाउक रॉकेल विक्रेता, यांचे दुकानाची रॉकेल विक्री व वितरण बाबत. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करुन देण्यात यावी.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 22.3.2007 रोजी उपविभागीय अधिकारी उपविभाग पुसद यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दि. 23.4.2007 रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांच्या दि. 23.1.2007 च्या अर्जाचे संबंधी मागितलेली माहिती संबंधिताकडून प्राप्त करुन घेवून त्वरीत पुरवावी तसेच अपीलकर्ता यांना माहिती पुरविल्यानंतर तहसिलदार यांनी त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास न चुकता सादर करावा असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता यांच्या दि. 23.1.2007 च्या अर्जा प्रमाणे त्यांना दिनांक 17.3.2007 रोजी माहिती उपलब्ध करुन दिली अशा प्रकारचा खुलासा जन माहिती अधिकारी यांनी दाखल केला आहे. तसेच दिनांक 17.3.2007 च्या पत्राची प्रत दाखल

केली आहे. परंतु अपीलकर्ता यांना सदरचे पत्र मिळालेले नाही असे त्यांचे म्हणणे आहे. सदरच्या पत्राच्या संदर्भामध्ये जावक नोंदवहीचा पुरावा जन माहिती अधिकारी यांनी दाखल केलेला नाही. प्रथम अपीलाच्या निर्णयात सुध्दा दिनांक 17.3.2007 च्या पत्राचा उल्लेख दिसून येत नाही. व त्यामुळे दिनांक 17.3.2007 चे पत्र हे संशयास्पद दिसून येते. त्यानंतर दि. 23.7.2007 चे तहसिलदार महागाव यांनी श्री वसंत बापुराव गावंडे यांना पाठविलेले पत्र दिसून येते. सदरच्या पत्रामध्ये आपण हजर राहून शासकिय शुल्क अदा केले नाही तर माहितीची आवश्यकता नसल्याचे गृहीत धरुन आपला अर्ज खारीज करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी असे कळविलेले दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांनी त्यांच्या माहितीच्या अर्जामध्ये दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र धारक असल्यामुळे शुल्क भरण्याची आवश्यकता नाही असे दि. 6.8.2007 चे पत्रानुसार त्यांना कळविण्यात आलेले दिसते. दि. 23.7.2007 चे पत्रावरुनच असे दिसून येते की दिनांक 17.3.2007 चे पत्र हे पाठविलेलेच दिसून येत नाही त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली नाही त्याबद्यल संबंधित जन माहिती अधिकारी हे दोषी आढळुन येतात. सलीम ट्रेडींग कंपनी यांचेकडून तहसिलदार महागाव यांना दि. 8.8.2007 रोजी पत्र दिल्याचे दिसून येते. व त्या पत्रामध्ये तहसिलदार कार्यालयाने पाठविलेल्या पत्राची तारीख दिसून येत नाही. व त्यामुळे सुध्दा सदरचे पत्र हे बनावट आहे दिसून येते किंवा नंतर तयार केलेले आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार महागाव यांनी जो खुलासा दाखल केला आहे त्या खुलाशामध्ये वरीलप्रमाणेच विसंगती दिसून येते. तसेच आज रोजी अर्जदारास पुरवण्यासाठी शिल्लक राहिलेले रेकॉर्ड मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर येथे सुरु असलेल्या याचिका प्रकरणा संबंधाने मुख्य सचिव मंत्रालय यांनी मा. आयुक्त नागपूर विभाग नागपूर यांचे मार्फत चौकशी केली आहे त्या चौकशी मध्ये रेकॉर्ड ताब्यात घेण्यात आलेले असल्यामुळे अपीलार्थी हे वरील नमूद केलेली पोस्टेज खर्चाची कॉपी व माहितीचे पोस्टेट कॉपी

बनवण्यासाठी येणा–या खर्चाची रक्कम भरणा करण्यास तयार जरी झाले तरी ते पुरविता येणे शक्य नाही असे नमूद केले आहे. परंतु अपीलकर्ता यांचे दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्राच्या संदर्भामध्ये आक्षेप घतले गेलेले नाही. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नाही हे स्पष्ट होते व अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे शास्तीस पात्र आहेत. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना विहीत मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे संबंधित जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द रु. 5000/– ची शास्ती लादण्यात येत आहे. सदरची शास्तीची रक्कम जिल्हाधिकारी यवतमाळ यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या वेतनातून वसूल करुन करावी.
2) सदरच्या निर्णयाची एक प्रत जिल्हाधिकारी यवतमाळ यांचेकडे स्वतंत्रपणे पुढील कार्यवाहीसाठी पोस्टाने पाठविण्यात यावी.
3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि. 27.6.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.